
आय्एल्एस् विधी महाविद्यालय, पुणे



# बालविवाह थांबविण्यासाठी सहाय्यभूत मार्गदीपिका

## बालविवाह रोखण्यासाठी कायदेविषयक तरतुदी आणि संबंधित घटकांच्या सर्वसमावेशक भूमिकेबाबत विस्ताराने चर्चा करणारी पुस्तिका

अर्थ सहाय्य

स्विसएड

SWISSAID

# मनोगत

आय्‌एल्‌एस्‌ विधी महाविद्यालय, पुणे आणि स्विसएड ही सामाजिक संस्था गेली अनेक वर्षे एकत्र काम करत आहे. महिलांचे हक्क आणि समानता या विषयावर दोन्ही संस्थांनी मिळून अनेक प्रकल्प राबवले आहेत.

स्विसएडचे लिंगभाव समानतेचे काम प्रामुख्याने बीड, लातूर आणि उस्मानाबाद या तीन जिल्ह्यांमध्ये चालू होते. कोरोना २०१९ च्या महामारीमुळे अनेक नवीन आव्हाने सर्वांसमोर होती. त्यात या महामारीच्या काळात आधीच समानतेचे हक्क डावलल्या गेलेल्या गरीब आणि आदिवासी पाड्यातील मुली आणि महिलांची अवस्था तर अधिकच हालाखीची झाल्याचे लक्षात आले. कोवळ्या वयातील अनेक मुलींचे विवाह या काळात झाल्याचे निदर्शनास येऊ लागले. गरिबी, असुरक्षितता, शिक्षणासाठीच्या साधनांचा अभाव, अशा अनेक कारणांमुळे असे विवाह लावून देण्यात आले.

कोरोनामुळे बालविवाहाची कमी होत असलेली आकडेवारी पुन्हा वाढीस लागली. ही बाब स्विसएडच्या निदर्शनास आली. तसेच, बालविवाहाचे परिणाम, बालविवाह प्रतिबंध कायदा व त्यात समाविष्ट केलेली बालविवाहांना रोखण्यासाठीची प्रणाली इत्यादी बाबत जन-माणसांत जागरुकता कमी असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे, बालविवाहाबाबत जागरूकता वाढवण्याकरीता स्विसएड आणि आय्‌एल्‌एस्‌ विधी महाविद्यालय, पुणे यांनी ‘बालविवाह थांबवण्यासाठीच्या उपाययोजना’ या विषयावर ऑगस्ट २०२२ मध्ये दोन दिवसीय कार्यशाळा घेतली होती. सदर कार्यशाळेत महाराष्ट्रातील महिला व बाल विकास विभागाचे अनेक कर्मचारी, पोलीसांचे प्रतिनिधी आणि सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी यांनी सहभाग घेतला होता. सदर कार्यशाळेतील चर्चेतून असे लक्षात आले की बालविवाहाच्या कायद्याबाबत योग्य माहिती अनेकांना नाही. बालविवाहांना आळा घालायचा असेल तर माहितीचा असेलेला अभाव आधी दूर करणे गरजेचे आहे.

या पार्श्वभूमीवर आय्‌एल्‌एस्‌ विधी महाविद्यालय, पुणे आणि स्विसएड या दोन संस्थांनी एकत्रपणे बालविवाह या विषयावरील कायदा आणि त्यातील सर्व संबंधित घटक यांची भूमिका विस्ताराने मांडणारी मार्गदीपिका तयार करण्याचे ठरवले. आणि ‘बालपण जपताना’ ही मार्गदीपिका जन्माला आली. या मार्गदीपिकेमध्ये दिलेल्या माहितीचा उपयोग समाजातील विविध स्तरातील लोकांना नक्की होईल अशी आमची खात्री आहे. या माहितीचा उपयोग करून बालविवाहसारख्या कुप्रथेला आळा घालण्याच्या कामी आय्‌एल्‌एस्‌ विधी महाविद्यालय, पुणे आणि स्विसएड हातभार लावू इच्छितात.

या मार्गदीपिकेतील मजकूराचे संपादन आणि लिखाणाचे काम आय्‌एल्‌एस्‌ विधी महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापिका डॉ. वर्षा खंडागळे यांनी केले असून यातील काही मजकूर विधायक भारती या संस्थेचे संचालक संतोष शिंदे, बुलढाणा येथील बाल संरक्षण कक्षाचे अधिकारी दिवेश मराठे, आणि आय्‌एल्‌एस्‌ विधी महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक श्री. रोहित बोकील यांनी तयार केलेला आहे. डॉ. जया सागडे यांनी या मार्गदीपिकेच्या पहिल्या मसुद्याचे समीक्षण करून ही मार्गदीपिका अधिक परिणामकारक करण्यात मदत केली आहे. स्विसएड मधील सिनियर प्रोग्रॅम ऑफिसर स्नेहा गिरिधारी यांनी मार्गदर्शन आणि पाठपुरावा करून ही मार्गदीपिका तयार करण्यास मदत केली आहे. रेणुका सुलाखे व प्रशिक रक्षे या विद्यार्थ्यांनी संशोधन सहाय्य केले. डॉ. स्वाती कुलकर्णी यांनी व्याकरण व शुद्धलेखन बारकाईने तपासून दिले. मुखपृष्ठाची संकल्पना सहयोगी प्राध्यापिका डॉ. सुवर्णा निलख यांची असून सोहम काथेर या विद्यार्थ्याने या मार्गदीपिकेचे मुखपृष्ठ तयार केले आहे.

ही मार्गदीपिका बनविण्यासाठी स्विसएडने अर्थसहाय्य दिले असून, छपाईसाठीचे अर्थसहाय्य युरोपीयन युनियनच्या ‘Addressing Gender Based Violence and Discrimination particularly Domestic Violence and Child Marriage in Marathwada region of the state of Maharashtra, India’ या प्रकल्पांतर्गत मिळाले आहे. त्याबद्दल आभार!

**- डॉ. दीपा पातुरकर**
प्राध्यापक आणि प्रभारी प्राचार्य;
आय्‌एल्‌एस्‌ विधी महाविद्यालय, पुणे.

# अनुक्रमणिका


१. प्रस्तावना ..... ३

२. सद्यस्थिती ..... ४

३. बालविवाहाची कारणे ..... ७

४. आपल्या गावात / शहरात बालविवाह होण्याची शक्यता जास्त कुठे आहे ..... १०

५. बालविवाहांचे दुष्परिणाम ..... ११

६. बालविवाहाबाबत समज आणि गैरसमज...... ..... १४

७. मानवी हक्कांच्या चौकटीत बालविवाहाचा प्रश्न. ..... १५

८. बालविवाह प्रतिबंध कायद्याची वाटचाल ..... १९

९. बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ च्या तरतुदी ..... २१

१०. बालविवाह प्रतिबंध अधिकारी ..... २८

११. बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांची कर्तव्ये, जबाबदारी आणि भूमिका. ..... २९

१२. बालविवाह रोखण्यात इतर यंत्रणांची भूमिका. ..... ३४

१३. बालविवाहातील बालक लैंगिक शोषणाचे बळी ठरले असेल तर काय करावे ..... ४३

१४. बाल न्याय अधिनियम आणि बालविवाह ..... ४६

१५. ग्राम सेवकाने पोलिसांना तक्रार करावयाचा अर्जाचा नमुना (परिशिष्ट - १) ..... ४७

१६. जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांचे बाल कल्याण समिती यांच्यासाठीचे पत्राचा नमुना (परिशिष्ट - २) ..... ४८

१७. बाल कल्याण समितीचे पोलिसांसाठी समन्सचा नमुना (परिशिष्ट - ३) ..... ४९

१८. विवाह होणाऱ्या ठिकाणी किंवा मंगल कार्यालयाने घ्यावयाची काळजी (परिशिष्ट - ४). ..... ५०

१९. बालविवाह न करण्याबाबत घ्यावयाची शपथ (परिशिष्ट - ५) ..... ५२

२०. बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांचे नियुक्ती बाबत महाराष्ट्र शासनाची अधिसूचना (परिशिष्ठ - ६). ..... ५३

२१. बाल संरक्षण समिती बाबतीत महाराष्ट्र शासनाचा निर्णय (परिशिष्ठ - ७). ..... ५७

# १ प्रस्तावना

नमस्कार मित्रहो !!

आनंदी आणि सुरक्षित राहण्यासाठी काय हवं असतं? पोट भर पोषक आहार, रहायला घर, अंगावर कपडे फक्त एवढे मिळून आपण आनंदी आणि सुरक्षित राहू शकत नाही. याच बरोबर शिक्षण, निर्णय-स्वातंत्र्य, अत्याचार आणि हिंसा मुक्त आयुष्य, उत्तम आरोग्य, आपली हौस – मौज पुरवता येणे, अशा अनेक गोष्टी मिळाल्याशिवाय आपण आनंदी राहू शकत नाही आणि सुरक्षित देखील राहू शकत नाही.

अशा कोणत्या गोष्टी आहेत ज्यामुळे आपल्या घरातील मुला – मुलींचा आनंद हिरावून घेतला जातो?

ज्या मुला – मुलींचे लग्न त्यांच्या खेळण्या-बागडण्याच्या वयात होत असेल, ते आनंदी असतील का हो? ते सुरक्षित आहेत असं आपण ठामपणे म्हणू शकतो का?


नक्कीच नाही.

आजही आपल्या देशात आणि राज्यात बालविवाह होतात, ज्यामुळे कोवळ्या मुला-मुलींचे आयुष्य पणाला लागते, अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होतात. या बालविवाहांना आपण कसं थांबवू शकतो आणि मुला-मुलींचे आयुष्य कसे सुखकर करू शकतो याविषयीची चर्चा आपण या मार्गदीपिकेतून करणार आहोत.

एखाद्या समाजात चालत आलेल्या प्रथा त्या समाजाचा विचार दर्शवतात. आपला समाज प्रामुख्याने पुरुष प्रधान संस्कृती वर आधारित होता व आजही तो बहुतांशी तसाच आहे. समाजातील विविध घटकांमध्ये पुरुषांचेच वर्चस्व टिकवण्यासाठी इतर घटकांवर अन्यायकारक अशी बंधने लादली गेली. या बंधनांवर आवाज उठवण्याची मुभा कोणालाही नव्हती. त्यातूनच अनेक अनिष्ट प्रथा जन्माला आल्या. जसे की, स्त्री–भ्रूण हत्या, सती, केशवपन, विधवा विवाहाला विरोध, बालविवाह, इत्यादी. समाज सुधारकांच्या प्रयत्नांनी यातील अनेक प्रथांचे उच्चाटन करण्यात आपण कायद्याची मदत घेऊन यशस्वी झालो आहोत. मात्र, बालविवाहाची समस्या त्या विरोधी कायदा असूनही आज देखील आपल्या समाजात रूजलेली आहे.

बालविवाहांची आकडेवारी बघता, भारत जगात प्रथम क्रमांकावर आहे. जगात होणाऱ्या बालविवाहांपैकी सर्वाधिक बालविवाह भारतात होतात. जगभरातील एकूण बालवधुंपैकी ३४% बाल-वधू भारतात आहेत.[1] गेल्या काही वर्षात बालविवाहांची संख्या घटवण्यात / कमी करण्यात आपल्याला यश आले होते. मात्र कोरोना महामारीने ओढवलेल्या संकटामुळे बालविवाहांचे प्रमाण पुन्हा एकदा वाढताना दिसून येत आहे. त्यामुळेच, २०३० पर्यंत बालविवाह पूर्णपणे रोखण्याचे ध्येय गाठण्यावर प्रश्न चिन्ह उपस्थित झाले आहे.

**वयाच्या 18 वर्षापूर्वी लग्न झालेल्या किंवा विवाह झालेल्या मुली आणि महिलांची संख्या भारत, दक्षिण आशिया आणि उर्वरित जग**




[1]Ending Child Marriage – A Profile of Progress in India, 5th May, 2023, UNICEF Publication, p.6

# २ सद्यस्थिती

भारतीय संस्कृती नुसार विवाह फक्त दोन माणसांना नाही तर दोन कुटुंबाना जोडतो. त्यामुळे अनेकांचे विवाह हे दोन कुटुंब एकत्र येऊन त्यांच्या इच्छेनुसार होतात. अशा कुटुंबातील जेष्ठ व कुटुंबाच्या बाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार असणाऱ्या व्यक्ती विवाहासारख्या अतिशय नाजूक विषयांचे देखील निर्णय घेतात आणि मुला-मुलींवर ते लादतात. त्यात जर मुलीचा विवाह ठरवायचा असेल तर ते जास्त जिकीरीचे आणि जबाबदारीचे काम मानले जाते. मुलीचे लग्न करून देण्याचा प्रचंड ताण आणि सामाजिक दडपण घरातील वरिष्ठांवर असल्यामुळे अनेक वेळा हे विवाह घाईने ठरवले जातात, मुलगी १८ वर्षे पूर्ण करण्या आधी.

या सामाजिक दडपणामुळे वधूवरांची या विवाहाला संमती आहे की नाही, ते विवाह योग्य वयाचे आहेत की नाही, विवाहातून निर्माण होणाऱ्या जबाबदाऱ्या ते निभावू शकतील की नाही, ते एकमेकांना अनुरूप आहेत की नाही अशा अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांकडे दुर्लक्ष केले जाते. विवाहाचा अर्थ केवळ धार्मिक प्रथा अथवा रीतीरिवाज पूर्ण करणे यापुरता मर्यादित नाही. विवाहामुळे अनेक नवीन जबाबदाऱ्या निर्माण होतात, ज्या वधू आणि वर या दोघांनाही पार पाडाव्या लागतात. त्यांचे मन, शरीर, आणि बुद्धी या सर्व जबाबदाऱ्या घेण्यासाठी सक्षम असणे गरजेचे असते. त्यामुळेच एक ठराविक वय झाल्यानंतरच विवाह करण्याची अट कायदा घालतो. कमी वयात लग्न, मुले, लग्नामुळे निर्माण होणारे नातेसंबंध, आयुष्यातील बदल, शरीरातील बदल ही मुलं - मुली सांभाळू शकत नाहीत. म्हणूनच कायद्याने ठरवून दिलेले वय झाल्यानंतरच मुला-मुलींचे लग्न करणे उचित असते.

परंतु भारतात परंपरेच्या नावाखाली अनेक विवाह हे मुला-मुलींचे कायदेशीर विवाह योग्य वय होण्या आधीच होतात. काही तज्ज्ञांच्या मते वैदिक काळात विवाह हे मुलगा-मुलगी समजते, कळते झाल्यानंतरच आणि एकमेकांच्या संमतीनेच होत. परंतु कालांतराने मुलींना लैंगिक अत्याचारापासून वाचवण्याकरिता आणि तिचे चारित्र्य सांभाळण्याकरिता, तिची 'योनी शुचिता' जपण्याकरिता तिचे लग्न लवकर लावून देण्याकडे कल वाढला. हळू-हळू मासिक पाळी सुरु झालेल्या मुलीला अविवाहित ठेवणे म्हणजे पाप मानले जाऊ लागले. वयात आलेल्या मुलीचा विवाह नाही केला म्हणजे मुलीत काहीतरी दोष असणार असे सामाजिक मत होऊ लागले आणि कालांतराने बालविवाहाच्या परंपरेने आपले पाय समाजात घट्ट रोवले.

आज-एकविसाव्या शतकात देखील आपल्याला या समस्येला सामोरे जावे लागत आहे. जगभरातील आकडेवारी बघितली तर आपल्या असे लक्षात येते की १९% महिलांचे विवाह तर ३% पुरुषांचे विवाह १८ वर्षांखाली असताना होतात.[२]

भारतातील बालविवाहाची स्थिती:


'एंडिंग चाइल्ड मॅरेज ए प्रोफाइल ऑफ प्रोग्रेस इन इंडिया २०१७' या युनिसेफ अहवालानुसार भारतात एकूण २२३ दशलक्ष बालवधू आहेत. जगात होणाऱ्या एकूण बालविवाहांपैकी ३४% बालविवाह भारतात होतात. म्हणजेच जगातील एकूण बाल-वधू पैकी १/३ बालवधू भारतात आहेत. एन.एफ.एच.एस. – ५ नुसार भारतात बालविवाह होण्याचे प्रमाण २३.३% इतके आहे. एकूण होणाऱ्या बाल विवाहांमधील अर्ध्यापेक्षा जास्त बालवधू या उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या पाच राज्यात आढळतात.[३] बाल विवाहांचे सर्वाधिक प्रमाण असणाऱ्या पाच राज्यांपैकी महाराष्ट्र एक आहे.[४]

## महाराष्ट्रात बालविवाहाची स्थिती

युनिसेफ च्या २०२३ च्या अहवालानुसार महाराष्ट्रातील जवळपास २२% तरुण महिलांचे विवाह त्यांच्या बालपणी झालेले आहेत.[५] ग्रामीण भागातील, गरीब कुटुंबातील, अशिक्षित किंवा कमी शिक्षित असलेल्या मुलींचे बालविवाह होण्याची

[२] युनिसेफ २०२३ ची आकडेवारी.
[३] Ending Child Marriage – A Profile of Progress in India, 5th May, 2023, UNICEF Publication, p.8
[४] Ending Child Marriage – A Profile of Progress in India, 5th May, 2023, UNICEF Publication, p.8
[५] Ending Child Marriage – A Profile of Progress in India, 5th May, 2023, UNICEF Publication, p.10

शक्यता सर्वात जास्त आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण ५ आणि ४ ची तुलना केल्या नंतर बालविवाहांमध्ये घट होताना दिसत असली तरी काही ठराविक जिल्ह्यात बालविवाहाचा आलेख वाढता आहे. महाराष्ट्रातील १८ जिल्हे असे आहेत जिथे वयोगट २० ते २४ च्या आत बालविवाह होत असलेल्या विवाहित महिलांचे प्रमाण हे भारताच्या एकूण सरासरी पेक्षा म्हणजेच २३.३% पेक्षा जास्त आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील बालविवाहाची टक्केवारी खाली दिली आहे:[६]




[६] *National Family Health Survey - 5 (NFHS-5) (2019-20) District Fact Sheet- Maharashtra.* (n.d.). Ministry of Health and Family Welfare, International Institute for Population Sciences (Deemed University). http://rchiips.org/nfhs/NFHS-5_MH.shtml


मुला – मुलींचे विवाह योग्य वय होण्यापूर्वीच त्यांचा विवाह झाला तर तो बालविवाह मानला जातो. विवाह योग्य वयोमर्यादा कायद्याने ठरवली जाते. वय ठरवत असताना मुला-मुलींच्या शारिरीक, मानसिक, बौद्धिक व सामाजिक विकास पूर्ण होऊन ते विवाहाशी संबंधित जबाबदाऱ्या सक्षमपणे हाताळू शकतील की नाही हे बघितले जाते. परंतु कायद्यातील वयोमर्यादेची कोणतीही तमा न बाळगता अनेक बालविवाह आपल्या देशात होतात. **महत्त्वाचे म्हणजे सर्व जाती, वर्गात आणि धर्मात असे बालविवाह होताना आपल्याला आढळून येतात.**

बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ या कायद्यानुसार विवाहाच्या वेळेस मुलाचे वय कमीत कमी २१ वर्षे आणि मुलीचे वय कमीत कमी १८ वर्षे असणे गरजेचे आहे. विवाहाच्या वेळेस मुलाचे अथवा मुलीचे वय वर नमूद केलेल्या वयापेक्षा कमी असेल तर तो बालविवाह ठरतो. असा विवाह करणे कायद्याने गुन्हा आहे.










**नंदुरबार, धुळे, जळगाव, बुलढाणा, वाशीम, नांदेड, हिंगोली, परभणी, जालना, औरंगाबाद, नाशिक, पुणे, अहमदनगर, बीड, लातूर, उस्मानाबाद, सोलापूर, सांगली ह्या जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण भारतातील सरासरीपेक्षा जास्त आहे.**

**या जिल्ह्यांमध्ये बालविवाह रोखण्यासाठी आपण जास्त सतर्क असणे आणि येथे जास्त प्रभावी यंत्रणा असणे गरजेचे आहे.**

[७] National Family Health Survey - 5 (NFHS-5) (2019-20) District Fact Sheet- Maharashtra. (n.d.). Ministry of Health and Family Welfare, International Institute for Population Sciences (Deemed University). http://rchiips.org/nfhs/NFHS-5_MH.shtml

# ३ बालविवाहाची कारणे

अनेक वर्षांपासून बाल -विवाहाच्या समस्येला आपल्याला सामोरे जावे लागत आहे, कारण ही प्रथा समाजात खोलवर रुजली आहे. बालविवाहांकडे बघत असताना आपल्या एक लक्षात येईल की असा विवाह होण्याची शक्यता आणि विवाह झाल्यास त्यातून होणारे शोषण हे मुलींचे जास्त होते. त्यामुळे बालविवाहाच्या समस्येकडे बघत असताना आपण प्रामुख्याने मुलींचा विचार करणार आहोत.

बालविवाह होण्याची अनेक कारणे आहेत. काही कारणे खाली नमूद केली आहेत.

**१. पितृसत्ताक व्यवस्था –**

बालविवाह हे पुरुषसत्ताक व्यवस्थेचे प्रतिक आहे. मुलगा आणि मुलगी अथवा स्त्री -पुरुष यांच्या मध्ये कायम भेदभाव करणे हे पुरुषसत्ताक व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. अशा समाज व्यवस्थेत स्त्रियांना सर्वत्र म्हणजेच – घरात, कुटुंबात, समाजात, राजकारणात दुय्यम स्थान दिले जाते. मुलींवर आणि महिलांवर 'काळजी पोटी', 'रक्षणासाठी' किंवा 'भल्यासाठी' असे सांगून/ आव आणून अनेक बंधने लादली जातात आणि पुरुषांद्वारे त्यांच्यावर अनेक पद्धतीने सत्ता गाजवली जाते. तो 'बलवान', ती 'नाजूक', तो 'संरक्षक' आणि ती 'रक्षित' अशा भूमिका तिला अबला ठरवतात. सुरक्षिततेच्या नावाखाली तिच्या हालचालींवर नियंत्रण ठेवले जाते. तिने कुठे जायचे, कधी जायचे, कोणाबरोबर जायचे, कोणाशी बोलायचे, कसे वागायचे या सर्व गोष्टींवर नियंत्रण ठेवले जाते. लग्न होईपर्यंत हे नियंत्रण ठेवण्याचे काम वडील, भाऊ, आजोबा, काका असे कोणीतरी निभावतात आणि लग्न झाल्यानंतर ही जबाबदारी तिच्या नवऱ्यावर येते. असे नियंत्रण ठेवता यावे म्हणून नवऱ्याचे वय बायको पेक्षा जास्त असणे अपेक्षित असते. पुरुषसत्ताक पद्धतीमध्ये शिकून सवरून चार पैसे कमावून कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याची जबाबदारी पुरुषावर तर चूल आणि मूल सांभाळण्याची जबाबदारी स्त्रियांवर अशा रीतीने कामाची विभागणी केली जाते. शिकण्याची किंवा काम करून पैसे कमावण्याची कोणतीही गरज स्त्रियांना नाही असे मानून बालविवाहासारख्या पद्धतींना पाठिंबा दिला जातो.

**२. स्त्रियांच्या लैंगिकतेवरील नियंत्रण**

पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रीचे लैंगिक पावित्र्य तिच्या जीवापेक्षाही अधिक महत्त्वाचे मानले जाते. लैंगिक संबंध हे फक्त विवाह बंधनातून निर्माण झाले तरच ते स्वीकृत , सुरक्षित समजले जातात आणि त्यांना समाज-मान्यता मिळते. याचे सर्वात जास्त काटेकोर पणे पालन महिलांबाबत होते. विवाह पूर्व तिच्या 'योनी शुचितेला' अपार महत्त्व दिले जाते. तिची 'योनी शुचिता' वैयक्तिक बाब न राहता तिच्या कुटुंबाच्या प्रतिष्ठा / लाजेशी जोडली जाते. त्यामुळे अनेक मार्गांनी तिचे लैंगिक पावित्र्य सांभाळले जाते. अशा मुलीला 'पदरातील जळता निखारा' मानून लवकरात लवकर लग्न बंधनात अडकवणे योग्य मानले जाते. तिच्या लैंगिकतेवरील बंधने जातीय व्यवस्था टिकवण्यासाठी देखील महत्त्वाची असतात. पदर, घुंघट घ्यायला लावणे, खाली मान घालून चालण्याची शिकवण, जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य न देणे हे सर्व निर्बंध जातीय व्यवस्थेला टिकवण्याचे काम करतात. तिची 'योनी शुचिता' अत्यंत महत्त्वाची असल्याने लहान वयात लग्न उरकले जाते, ज्यामुळे ती 'शुद्ध' किंवा 'पवित्र' असण्याची शक्यता सर्वाधिक असते. मुलगी जास्त शिकली तर विवाहापूर्वी ती अनेक पुरुषांच्या संपर्कात येऊ शकते आणि तिच्या पावित्र्याला गालबोट लागण्याची शक्यता जास्त असते. अविवाहित असताना गर्भधारणा झाली तर अख्ख्या कुटुंबाचे नाव खराब होईल या भीतीने तिचे लग्न कमी वयात उरकणे अधिक सोयीस्कर मानले जाते. मुलगी जेवढी मोठी, शिक्षित, ज्ञानी होईल, तेवढी ती स्वतःचा जोडीदार स्वतः निवडण्याची भाषा करेल आणि तो जोडीदार दुसऱ्या जाती धर्मातील असू शकतो. ही आपत्ती येऊच नये म्हणून लहान वयातच मुलींचे विवाह उरकून टाकले जातात. वयात आलेल्या मुलींना घरात ठेवणे अथवा शाळेत / महाविद्यालयात पाठवणे धोकादायक मानले जाते. घरात असताना / रस्त्यात या मुलीला कोणी त्रास दिला, तिच्या सोबत काहीतरी वाईट झालं तर कुटुंबाची बदनामी होईल या भीतीने तिचे लग्न करण्याचा निर्णय घेतला जातो. तिचे पाऊल वाकडे पडले (म्हणजे तिने स्वतःच्या

मर्जीने आपला जोडीदार निवडला) तर तिला आणि तिच्या सारखं करू पाहणाऱ्या इतर स्त्रियांना अद्दल घडवली जाते. 'इभ्रती'च्या नावाखाली केल्या जाणाऱ्या स्त्रियांच्या हत्या, आंतरजातीय विवाह केला म्हणून करण्यात येणाऱ्या हत्या, आंतरजातीय मुलाबरोबर प्रेम संबंध असल्यामुळे कमी वयात केले जाणारे विवाह, ही त्यातलीच काही उदाहरणे आहेत.

### ३. स्त्रियांच्या निर्णय स्वातंत्र्यावरील नियंत्रण

पितृसत्ताक आणि पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये स्त्रियांना निर्णय स्वातंत्र्य दिले जात नाही. किंबहुना त्यांच्यावर अनेक निर्बंध घालून त्या स्वतःच्या मर्जीने वागणार नाहीत याची खबरदारी घेतली जाते. मुळात विवाह करावा का, करावा तर तो कधी करावा, कुणाशी करावा असे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मुलीला / स्त्रीला दिले जात नाही. तसेच, मुले हवी का, हवी असतील तर किती, केव्हा यासारखे निर्णय देखिल ती स्वतः घेऊ शकत नाही. अतिशय खासगी आणि महत्त्वाच्या निर्णयात देखील त्यांचे मत जाणून घेणे, त्यांना निर्णय स्वातंत्र्य देणे गरजेचे समजले जात नाही. उलट घरातील वरिष्ठ (पुरुष) मंडळी जे ठरवतील ते तिच्या भल्यासाठीच असेल असे सांगितले जाते. मुलगी चांगली कळती झाली, शिकली, वयाने देखील मोठी झाली तर तिची स्वतःची मते तयार होतील, ती घरच्यांचे ऐकणार नाही आणि मनाला येईल ते करेल. हे टाळण्यासाठी म्हणून तिचे लग्न लवकर आणि कळती होण्याच्या आत लावून दिले जाते. कमी वयात वडीलधाऱ्यांचे ऐकण्याची जास्त शक्यता असल्याने बालविवाह करणे सोयीचे समजले जाते.

### ४. आर्थिक कारणे

अनेक आर्थिक कारणांमुळे बालविवाह होताना आपल्याला दिसतील. भारतामध्ये विवाहाच्या वेळी मुलीच्या आई – वडिलांना रोख पैशांच्या किंवा वस्तूंच्या स्वरुपात हुंडा देण्याची पद्धत (कायद्याने प्रतिबंध असूनही) अस्तित्वात आहे. मुलीचे वय जर जास्त असेल तर त्याप्रमाणात मुलगा देखील जास्त वयाचा असेल असे बघितले जाते. जास्त वयाचा मुलगा जास्त शिकलेला असण्याची शक्यता असते ज्यामुळे त्याला हुंडा देखील जास्त द्यावा लागतो. त्यामुळे हुंड्यावरचा खर्च वाचावा म्हणूनही कमी वयातच मुलीचे लग्न करण्याकडे कल असतो. घरात जर जास्त मुली असतील तर लग्नावरचा खर्च वाचावा म्हणून काही मुलींचे वय कमी असले तरी, सगळ्या मुलींचे लग्न एकत्र लावले जाते. मुलगी घरातील सगळं काम करूनही तिच्या कामाची किंमत घरच्यांना नसते. लग्न झाल्यानंतर परंपरेनुसार मुलींना त्यांचे घर सोडून नवऱ्याच्या घरी जावे लागते, त्याचेच नाव लावावे लागते. ती तिच्या लग्नापूर्वीच्या कुटुंबाची सदस्य राहत नाही आणि तिच्यावर कुटुंबाला सांभाळण्याची जबाबदारी राहत नाही. या उलट, लग्न झाल्यांनतर देखील मुलगा मात्र त्याच घरात राहतो, त्याच्या कुटुंबाची जबाबदारी त्याने घ्यावी अशी अपेक्षा असते. मुलीमुळे कोणताही आर्थिक फायदा तिच्या कुटुंबाला वाटत नाही, उलट तिचा भार असल्यासारखे वाटते. गरीब कुटुंबात, लग्न झाल्यानंतर मुलगी नवऱ्याच्या घरी जाईल तर खायचे एक तोंड कमी होईल या विचाराने देखील लवकर लग्न लावून दिले जाते.

### ५. इतर पर्यायांचा अभाव

लहानपणापासूनच मुलींना त्यांच्या आयुष्यात त्यांचे लग्न होणे हेच सर्वात महत्त्वाचे असल्याचे सांगितले जाते. त्याच विचाराने त्यांना वाढवले जाते. त्यामुळे त्यांना शिक्षण आणि नोकरी-धंद्याच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात नाहीत. ग्रामीण भागात तर स्थानिक पातळीवर या संधींची वानवाच असते. शाळा – महाविद्यालये गावापासून लांब – तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी असतात. इतक्या लांब शिक्षणासाठी पाठवणे आई-वडिलांना सुरक्षित वाटत नाही. शिक्षणासाठी / कामासाठी लांब जात-येत असताना त्यांचे लैंगिक शोषण झाले तर कुटुंबाची 'इभ्रत' जाईल ही भीती मुलींच्या प्रगतीच्या आड येते.

### ६. स्वास्थ्यावर होणाऱ्या वाईट परिणामांबाबत जागरूकतेचा अभाव

प्रजननाच्या संदर्भात मुळातच मुलींमध्ये आणि स्त्रियांमध्ये अनभिज्ञता असते. तसेच, आत्मनिर्भरता आणि कौशल्याचा अभाव, इतरांवरील परावलंबित्व, निर्णय स्वातंत्र्याचा अभाव, कोवळे वय, शिक्षणाचा अभाव आणि कायम नियंत्रणाच्या वातावरणात वाढलेल्या या मुली वयाने प्रौढ असणाऱ्या नवऱ्या समोर आणि त्याच्या कुटुंबासमोर मुले कधी व किती होऊ द्यावीत या बाबत आपले मत व्यक्त करू शकत नाहीत आणि केले तरी त्यांचे ऐकले जात नाही. त्यामुळे लग्न होताच कोवळ्या मुलीवर आई होण्याची जबाबदारी टाकली जाते. कमी वयातील

गर्भधारणेने त्या मुलीच्या आरोग्यावर होणाऱ्या गंभीर परिणामांबाबत जागरूकता नसते आणि त्या कमी वयात झालेल्या लग्नाचा अत्यंत गंभीर परिणाम किशोरवयीन मुलींच्या प्रजनन क्षमतेवर, आरोग्यावर आणि विकासावर होतो. कमी वयात लग्न झाल्यामुळे माता आणि बालक दोघांच्याही जीविताला धोका असतो.

### ७. कायद्याविषयी जागरूकतेचा अभाव

बालविवाहाला प्रतिबंध करणारा कायदा भारतामध्ये १९२९ पासून अस्तित्वात आहे. कालांतराने या कायद्याची जागा २००६ च्या कायद्याने घेतली आहे. बालविवाहाला कायद्याने बंदी असताना देखील आपल्याला सर्रास बालविवाह होताना दिसतात कारण या कायद्याविषयी समाजात आजही जागरूकता नाही. विशेषतः ग्रामीण, अशिक्षित किंवा आदिवासी पाड्यातील लोक आजही या कायद्याच्या तरतुदींबाबत अनभिज्ञ आहेत. कोणतीही जागरूकता नसताना या कायद्याचे पालन ते करतील अशी अपेक्षा ठेवणेच चुकीचे आहे. हा कायदा लोकांच्या सामाजिक मूल्ये आणि धार्मिक रिती रिवाज यांच्यावर परिणाम करणारा असल्याने लोकांना विश्वासात घेऊन या कायद्याची गरज समजावून सांगितल्याशिवाय त्याचे पालन होणे शक्य नाही. त्याच बरोबर असा विवाह होणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर दाद कुठे मागावी, कोणाकडे मागावी याबाबत देखील अनभिज्ञता असल्यामुळे बालविवाहांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते.

### ८. राजकीय अनास्था

बालविवाहांच्या समस्येकडे राज्यकर्त्यांनी पुरेसे लक्ष न दिल्यामुळे देखील बालविवाहांचे प्रमाण भारतात जास्त असल्याचे आपल्याला दिसून येईल. बालविवाहांना रोखण्याकरिता फक्त कायद्याची अंमलबजावणीच नाही तर मुलींच्या आणि महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी पूरक अशा योजना तयार करून त्या अंमलात आणणे गरजेचे आहे. **कायद्याचे पालन न करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यापेक्षा कायद्याचे पालन होण्याकरिता जन-जागृती करणे अधिक महत्त्वाचे आहे.**

### ९. इतर कारणे

वर नमूद कारणे सर्वसमावेशक नाहीत. या पेक्षा देखील अनेक कौटुंबिक / स्थानिक / धार्मिक अथवा इतर काही कारणांमुळे बालविवाह होतात. जसे की, आजी आजोबांच्या प्रचंड दबावामुळे आई -वडील आपल्या मुलीचे लवकर लग्न लावून देतात. तर काही वेळा चांगले स्थळ हातचे निघून जाईल म्हणून लवकर लग्न केले जाते. काही वेळा लवकर लग्न केलं तर मुलगी सासरी चांगली रुळेल या भावनेने तिचा विवाह लवकर केला जातो. तर काही वेळा मुलीचे काही डोके चालत नाही, तिला अभ्यासात गती नाही, तशीही घरातच असते तर लवकर लग्न करून टाकू या विचाराने देखील लवकर लग्न केले जाते.

तर अशा प्रकारे अनेक कारणांमुळे बालविवाह आजही समाजात मोठ्या प्रमाणावर आपल्याला होताना दिसतात. कुटुंबाच्या दृष्टीने त्यात काही वावगं त्यांना वाटत नाही. कारण मासिक पाळी येण्या अगोदर जरी विवाह झाला तरी मुलगी माहेरीच ठेवली जाते. मासिक पाळी सुरु झाली की विधीपूर्वक तिला सासरी पाठवले जाते. कोणत्याही कारणाने आणि कोणत्याही परिस्थितीत बालविवाह झाला तरी तो चुकीचाच असतो. **अशा विवाहामुळे त्या दोघांच्या आणि विशेष करून मुलींच्या मानवी हक्कांची पायमल्ली होते.**

# ४ आपल्या गावात / शहरात बालविवाह होण्याची शक्यता जास्त कुठे आहे

- शाळेत अनियमित / शिक्षण अर्धवट सोडलेल्या आणि नापास झालेल्या मुली
- स्थलांतरित कुटुंबातील मुली
- वयात येणारी मुले/ मुली
- ज्या घरातील कर्ती व्यक्ती मृत्यु पावली आहे, अशा कुटुंबातील मुले
- जास्त मुली असणारी कुटूंब
- गरीब घरातील मुली
- मुलींची जबाबदारी टाळणारी कुटूंब
- कर्जबाजारी कुटुंबातील मुलगी
- व्यसनी कुटुंबातील मुलगी
- एखादी अत्याचारग्रस्त मुलगी
- प्रेमात गुंतलेली मुलगी
- सामाजिक परंपरा /रुढी/ इत्यादींच्या प्रभावाखाली असणाऱ्या कुटुंबातील मुली
- असुरक्षित वातावरण असलेल्या कुटुंबातील मुली.
- जास्त प्रमाणात शिस्त पाळणाऱ्या कुटुंबातील मुली.
- दुसऱ्यावर विसंबून असणाऱ्या कुटुंबातील मुली.
- ज्या कुटुंबात मुलींचा अपमान होतो, त्या कुटुंबातील मुली.
- जी कुटुंबे मुलींचे पालनपोषण करण्यास आणि त्यांचे संरक्षण करण्यास असमर्थ आहेत अशा कुटुंबातील मुलीं
- ज्या कुटुंबात मुलींना कमी महत्व दिले जाते त्या कुटुंबातील मुली.

# ५ बालविवाहांचे दुष्परिणाम

बालविवाहांचे अनेक अनिष्ट परिणाम दोघांवर होतात. पण जास्त प्रदीर्घ आणि गंभीर परिणाम मुलींवर होतात. पण या परिणामांबाबत जागरूकता त्या मुला-मुलीं अथवा त्यांच्या नातेवाईकांमध्ये नसते.

### १. मानवी हक्कांचे उल्लंघन –

बालविवाहांचा सर्वात गंभीर परिणाम म्हणजे अशा विवाहातील मुला-मुलींच्या मानवी हक्कांचे उल्लंघन. मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा, १९४८ (UDHR), महिलांविरुधच्या सर्व भेदभावांचे उच्चाटन करण्याबाबतची प्रसंविदा, १९६६ (CEDAW), बाल हक्कांच्या संरक्षणाकरिता पारित करण्यात आलेली प्रसंविदा, १९८९(C R C ) आणि यांसारख्या अनेक आंतरराष्ट्रीय पातळीवरील जाहीरनामे / करारनामे या द्वारे बालकांच्या व महिलांच्या विविध हक्कांची जबाबदारी सरकारवर टाकण्यात आली आहे. तसेच, भारताच्या संविधानाने देखील सर्वांना समान वागणूक मिळण्याचा आणि सन्मानाने जगण्याचा मूलभूत अधिकार दिलेला आहे. भारतामध्ये बालविवाह प्रामुख्याने घरातील व्यक्तींच्या दबावामुळे केले जातात. बहुतांश बालविवाह हे जोर जबरदस्तीने केलेले विवाह असतात ज्यामध्ये दोघांचीही आणि विशेष करून मुलीची संमती नसते. अशा विवाहांमुळे मुलींच्या व्यक्तिगत, शारीरिक, मानसिक आणि सर्वांगीण विकासाला बाधा येते. त्यांचे स्वातंत्र्य आणि मनाप्रमाणे वागण्याचा आणि सन्मानाने जगण्याच्या हक्कांचे उल्लंघन होते. त्यांचे बालपण पूर्णपणे हिरावून घेतले जाते आणि त्यांच्या प्रगतीचे मार्ग देखील बंद होतात. मानवी हक्कांविषयी पुढे सविस्तर चर्चा केली आहे.

### २. आरोग्यावरील परिणाम –

लवकर लग्न झाल्यामुळे शारीरिक / मानसिक वाढ पूर्ण झालेली नसतानाच अशा मुलींना लैंगिक संबंधांना सामोरे जावे लागते. अतिशय कोवळ्या वयात त्यांच्यावर गर्भधारणा लादली जाते. आधीच कुपोषित असलेल्या या मुलींवर जेव्हा गर्भधारणेची जबाबदारी येते तेव्हा शरीरावर ताण येतो आणि जीवनसत्त्वांची कमतरता अधिक जाणवू लागते. त्याचा परिणाम गर्भपात, अवघड प्रसूती, माता मृत्यू, बालमृत्यू, बाळाची अपूर्ण वाढ, इत्यादी मध्ये होतो. त्याच बरोबर अशा मुलींना रक्तक्षय, उच्च रक्तदाब, फिट्स, रक्तस्त्राव, मूळव्याध, पिशवी लवकर काढणे, गुप्त रोग यांसारख्या आजारांना सामोरे जावे लागू शकते. प्रसूतीच्या वेळेस आलेल्या अडचणींमुळे भगेंद्र सारखा त्रास होऊ शकतो. या व्याधी मुळे त्यांचे लघवी आणि शौचावरील नियंत्रण जाते आणि समाजात अशा मुलींना स्वीकारले जात नाही. योग्य आहार आणि पोषण दिल्याने वर नमूद केलेल्या आरोग्यावरील परिणामांना टाळता येऊ शकते. परंतु, गरीब कुटुंबात स्त्रियांच्या पोषणाकडे मुळातच दुर्लक्ष केले जाते. कमी वयातील गर्भधारणा आणि प्रसूती मुळे होणाऱ्या गंभीर परिणामांची आणि ते परिणाम टाळण्यासाठी आरोग्याची योग्य पद्धतीने काळजी कशी घ्यावी याबाबत त्यांना माहिती देखील मिळत नाही.

### ३. शिक्षणात खंड –

बालविवाहाचा अजून एक गंभीर परिणाम म्हणजे बालकांचे शिक्षण खुंटते. बालविवाहामुळे शिक्षणात खंड पडल्यामुळे बालकांच्या पुढील प्रगतीच्या संधी तसेच उपजीविकेच्या संधी नाकारल्या जातात. भारतीय संविधानाने कलम २१-ए खाली वयवर्षे ६ ते १४ मधील बालकांना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याचा अधिकार दिला आहे. बालविवाहामुळे बालकांच्या या अधिकाराचे उल्लंघन होते. बालवधुंपैकी ८५% बाल- वधू शिक्षणापासून दूर आहेत[८].

### ४. वाढीव प्रजनन दर –

जेव्हा लग्न लवकर होते, तेव्हा जास्त मुले (अपत्ये) होण्याची शक्यता जास्त असते. परिणामी, माता आणि मुलांचे, दोघांचेही आरोग्य पणाला लागते. त्याच बरोबर, लोकसंख्येची वाढ देखील लवकर आणि जास्त प्रमाणात होते.

[८] Ending Child Marriage - A Profile of Progress in India, 5th May, 2023, UNICEF Publication, p.19.

### ५. माता मृत्यूदर –

गरोदरपणात आणि प्रसूती दरम्यान होणाऱ्या गुंतागुंतींमुळे अनेक माता आपला जीव गमावतात. त्यात जर गरोदर महिलेचे वय कमी असेल तर जीविताला असलेला धोका अजून वाढतो. २०१८-२०२० दरम्यान प्रती लक्ष प्रसूतींमागे झालेल्या ९७ माता[९] मृत्यूंमध्ये मातेचे वय कमी असणे हा देखील महत्त्वाचा मुद्दा आहे.

### ६. बाल मृत्युदर –

कमी वयात लग्न केल्यामुळे जन्माला येणाऱ्या बालकाच्या आरोग्यावर परिणाम होतात. अशा बालकांमध्ये योग्य पोषण न मिळाल्यामुळे कुपोषणाचा धोका असतो. त्यामुळे कुपोषित बालकांचा मृत्यू, नवजात बालकाचा मृत्यू आणि अर्भकांचे मृत्यू यांचे प्रमाण वाढते. कमी वयातील मुली आपल्या बाळाची योग्य काळजी योग्य पणे घेऊ शकत नाहीत आणि त्यामुळे देखील बाल मृत्युदर वाढतो.

### ७. गुप्तरोग आणि एड्स सारखे आजार –

किशोरवयीन / पौडांगावस्थेतील मुलींना गुप्तरोग, एच.आय.व्ही. किंवा एड्स सारखे आजार होण्याची शक्यता जास्त असते. विवाह संबंधातील लैंगिक संबंधावर अशा मुलींचे कोणतेही नियंत्रण नसते. त्यांच्या नवऱ्याच्या इच्छेनुसार त्यांना वागावे लागते. अशा परिस्थितीत जरी गुप्तरोग / एच.आय.व्ही. / एड्स अशा आजारांची लागण होण्याची शक्यता असली तरी त्या नवऱ्याच्या इच्छेविरुद्ध वागू शकत नाहीत आणि त्याला विरोध करू शकत नाहीत. तसेच या रोगांची आणि त्यांच्या परिणामांची जागरूकता मुलींमध्ये नसते. NFHS ५ च्या सर्वेनुसार १५-२४ या वयोगटातील केवळ २०.१% महिला/मुलींना या आजारांबाबत आणि त्यांच्या लक्षणांविषयी माहिती आहे.[१०] त्यामुळे लागण झाली तरी कित्येक दिवस त्यांना त्याबाबत कळत नाही. आणि कळले तरी त्याबाबत बोलायला आणि उपचार घ्यायला त्या काचरतात. परिणामी रोग बळावत जातो आणि जास्त गंभीर स्वरूपाचे आजार होण्याची भीती देखील वाढत जाते.

### ८. असुरक्षित गर्भपात –

गर्भधारणा झाली आणि ती नको असेल तर वैद्यकीय गर्भपात कायद्याच्या तरतुदीनुसार गर्भपात करता येऊ शकतो. परंतु असा गर्भपात कुठून, कोणाकडून आणि कधी करता येतो याबाबत माहिती मुलींना अथवा कुटुंबियांना देखील नसते. बालविवाह झालेला असताना १८ वर्षांच्या आत मुलगी गरोदर राहिली तर तिला रुग्णालयात नेणे टाळले जाते. कारण रुग्णालयात नेले आणि मुलीचे खरे वय लक्षात आले तर गुन्हा नोंदवला जाऊ शकतो. त्यामुळे एखाद्या भोंदू वैद्या मार्फत किंवा अप्रशिक्षित वैद्यकीय व्यवसायिका मार्फत असे गर्भपात केले जातात. असुरक्षित गर्भपात हे अप्रशिक्षित व्यक्ती, चुकीची उपकरणे वापरून, मुलीची / महिलेच्या सुरक्षिततेची कोणतीही काळजी न घेता करतात ज्यामुळे महिलेला इजा, जंतुसंसर्ग होऊ शकतो किंवा तिचा मृत्यूदेखील होऊ शकतो. नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे - ५ च्या आकडेवारीनुसार देशात दरवर्षी होणाऱ्या गर्भपातांपैकी २६.२ % गर्भपात हे घरी होतात. म्हणजेच गर्भपातासाठी तरूणी / महिला या रुग्णालयात जात नाहीत, उलट ही वैद्यकीय प्रक्रिया घरीच करतात. शहरांमध्ये २१.६ % टक्के गर्भपात महिला स्वत: करतात, तर ग्रामीण भागातील महिलांचा हा आकडा ३० % इतका आहे.[११] संयुक्त राष्ट्रांच्या वर्ल्ड पॉप्युलेशन रिपोर्ट २०२२ नुसार, असुरक्षित गर्भपाताशी संबंधित कारणांमुळे भारतात दररोज सुमारे ८ महिला मृत्यूमुखी पडतात. त्याशिवाय असुरक्षित गर्भपात हे भारतातील मातामृत्यूचे तिसरे प्रमुख कारण आहे. या रिपोर्टनुसार, २००७ ते २०११ या कालावधीदरम्यान भारतातील 67 टक्के गर्भपात हे असुरक्षित होते.[१२]

---

[९] Maternal Mortality Ratio (MMR) from 130 in 2014-16 to 97 per lakh live births in 2018-20, from

https://pib.gov.in/PressReleaseIframePage.aspx?PRID=1879912#:~:text=Significant%20Decline%20in%20the%20Maternal%20Mortality%20Ratio%20from%20130%20in,live%20births%20in%202018%2D20

[१०] NATIONAL FAMILY HEALTH SURVEY (NFHS-5), 2019-21 INDIA VOLUME I MARCH 2022, PAGE 531. (n.d.). Ministry of Health and Family Welfare, International Institute for Population Sciences (Deemed University). http://rchiips.org/nfhs/NFHS-5Reports/NFHS-5_INDIA_REPORT.pdf

[११] NATIONAL FAMILY HEALTH SURVEY (NFHS-5), 2019-21 INDIA VOLUME I MARCH 2022, PAGE 237. Ministry of Health and Family Welfare, International Institute for Population Sciences (Deemed University). http://rchiips.org/nfhs/NFHS-5Reports/NFHS-5_INDIA_REPORT.pdf

[१२] State of the World Population Report 2022: Seeing the Unseen.

https://www.dw.com/en/india-why-are-women-seeking-unsafe-abortions/a-61464727. https://india.unfpa.org/en/publications/state-world-population-report-2022-seeing-unseen

### ९. मानसिक आरोग्यावरील परिणाम –

कमी वयातील लग्न, शिक्षणाचा अभाव, गरिबी, आर्थिक परावलंबन, असमानतेचे वातावरण, स्वतःचे निर्णय घेण्याची बंदी, लैंगिक शोषण आणि वयाची अपरिपक्वता या मुळे मनावर ताण येऊन अनेक मुलींचे मानसिक आरोग्य बिघडते. चिंतेच्या आणि नैराश्याच्या त्या शिकार होतात आणि त्यांची अवस्था अजूनच बिकट होते.

### १०. परावलंबित्व –

शिक्षणापासून वंचित राहिल्याने अर्थार्जनासाठी लागणारे कौशल्य अशा मुलींमध्ये विकसित होऊ शकत नाही. आयुष्यभर आर्थिक बाबींसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते. हे आर्थिक अवलंबित्व आर्थिक बाबींसाठी मर्यादित न राहता इतर गोष्टीं साठी सुद्धा असते. 'तुला काय माहिती', 'तुला काही कळत नाही' अशी वाक्य तिला वारंवार ऐकावी लागतात. मुलं हवी का, किती, केव्हा, गर्भ निरोधकाचा वापर, गर्भपात, गर्भलिंग निदान, लैंगिक संबंधाला नाही म्हणणे, मुलांना कसे वाढवावे, अशा गोष्टींबाबत देखील त्यांना घरात समान पातळीवर सहभाग घेणे अवघड होते आणि हे सगळे निर्णय त्यांच्यावर थोपवले जाऊ लागतात.

### ११. हिंसा –

कोणत्याही विवाह संबंधांमध्ये स्त्रियांना कौटुंबिक, लैंगिक, शारिरीक, मानसिक, आर्थिक हिंसेला तोंड द्यावे लागते. पण बालविवाह झाला असेल तर त्याचे प्रमाण जास्त असण्याची शक्यता असते. शिक्षण आणि स्वातंत्र्याच्या अभावामुळे शारिरीक, मानसिक, सर्वात्मिक विकासात अडथळे निर्माण होतात. परिणामी अर्थार्जनासाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांचा विकास होऊ शकत नाही. त्यांची उपयुक्तता कमी होते आणि त्यामुळे भेदभावाला आणि हिंसेला त्यांना बळी जावे लागते.

### १२. बालविवाहाचे इतर परिणाम –

वर नमूद केलेल्या परिणामांबरोबर इतर अनेक परिणाम बाल विवाहामुळे होतात. जसे की, लवकर विवाह झाल्यामुळे या मुलींना शिक्षण सोडावे लागते. शिक्षणासारख्या मुलभूत आणि आवश्यक विषयाचे आकलन न झाल्यामुळे त्यांना स्वतःचे आयुष्य हवे तसे घडवता येत नाही. शिक्षणामुळे येणाऱ्या व्यावहारिक ज्ञानापासून देखील त्या वंचित राहतात. निर्णय स्वातंत्र्य, आर्थिक क्षमता, शिक्षण या सगळ्यांचा अभाव असल्यामुळे अशा मुली / महिला भेदभाव आणि हिंसेच्या दुष्टचक्राला बळी पडत जातात. समाजाचा एक महत्त्वाचा घटक प्रगती मध्ये आपले योगदान करू शकत नसल्यामुळे सामाजिक प्रगती देखील पूर्ण क्षमतेने होताना दिसत नाही. घरातील / कुटुंबातील / मुलां बाबतीतील निर्णय होत असताना अशा मुलींचा समान सहभाग अवघड असतो.

तर वरील परिणाम बघता आपल्या लक्षात येईल की कायदा सांगतो म्हणूनच फक्त बालविवाह टाळणे गरजेचे आहे असे नाही. वरील परिणामांपासून मुला-मुलींना, कुटुंबाला आणि समाजाला वाचवायचे असेल तर बालविवाहांवर आळा घातलाच पाहिजे.

# ६ बालविवाहाबाबत समज आणि गैरसमज......

आपण समजून घेऊयात काय आहेत बालविवाह होण्यामागील समज आणि गैरसमज आणि त्या मागील तथ्य.

**गैरसमज – बालविवाह ही एक सामाजिक प्रथा आहे आणि तिचा आपण सन्मान केला पाहिजे.**

**तथ्य** - काही समूहात बालविवाह परंपरेने चालत आलेले आहेत. त्यामुळे बालविवाहाला संस्कृतीचे अविभाज्य अंग मानले गेले, पण संस्कृतीने चालत आलेल्या सर्वच प्रथा समाजासाठी चांगल्या असतात असे नाही. तशीच बालविवाह एक कु-प्रथा आहे. बालविवाह हा मुलींच्या शिक्षणात त्यांच्या आर्थिक प्रगतीत अडसर निर्माण तर करतोच मात्र बालकांचे आरोग्य आणि संरक्षण ह्या गोष्टी देखील बाल विवाहामुळे धोक्यात येतात.

**गैरसमज – बालविवाह केवळ मुलींचा होतो.**

**तथ्य** - बालविवाह हा मुलींचा आणि मुलांचा दोघांचा होतो. परंतु मुलींचे लग्न कमी वयात झाले तर त्याचे जास्त गंभीर परिणाम मुलींवर होतात. कमी वयात मुलांचे लग्न झाल्यानंतर त्यांना कुटुंबाची जबाबदारी सांभाळण्याकरीता जबाबदार धरले जाते. ही बाब मुलांच्या शिक्षणासाठी अडचणीची ठरते.

**गैरसमज – बालविवाह हा कुटुंबाचा वैयक्तिक मुद्दा आहे, त्याचा आमच्याशी काही सबंध नाही.**

**तथ्य** - बालविवाहाचे दुष्परिणाम हे सर्वांना भोगावे लागतात. शाळा-बाह्य बालके, दारिद्र्य, लैंगिक शोषण ह्या प्रमुख समस्या बालविवाहाशी निगडीत आहेत. बालविवाहामुळे स्त्री –पुरुष समानता देखील प्रभावित होते. त्यामुळे बालविवाहाचा नकारात्मक परिणाम समाजातील सर्व घटकांवर होत असतो. बालविवाहाच्या समस्येला सामुहिक कृतीतून आपण अधिक सक्षमरित्या तोंड देऊ शकतो.

**गैरसमज – बालविवाह ही एक धार्मिक समस्या आहे.**

**तथ्य** - बालविवाह कोणत्याही एका धर्माशी निगडीत नाही. हिंदू, मुस्लिम, शीख, बौद्ध, ख्रिश्चन इत्यादि सर्व धर्मात बालविवाह होतो. त्यामुळे धार्मिक नेतृत्व करणाऱ्यांनी देखील बालविवाहाची चौकशी करून बालविवाह कायद्याची अंमलबजावणी केल्यास बालविवाह थांबविण्यात मदत होऊ शकते.

**गैरसमज – बालविवाह करतेवेळी लग्नाला बाल वधू – वराची संमती असते.**

**तथ्य** - कायद्याप्रमाणे १८ वर्षांखालील मुली आणि २१ वर्षांखालील पुरुष यांना विवाह करण्यास परवानगी नाही. त्यामुळे त्यांच्या संमती कडे कायदा संमती म्हणून बघू शकत नाही. सज्ञान आणि अज्ञान कोण हे कायद्याने ठरवले जाते. विवाहाकरिता कायद्याने घालून दिलेली वयोमर्यादा ही मुलींसाठी १८ आणि मुलांसाठी २१ आहे. त्यामुळे हे वय पूर्ण करण्याच्या आधी दिलेली संमती ही कायद्याने मान्य होणारी नाही.

# ७ मानवी हक्कांच्या चौकटीत बालविवाहाचा प्रश्न

विवाह ही एक सामाजिक संकल्पना असून त्याला शासन व्यवस्थतेचे अधिष्ठान असते. त्यामुळे बालविवाह ही प्रथा सामाजिक न्याय या मूलभूत संकल्पनेवर आघात करते. बालविवाह झालेल्या बालकांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होते व अशा बालकांच्या सर्वांगीण विकासामध्ये या मुळे बाधा उत्पन्न होते. यामुळे बालविवाहासारख्या प्रथांवर बंदी घालणे गरजेचे ठरते.

**मानवी हक्क म्हणजे काय ?**

बालविवाहांमुळे होणाऱ्या बालकांच्या मानवी अधिकारांचे उल्लंघन समजून घेण्यासाठी मानवी हक्क/अधिकार ही संकल्पना समजून घेणे गरजेचे ठरते. मानवी हक्क म्हणजे असे हक्क जे माणसाला माणूस म्हणून मिळतात. सर्व मनुष्य हे जन्मतःच त्यांच्या हक्कांमध्ये व अधिकारांमध्ये समान आहेत. प्रत्येकात काही गुण असतात. त्या गुणांचा विकास होण्यासाठी प्रत्येकाला समान संधीची आवश्यकता असते. मानवी हक्क हे अशा संधी कोणत्याही जात, धर्म, लिंग भेदाशिवाय सर्वांना उपलब्ध करून देण्याचे काम करतात. हे अधिकार प्रत्येक मनुष्याला जन्मतःच मिळतात. हे अधिकार कोणत्याही समाजाने किंवा राज्यकर्त्यांने दिलेले नसतात. त्यामुळे ते मनुष्यापासून हिरावून घेतले जाऊ शकत नाहीत. मानवी हक्क हे सार्वत्रिक (युनिव्हर्सल) आहेत. मानवी हक्क ही संकल्पना प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. काळाच्या विविध टप्प्यांवर तिचा विकास झालेला दिसून येतो. प्राचीन काळी मानवी हक्क हे मनुष्याचे नैसर्गिक हक्क म्हणून ओळखले जात.

परंतु दुर्दैवाने मानवी हक्कांची व मानवी प्रतिष्ठेची ऐतिहासिक काळापासून पायमल्ली होत असेलेली दिसून येते. मानवी समतेचे मूल्य हे सर्व समाजांनी पूर्वीच स्वीकारले असले तरीही अज्ञानामुळे, पूर्वग्रहांमुळे, खोट्या समजुतींमुळे आजही समाजात भेदभाव दिसून येतो व असमानतेचे समर्थन केले जाते. अशा समर्थनामुळे गुलामगिरी, लिंग, वंश, जात, धर्म आधारित भेदभाव हा पूर्वीपासून आत्तापर्यंत होताना दिसून येतो.

**आंतरराष्ट्रीय करारांचे महत्व.**

मानवी हक्क सुरक्षित करण्याचे प्रयत्न हे आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेले दिसून येतात. दुसऱ्या महायुद्धानंतर मानवी अधिकारांचे महत्व वाढलेले दिसते. संयुक्त राष्ट्रांनीही मानवी अधिकारांचा वैश्विक जाहीरनामा १० डिसेंबर १९४८ रोजी जाहीर केला. यात मानवाला आवश्यक असलेल्या स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या तत्वांचा त्यात समावेश करण्यात आला आहे. हा जाहीरनामा अनेक देशांच्या संविधान निर्मिती मध्ये प्रभावी ठरला आहे. तसेच अनेक देशांच्या न्याय प्रक्रियेसाठी मार्गदर्शक ठरला आहे.

मानवी हक्कांची जपणूक करण्याची जवाबदारी ही राज्य संस्थेवर असते. आंतरराष्ट्रीय मानवी हक्कांचा कायदा हा राष्ट्रांना शिक्षा करण्यासाठी नसून तो राष्ट्रांकडून आंतराराष्ट्रीय मानवी हक्कांच्या पालनाची अपेक्षा करतो. एखाद्या राष्ट्राने एखाद्या आंतराराष्ट्रीय मानवी हक्कासंबंधी कराराला मान्यता दिल्यानंतर त्या करारातील तरतुदी त्या राष्ट्रावर बंधनकारक ठरतात. त्या तरतुदींचे पालन करण्याची जबाबदारी त्या राष्ट्रावर असते. अशा मानवाधिकारांच्या करारांना मान्यता देऊन राष्ट्रे त्यातील तरतुदींचे पालन करण्यासाठी व मानवाधिकाराचे रक्षण करण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी बांधिल असतात. त्याचप्रमाणे जर मानवी हक्कांचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन घडल्यास त्याचा तपास करून अपराध्याला शासन करण्याचीही जबाबदारी असते.

बालविवाह घडल्यानंतर, जर राज्यसंस्था त्या विरोधात कोणतीही उपाययोजना करत नसेल, तसेच, दोषींना शासन करत नसेल तर अशा बालविवाहांची जबाबदारी ही त्या राज्यसंस्थेवर येते. बालविवाहांमुळे मानवी हक्कांचे उल्लंघन घडत असल्यामुळे नागरिकांच्या मानवी हक्कांचे संरक्षण न करता आल्यामुळे राज्यसंस्था अशावेळी जबाबदार ठरते. सर्व प्रकारचे मानवी हक्क हे आंतरराष्ट्रीय करारांना मान्यता दिलेल्या राष्ट्रांवर तीन स्तरांवर बंधनकारक असतात.

१) राष्ट्रांवर अशा मानवी हक्कांचा सन्मान करण्याचे तसेच ते पुरेपूर वापरता येतील हे पाहण्याचे बंधन असते. (Obligation to respect)

२) राष्ट्रांवर अशा मानवी हक्कांचे संरक्षण करण्याचे बंधन असते. (Obligation to protect)

३) राष्ट्रांवर अशा मानवी हक्कांच्या संपूर्ण अंमलबजावणी साठी उपाय योजना करण्याचेही बंधन असते. (Obligation to fulfil)

**सन्मान करण्याचे बंधन:** या बंधनामध्ये मानवी हक्कांच्या उपभोगावर कोणत्याही प्रकारचे निर्बंध न लादण्याचे बंधन राज्यसंस्थेवर आहे. एखाद्या राष्ट्राने जर मानवी हक्कांच्या उपभोगावर निर्बंध घालणारा कायदा पारित केला तर ते या बंधनाचे उल्लंघन मानले जाऊ शकते.

**संरक्षण करण्याचे बंधन:** या बंधनामध्ये मानवी हक्कांच्या जपणुकीसाठी राज्यसंस्थेने उपाययोजना करणे अपेक्षित आहे. नागरिकांकडून वंचित आणि दुर्बल घटकांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होऊ नये म्हणून राज्यसंस्थेने उपाययोजना करणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, बालविवाहामुळे बालकांच्या मानवी हक्कांचे होणारे उल्लंघन रोखण्यासाठी ठोस उपाय करणे हे या बंधनामध्ये अभिप्रेत आहे.

**उपभोगासाठी उपाय योजना करण्याचेही बंधन:** आंतराराष्ट्रीय करारांना मान्यता दिलेल्या राष्ट्रांवर मानवी हक्कांच्या संपूर्ण पूर्ततेसाठी योग्य ते कायदे पारित करण्याचे तसेच प्रशासकीय, आर्थिक उपाययोजना करण्याचे बंधन असते. उदाहरणार्थ बालहक्कांच्या संदर्भात बोलायचे झाल्यास राष्ट्रांवर त्यांचा शिक्षणाचा हक्क सुरक्षित करण्यासाठी कायदा पारित करून अनिवार्य शिक्षण देणे हे बंधनकारक आहे.

आंतराराष्ट्रीय स्तरावर सुद्धा अनेक मानवाधिकार विषयक करार आहेत जे बालविवाहाला प्रतिबंध करतात. यातील बहुतेक करार हे १९४८ साली संमत करण्यात आलेल्या मानवी अधिकारांच्या वैश्विक जाहीरनाम्यावर आधारित आहेत. **मानवी हक्कांचा वैश्विक जाहीरनाम्यातील कलम १६(१)** हे बाल विवाहाच्या संदर्भात विशेष महत्वाचे आहे. या कलमानुसार सर्व प्रौढ स्त्री व पुरुषांना कोणत्याही वांशिक, धार्मिक, नागरिकत्वाच्या बंधनाशिवाय लग्न करण्याचा व कुटुंब स्थापण्याचा अधिकार आहे. स्त्री व पुरुषांना विवाहा संदर्भात समान अधिकार असतील. **कलम १६(२)** नुसार विवाह करू इच्छिणाऱ्या जोडप्याच्या संपूर्ण सहमती शिवाय विवाह होऊ शकत नाही.

१६ डिसेंबर १९६६ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या आम सभेने दोन आंतरराष्ट्रीय करार मान्य केले. यातील पहिला म्हणजे नागरी आणि राजकीय हक्कांवरील आंतराराष्ट्रीय करार आणि दुसरा म्हणजे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांवरील आंतराराष्ट्रीय करार होय. या दोन्ही करारांच्या तरतुदी ज्या देशांनी या करारांना मान्यता दिली आहे त्या देशांवर बंधनकारक आहेत. यातील मानवी हक्कांची अंमलबजावणी करणे हे त्या राष्ट्रांवर बंधनकारक आहे. भारताने या दोन्ही करारांना मान्यता दिली आहे. या दोन्हीही आंतराराष्ट्रीय करारांच्या तरतुदी भारतावर बंधनकारक आहेत. हे दोन्ही आंतरराष्ट्रीय करार अनुक्रमे मानवी हक्कांच्या वैश्विक जाहीरनाम्यात असलेल्या नागरी व राजकीय तसेच आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांचं संरक्षण करतात. यातील **नागरी आणि राजकीय हक्कांवरील कराराच्या कलम २३** नुसार सर्व प्रौढ स्त्री व पुरुषांना लग्न करण्याचा व कुटुंब स्थापण्याचा अधिकार आहे. स्त्री व पुरुषांना विवाहा संदर्भात समान अधिकार आहेत. तसेच, विवाह करू इच्छिणाऱ्या जोडप्याच्या संपूर्ण सहमती शिवाय असा विवाह होऊ शकत नाही.

आंतरराष्ट्रीय स्तरावर **महिलांविरुद्ध सर्व प्रकारच्या भेदभावाचे निर्मूलन करणारा करार १९७९** साली संयुक्त राष्ट्रांनी मान्य केला. भारताने सुद्धा या कराराला मान्यता दिली असून यातील तरतुदी या भारतावर बंधनकारक आहेत. या करारात एकूण तीस कलमे आहेत. या कराराचा मुख्य उद्देश हा स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये समता प्रस्थापित करणे तसेच महिलांविरोधात होणारा सर्व प्रकारच्या भेदभावाचे, ज्यामध्ये बळजबरीने विवाह करायला लावणे, कौटुंबिक हिंसाचार, शिक्षणापासून तसेच आरोग्य सेवांपासून व सार्वजनिक जीवनापासून वंचित ठेवणे आणि कामाच्या ठिकाणी होणाऱ्या भेदभावाचा समावेश आहे. या करारातील **कलम २(फ) आणि ५** एकत्रित वाचल्यास या कराराला मान्यता दिलेल्या राष्ट्रांवर त्या राष्ट्रातील वैयक्तिक, कौटुंबिक कायदे सुधारण्याचे बंधन आहे. या कलमानुसार स्त्रियांविरोधातील सर्व प्रकारचा भेदभाव नष्ट

करण्याचे बंधन आहे. कारण अशा अनेक भेदभावजनक रूढी आणि प्रथा वैयक्तिक, कौटुंबिक कायद्याचा भाग आहेत. उदाहरणार्थ, भारतामध्ये मुलींचे लहान वयात लग्न लावून देणे या रुढींवर बंदी असली तरीही असा विवाह हा बेकायदेशीर अथवा गैर ठरत नाही. भारताने या कराराला मान्यता दिल्यामुळे असे कायदे बदलण्याचे भारतावर बंधन आहे.

संयुक्त राष्ट्रांनी बालकांवर होणारे विविध प्रकारचे अत्याचार रोखण्यासाठी **१९८९** साली **बालकांच्या हक्कांवरचा करार** मान्य केला. भारतानेही हा करार मान्य केला आहे. या कराराची मुख्य उद्दिष्टे बालकांचे असणारे मानवी हक्क सुरक्षित करणे व बालकांवर होणारे अत्याचार रोखणे तसेच बालकांबरोबर केला जाणारा भेदभाव रोखणे ही आहेत. या करारातील ५४ कलमे ही त्या देशांवर बंधनकारक आहेत ज्यांनी या कराराला मान्यता दिली आहे. या कराराच्या **कलम १** मध्ये बालकांची व्याख्या केली आहे. त्यानुसार १८ वर्षांखालील प्रत्येक व्यक्तीस बालक समजले जाते. पण एखाद्या देशाच्या राष्ट्रीय कायद्यानुसार १८ वर्षे ही वयाची मर्यादा आणखी कमी सुद्धा केली जाऊ शकते. ही मुभा जरी देण्यात आली असली तरीही कोणत्याही देशाला किमान वय हे १६ वर्षाच्या खाली नेता येणार नाही अशी तरतूद आहे. बालकांची व्याख्या करण्याबरोबरच हा करार चार प्रमुख तत्वे मांडतो. यातले **पहिले तत्व** म्हणजे कराराला मान्यता दिलेल्या देशांनी बालकांमध्ये भेदभाव करता कामा नये. **दुसऱ्या तत्वानुसार** कराराला मान्यता दिलेल्या देशांनी त्यांचे राष्ट्रीय कायदे बनवताना बालकांच्या हिताला प्राधान्य दिले पाहिजे. **तिसऱ्या तत्वानुसार** कराराला मान्यता दिलेल्या देशांनी बालकांच्या शारीरिक, बौद्धिक, भावनिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाची जबाबदारी घेतली पाहिजे. **चौथ्या तत्वानुसार** बालकांना त्यांची मते मांडण्याचा अधिकार आहे. त्यांच्या मतांचा बालकांची वये विचारात घेता सन्मान ठेवला पाहिजे. हा करार जरी बालविवाहाच्या प्रथेवर थेटपणे बंदी घालत नसला तरीही हा करार लिंगाधारित भेदभाव तसेच वयाबाबत होणाऱ्या भेदभावावर बंदी घालत असल्यामुळे या कराराला मान्यता दिलेल्या राष्ट्रांवर बालविवाह रोखण्यासंबंधी उपाययोजना करण्याचे बंधन आहे असे मानता येते.

या शिवाय **विवाह संमती व विवाहासाठी किमान वयाचा तसेच विवाहाच्या नोंदणी संबंधीचा करार १९६२** साली संमत करण्यात आला. बालविवाह रोखण्यासाठी हा करार एक प्रमुख साधन आहे कारण या करारान्वये, हा करार मान्य केलेल्या राष्ट्रांवर विवाहासाठी किमान वय ठरवणे तसेच विवाहांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. दुर्दैवाने भारताने या कराराला मान्यता न दिल्यामुळे या करारातील तरतुदी भारतावर बंधनकारक नाहीत.

**बालविवाहामुळे होणारे मानवी हक्कांचे उल्लंघन**

बालविवाहामुळे मोठ्या प्रमाणावर मानवी हक्कांची पायमल्ली होते. बालविवाहामुळे प्रामुख्याने पुढील प्रकारच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होते.

**जगण्याचा व सन्मानाने जगण्याचा हक्क:** जगण्याचा हक्क हा सर्व मानवी हक्कांमधला प्राथमिक हक्क आहे. या हक्कांशिवाय इतर मानवी हक्क हे मनुष्याला सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक असे आहेत. भारतीय संविधानाने सुद्धा कलम २१ खाली ह्या हक्काला मान्यता दिली आहे. परंतु बालविवाहामुळे हा हक्क धोक्यात येतो. बालविवाहमुळे माता मृत्यूंच्या प्रमाणात वाढ होते व त्यांच्या जगण्याच्या हक्कात बाधा उत्पन्न होते.

**समतेचा हक्क:** समतेचे तत्व हे सर्व मानवी हक्कांचा गाभा आहे. विविध आंतरराष्ट्रीय करारांनी या तत्वाला मान्यता दिली आहे. या हक्काचे उल्लंघन मुलींच्या बाबतीत मुलग्यांच्या तुलनेत अधिक होते. विवाहाच्या किमान वयाचा विचार करता मुलींसाठी मुलग्यांपेक्षा वेगळे वय असणे हे समतेच्या हक्काला मारक ठरते. यामुळे मुलींच्या बाबतीत लिंगाधारित भेदभाव केला जातो. भारतीय संविधानाने सुद्धा समतेच्या हक्काचा स्वीकार केलेला आहे. संविधानाच्या कलम १४ नुसार प्रत्येक व्यक्ती ही कायद्यासमोर समान असते व तिला कायद्याचे समान संरक्षण दिले गेले पाहिजे. आज भारतामध्ये कायद्याने बालविवाहाला बंदी असली तरीही या प्रथेचे अजून तरी भारतातून समूळ उच्चटन होऊ शकलेले नाही.

**स्वातंत्र्याचा व सुरक्षिततेचा हक्क:** मानवी हक्कांच्या वैश्विक जाहीरनाम्याचा कलम ३ अन्वये प्रत्येकाला स्वातंत्र्याचा व सुरक्षिततेचा हक्क आहे. बालविवाहामुळे या हक्कावर बाधा येते. बालकांना असे बालविवाह नाकारण्याचा अधिकार मिळत नसल्याने तसेच असा विवाह त्यांच्यावर लादण्यात आल्याने त्यांना त्यांचा जोडीदार निवडण्याचा अधिकार गमवावा लागतो.

त्याचप्रमाणे स्वतःचे भविष्य ठरवण्याचा अधिकार देखील अशी बालके गमावून बसतात. अशा बालकांचे पालक बालकांच्या लग्न करण्याच्या व जोडीदार निवडण्याच्या स्वातंत्र्यावर घाला घालतात. भारतीय संविधानाच्या कलम २१ अन्वये जगण्याच्या अधिकाराबरोबरच स्वातंत्र्याचा हक्क ही देण्यात आलेला आहे.

**गुलामगिरी मुक्त जीवनाचा हक्कः** बालविवाह हा केवळ स्वातंत्र्याच्या व सुरक्षिततेच्या हक्काचे उल्लंघन न करता बालकांना, विशेषतः मुलींना गुलामगिरीत ढकलतो. बालविवाहामुळे शिक्षणाच्या तसेच उपजीविकेच्या संधी डावलल्या जातात त्यामुळे अशी बालके त्यांच्या पालकांवर आणि विवाह झाल्यास नवऱ्यावर अवलंबून राहतात. मुलींना शिक्षणाच्या व उपजीविकेच्या संधी नाकारल्या गेल्यामुळे त्या त्यांच्या नवऱ्यांवर अवलंबून राहतात ज्यामुळे त्यांच्यावर घराची, स्वयंपाकाची व मुले वाढवण्याची जबाबदारी लादण्यात येते व त्यांचे जीवन गुलामगिरीत जखडले जाते. अतिशय कोवळ्या वयात अशा प्रकारच्या जबाबदाऱ्या पेलण्यासाठी त्या शारीरिक, मानसिक दृष्ट्या तयार नसतात. तरी देखील त्यांचेवर या जबाबदाऱ्या येऊन पडतात आणि त्यात त्या जखडल्या जातात. सर्व स्वातंत्र्य त्या गमावून बसतात. ही एका प्रकारची वेठबिगारीच होय. भारतीय संविधानाने कलम २३ मध्ये अशा वेठबिगारीवर बंदी घातली आहे.

**आरोग्याचा हक्कः** आरोग्याचा हक्क हा जगण्याच्या हक्कांशी थेटपणे निगडित आहे. बालविवाहमुळे मुलांवर विशेषतः मुलीच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. मुख्य परिणाम म्हणजे पौगंडावस्थेतील गर्भधारणे सारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. आधी नमूद केल्याप्रमाणे बालविवाहामुळे मातामृत्यूचें प्रमाण वाढते. त्याचप्रमाणे अजाणतेवयात लग्न लादल्यामुळे उच्च रक्तदाब, रक्ताशय सारख्या गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागते. एच. आय व्ही एड्स तसेच लैंगिक संक्रमित रोग होण्याचे प्रमाण वाढते. अशा बालविवाहांमुळे बऱ्याचवेळा असुरक्षित गर्भपाताला मुलींना सामोरे जावे लागते.

**शिक्षणाचा हक्कः** बालविवाहाचा अजून एक गंभीर परिणाम म्हणजे बालकांच्या शिक्षणावर होणारा परिणाम. बालविवाहामुळे शिक्षण खुंटते. विशेष परिणाम हा मुलींच्या शिक्षणावर होतो. शिक्षण थांबल्यामुळे बालकांच्या पुढील प्रगतीच्या संधी तसेच उपजीविकेच्या संधी नाकारल्या जातात.

**भेदभाव न करण्याचा हक्कः** मुलांच्या तुलनेत मुलींचा बालविवाह होण्याचे प्रमाण हे अधिक आहे. अशा मुलीचे बऱ्याच वेळा त्यांच्यापेक्षा वयाने बऱ्याच मोठ्या असलेल्या पुरुषाशी लग्न लावून दिले जाते. त्यामुळे जेव्हा अशा मुलींचे त्यांच्यापेक्षा वयाने मोठ्या पुरुषाशी लग्न लावून दिले जाते तेव्हा त्यांच्या बाबत भेदभाव केला जातो व त्यांच्या हक्कांचे उल्लंघन होते.

**माहितीचा हक्कः** मुलांचे पालक आणि शिक्षक विवाहविषयक योग्य ती माहिती मुलांना देत नाहीत. लैंगिक शिक्षणाबद्दल समाजात आजही उदासीनता आढळून येते ज्याचा सर्वाधिक फटका बालकांना बसतो. अजाणत्या वयात लैंगिक संबंधासाठी बालके तयार नसतात. त्यामुळे त्यांच्या मनावर दूरगामी परिणाम होतात.

# ८ बालविवाह प्रतिबंध कायद्याची वाटचाल

बालविवाहांमुळे होणारे विपरीत परिणाम आपण वर बघितले आहेत. विवाह कोणत्याही परिस्थितीत झाला तरी बालकांचा शारीरक, मानसिक, आर्थिक आणि सर्वांगीण विकास खुंटतो हे आपण बघितले आहे. या समस्येला तोंड देण्याकरिता काही कायदे बनवण्यात आले.

या कायद्यांची प्रामुख्याने सुरवात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात झाली. बाल वधूंचे त्यांच्या पतींकडून होणारे लैंगिक शोषण थांबवणे हा या कायद्यांचा प्रमुख उद्देश होता. तसेच विधवा स्त्रियांची वाढती संख्या कमी करणे हा देखील उद्देश होताच. पती आणि पत्नी यांच्या वयातील अंतर जास्त असल्यामुळे विधवा महिलांची संख्या वाढीस लागली होती. काही धर्मानुसार विधवा विवाह समाजमान्य नसल्याने या विधवांची परिस्थिती अतिशय दयनीय होती.

बालविवाहाचा मुद्दा सर्वात प्रथम भारतीय दंड विधान, १८६० यामधील 'बलात्कार' च्या संबंधित तरतुदी वापरून हाताळण्यात आला. कलम ३७५ अंतर्गत 'बलात्कारा' च्या गुन्ह्याची व्याख्या देण्यात आली. एखाद्या पुरुषाने एखाद्या महिलेच्या इच्छेविरुद्ध आणि तिच्या संमती शिवाय लैंगिक संबंध प्रस्थापित केले तर त्याला गुन्हेगार ठरवून शिक्षा करण्याची तरतूद या कलमांतर्गत करण्यात आली. परंतु, १६ वर्षांपेक्षा कमी वयाच्या महिले बरोबर असे कृत्य झाल्यास तिची संमती होती किंवा नव्हती हे बघणे गरजेचे नव्हते. हे कलम प्राथमिक रित्या पती – पत्नी मधील लैंगिक संबंधाना लागू होत नव्हते. परंतु, जर एखाद्या पुरुषाने आपल्या १० वर्षांपेक्षा कमी वयाच्या पत्नी बरोबर असे संबंध प्रस्थापित केले तर मात्र त्याला 'बलात्कार' समजण्यास मान्यता देण्यात आली होती.

१८८० पासून कलम ३७५ मधील १० वर्षाची वयोमर्यादा वाढवून १२ करण्याची मागणी होऊ लागली. १८९० मध्ये फुलमणी दासी ही ११ वर्षीय पत्नी तिच्या पतीकडून जबरदस्तीने लैंगिकसंबंध केल्यामुळे रक्तस्त्राव होऊन मरण पावली. पतीवर बलात्काराचा आणि खुनाचा गुन्हा दाखल झाला. मात्र पत्नी १० वर्षांच्या वरील असल्याने कोर्टाने त्याची निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणाची गंभीर दखल समाज सुधारक, वैद्यकीय तज्ञ आणि कायदे पंडितांनी घेतली. या प्रकरणानंतर कायद्यातील त्रुटी लक्षात आल्या आणि १८९१ मध्ये कलम ३७५ मधील पत्नीची वयोमर्यादा १० वर्षां पासून वाढवून १२ करण्यात आली. १९२५ मध्ये ही वयोमर्यादा वाढवून १३ आणि १९४९ मध्ये १५ करण्यात आली.

या प्रकरणाचा आणखी एक परिणाम म्हणजे समाज सुधारकांकडून विवाहाची वयोमर्यादा वाढवण्याची मागणी पुढे येऊ लागली. राय साहेब हरबिलास सारडा यांनी फेब्रुवारी १९२७ मध्ये बालविवाहांना बंदी घालणारे विधेयक प्रस्तावित केले. सुरवातीला हा कायदा फक्त हिंदूंसाठी करण्यात आला. त्यात बालविवाह अवैध ठरवण्याची तरतूद करण्यात आली होती ज्याला समाजाकडून विरोध होऊ लागला. सदरील विधेयकातील तरतुदी तपासण्याकरिता संसदीय निवड समिती कडे पाठवण्यात आले. हा कायदा सर्व धर्मांना लागू करावा आणि बालविवाहाच्या वैधतेबाबत कोणतेही भाष्य या कायद्याने करू नये अशी शिफारस या समितीने केली. या कायद्याबरोबरच कलम ३७५ मधील संमतीचे वय वाढवण्यासाठी भारतीय दंड विधानामध्ये सुधारणा करणारे विधेयक प्रलंबित होते. सदरील विधेयक तपासण्याकरिता सरकारने १९२८ मध्ये 'जोशी समिती' नेमली. सदरील समितीने लैंगिक संबंधाना संमती देण्याचे वय आणि विवाहाचे वय हे दोन्ही एकमेकांशी अतिशय निगडीत असल्याचे नमूद केले. कलम ३७५ मधील वयोमर्यादा १५ करण्याची शिफारस केली. तसेच कोणालाही १४ वर्षांखाली वय असताना विवाह करण्यापासून प्रतिबंध करण्याची आणि असा विवाह केल्यास दंड करण्याची शिफारस केली. भरपूर चर्चेनंतर शेवटी सारडा कायदा – बालविवाह प्रतिबंध कायदा १९२९ साली पारित झाला.

सुरवातीला विवाहाची वयोमर्यादा मुलींसाठी १४ आणि मुलांसाठी १८ ठरवण्यात आली. कालांतराने त्यात सुधारणा करण्यात आली.

सारडा कायद्यामध्ये अनेक त्रुटी होत्या. त्या काळच्या सामाजिक परिस्थितीला अनुरूप एवढ्याच मर्यादित तरतुदी त्यात केल्या होत्या. परंतु, या कायद्याचे महत्त्व दुर्लक्षित करण्याजोगे नाही. विवाहाला कायद्याने वयोमर्यादा घालणे आणि बालविवाह करण्याला गुन्हा ठरवणे ही दोन्ही महत्त्वाची कामे या कायद्याने केली.

| साल | मुलींसाठी विवाहाची वयोमर्यादा | मुलांसाठी विवाहाची वयोमर्यादा |
|---|---|---|
| १९२९ | १४ | १८ |
| १९४९ | १५ | १८ |
| १९७८ | १८ | २१ |

# ९ बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ च्या तरतुदी

बालविवाहांचे प्रतिबंध करण्याकरिता कायदा असताना देखील बालविवाहांची संख्या फारशी कमी होताना दिसत नव्हती. कायद्याच्या तरतुदी बदलण्याची गरज विविध स्तरावरून होऊ लागली. १९९५-९६ साली राष्ट्रीय महिला आयोगाने आणि २००१-२००२ साली राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने आपल्या वार्षिक अहवालामध्ये काही महत्त्वाच्या सुधारणा सुचवल्या. सदरील सूचनांचा विचार करून केंद्र सरकारने १९२९ सालचा बालविवाह प्रतिबंध कायदा रद्द करून नवीन कायदा पारित करण्याचा निर्णय घेतला. २००६ साली नवीन बालविवाह प्रतिबंध अधिनियम पारित करण्यात आला आणि तो १० जानेवारी २००७ पासून अंमलात आलेला आहे. २००६ च्या कायद्यामध्ये १९७८ साली ठरवण्यात आलेली वयोमर्यादा कायम ठेवण्यात आली आहे.

**हा कायदा कोणाला लागू होतो?**

दिनांक १० जानेवारी २००७ पासून हा कायदा अस्तित्वात आलेला आहे आणि संपूर्ण भारतभर हा कायदा लागू आहे. हा कायदा सर्व जाती, धर्म, जमातीं आणि पंथांमधील लोकांना लागू होतो.

**बालक कोण?**

या अधिनियमाच्या कलम २ च्या उपकलम (क) नुसार एकवीस वर्ष पूर्ण न झालेला पुरुष आणि अठरा वर्ष पूर्ण न झालेली स्त्री यांना बालक म्हटले आहे. तसेच कायद्यामध्ये 'अज्ञान व्यक्ती' ही संकल्पना स्वतंत्रपणे देण्यात आली आहे. त्यानुसार १८ वर्षांखालील व्यक्तीला अज्ञान व्यक्ती मानले गेले आहे.

**बालविवाह म्हणजे काय?**

ज्यांचा विवाह लावण्यात येत आहे किंवा लावण्यात येणार आहे असा कोणताही पक्ष विवाहपक्ष म्हणून ओळखला जातो. विवाह करत असताना कोणताही एक पक्ष जर बालविवाह प्रतिबंध अधिनियमानुसार बालक असेल तर असा विवाह बालविवाह मानला जातो.

सुनील, वय १९ वर्षे आणि मीना वय १५ वर्षे यांचा विवाह झाला. सदरील विवाह होताना सुनील चे वय २१ पेक्षा कमी आणि मीनाचे वय १८ पेक्षा कमी असल्याने हा विवाह बाल विवाह मानला जाईल. जर विवाह होताना सुनील चे वय २२ असते तरी हा विवाह बाल विवाहाच मानला गेला असता कारण मीना चे वय १८ पेक्षा कमी आहे. तसेच, जर मीना आणि सुनील दोघांचे वय १९ असते तरी हा विवाह बाल विवाहच मानला जाईल कारण सुनील चे वय कायद्यात दिलेल्या वयोमर्यादेपेक्षा कमी आहे.

**वयाची पडताळणी कोण करू शकते?**

बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्याला विवाह होत असलेल्या व्यक्तींच्या वयाची पडताळणी करण्याचा अधिकार दिला आहे. त्याच बरोबर, बाल कल्याण समिती देखील बालकाचे वय निश्चित करू शकते. (महाराष्ट्र बालविवाह प्रतिबंध नियम, नियम क्रमांक ७). वयाबाबत निर्णय देण्याचा अधिकार न्यायालयाकडे सुद्धा आहे.

**वयाची पडताळणी करण्यासाठी कोणते पुरावे ग्राह्य धरता येतील?**

वयाची पडताळणी करण्यासाठी बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्याला खालील पुरावे ग्राह्य धरता येतात:


1. शाळा सोडल्याचा दाखला

2. वर नमूद केलेला दाखला नसल्यास, दहावी चे परीक्षा मंडळाने दिलेले प्रमाणपत्र (**SSC Certificate**)

3. वरील दोन्ही कागदपत्रे नसतील तर, जन्माचा दाखला

4. वर नमूद तिन्ही कागदपत्रे नसतील, तर ते प्रकरण बाल कल्याण समितीकडे वयाची पडताळणी करण्यासाठी पाठवणे गरजेचे आहे.

कोणतीही सक्षम बालविवाह प्रतिबंध यंत्रणा फक्त बालविवाह रोखून किंवा बालविवाह झाल्यास शिक्षा




करण्यापुरती मर्यादित असू शकत नाही. बालविवाह होऊ नये या करिता तर कायद्यामध्ये तरतुदी आवश्यक आहेतच, परंतु जर बालविवाह झालाच तर काय करता येऊ शकते याबाबत देखील कायद्यामध्ये समावेश असणे आवश्यक आहे.

**A. बालविवाह होऊ नये या करिता काय तरतुदी केल्या आहेत?**

**१) असा विवाह करण्यापासून परावृत्त करण्यासाठी शिक्षेची तरतूद – (कलम – ९,१०,११)**

बालविवाह रोखण्यासाठी म्हणून बालविवाह करण्यात सहभागी असलेल्या व्यक्तींना खालिलप्रकारे शिक्षा होऊ शकते:

a. विवाहाच्या वेळेस मुलाचे वय १८ वर्षांपेक्षा जास्त असेल आणि त्याने बालिकेशी (१८ वर्षांपेक्षा खालील मुलीशी) विवाह केला तर मुलाला शिक्षा होऊ शकते. (कलम ९). म्हणजेच परंतु जर मुलाचे वय २१ पेक्षा कमी असेल आणि मुलीचे वय १८ पेक्षा जास्त असेल तरी त्या मुलीला शिक्षा होऊ शकत नाही.

b. बालविवाह लावून देणारे, प्रवृत्त करणारे अशा सर्वांना शिक्षा होऊ शकते. (कलम १०).

c. बालविवाहास प्रोत्साहन देणारे, विवाह करण्यास परवानगी देणारे, विवाहास प्रतिबंध करण्यात हलगर्जीपणा करणारे, विवाहात सहभागी होणारे, हजर राहणारे असे सर्व शिक्षेस पात्र असतात. (कलम ११) महिलांना मात्र कारावासाची शिक्षा होऊ शकत नाही.

सर्व गुन्हे दखलपात्र आणि अजामीनपात्र आहेत. म्हणजेच

**• शिक्षा कोणाला होऊ शकते?**

- १८ वर्षांखालील मुली सोबत विवाह केलेल्या पुरुषाला, जर विवाह समयी अशा पुरुषाचे वय १८ पेक्षा जास्त असेल तर
- मुला-मुलींच्या आई – वडिलांना, पालकांना आणि लग्नाला प्रोत्साहन देणाऱ्या इतर नातेवाईकांना
- मुला – मुलींचे पालकत्व असणाऱ्या किंवा सांभाळ करत असणाऱ्या संस्थांना जसे की अनाथालय
- विवाहासंदर्भात सेवा देणाऱ्यास उदाहरणार्थ - विवाहासाठीच्या हॉलचे मालक, आचारी, वाजंत्रीवाले, फुलवाले, पत्रिका छापणारे वगैरे
- विवाह लावून देणारे पुजारी, काझी, फादर
- विवाहाच्या वेळेस उपस्थित असलेले सर्व नातेवाईक, मित्रमंडळी आणि आप्तेष्ठ

अश्या प्रकारचा गुन्हा घडत असल्याची तक्रार पोलीस स्टेशनला कळवली गेली असेल तर त्यांनी ताबडतोब एफ.आय.आर. (FIR) म्हणजेच प्रथम खबरी अहवाल दाखल करून कारवाई करणे गरजेचे असते. तसेच पोलीस संशयितांना अटक देखील करू शकतात. अटक झाल्यास, जामीन फक्त कोर्टाला योग्य वाटले तरच मिळू शकतो.

**२) बालविवाह होत असल्याचे समजल्यास कोर्टाकडून मनाईचा हुकूम मिळवण्याची तरतूद (कलम – १३)**

बालविवाह ठरवला किंवा होत असल्याचे समजले असेल तर असा बालविवाह होऊ नये या करिता कोर्टाकडून मनाईचा हुकूम घेता येतो. असा हुकूम विरुद्ध बाजूला नोटीस देऊन, आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन करता येतो. परंतु, तातडीने हालचाल करणे जिथे गरजेचे असेल, अशा वेळेस नोटीस न बजावता देखील अशा प्रकारचा हुकूम करता येतो.

**मनाईचा हुकूम मिळवण्यासाठीचा अर्ज कोणत्या कोर्टात करावा लागतो?**

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (J.M.F.C.)

**अर्ज कोण दाखल करू शकतात?**

बालविवाह होत / होणार असल्याची खात्री / संशय असणारी कोणतीही व्यक्ती याचिका दाखल करू शकते. सामाजिक संस्था देखील अशी याचिका दाखल करू शकतात. बालविवाह प्रतिबंध

अधिकारी यांना देखील अशी याचिका दाखल करता येते. तसेच, विश्वसनीय माहिती मिळाल्यास, कोर्ट देखील स्वतः अशा प्रकरणांची दखल घेऊ शकते.

**मनाईचा हुकूम असताना विवाह झाला तर काय होते? (कलम – १४)**

मनाईचा हुकूम डावलून जर विवाह झाला तर असा विवाह मूलतःच अवैध ठरतो आणि अशा विवाहाने कोणतेही कायदेशीर पती-पत्नीचे संबंध दोघांमध्ये निर्माण होत नाही. तसेच, मनाईचा हुकूम माहित असताना तो डावलणाऱ्या सर्वांना दोन वर्षांपर्यंत कारावासाची किंवा एक लाखापर्यंत दंडाची किंवा दोन्ही अशी शिक्षा होऊ शकते. सबंधित महिलांना फक्त दंडाची शिक्षा होऊ शकते.

**३) बालविवाह प्रतिबंध करण्याकरिता उभारण्यात आलेली यंत्रणा**

बाल विवाहाचा प्रतिबंध करायचा असेल तर सक्षम यंत्रणा गावां-गावात असणे गरजेचे आहे. त्या करिता विविध यंत्रणा तयार करण्यात आल्या आहेत. यातील खाली नमूद केलेल्या शासकीय यंत्रणांचा समावेश आहे. या शासकीय यंत्रणांना अशासकीय सामाजिक संस्था व सामाजिक कार्यकर्ते वेळोवेळी मदत व सहाय्य करत असतात.


या सर्व यंत्रणांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या आपण विस्ताराने पुढे बघूयात.

**B. बालविवाह झाला असल्यास काय?**


**१) बालविवाह कायद्याने वैध असतो का?**

बालविवाह हा कोणत्या परिस्थितीत झाला आहे त्यावर त्याची वैधता अवलंबून असते. काही वेळा बालविवाह वैध असला तरी कोर्टात याचिका दाखल करून तो रद्दबातल करण्याजोगा असतो. तर काही परिस्थितीत झालेला बालविवाह मात्र मूलतःच अवैध असतो .

बालविवाह प्रतिबंध अधिनियम **कलम ३** नुसार बालविवाह कायद्याने रद्दबातल करण्या जोगा विवाह असतो. जी व्यक्ती विवाह समयी बालक होती ती व्यक्ती सज्ञान झाल्यापासून (१८ वर्षे पूर्ण झाल्यावर) दोन वर्षात हा विवाह रद्दबातल करून घेऊ शकते.




[१२] ए.आय.आर. २०१२ मद्रास ६२




**टी. शिवकुमार वी. पोलीस इन्स्पेक्टर**[११] या दाव्यात मद्रास उच्च न्यायालयाने बालविवाह हा पूर्णपणे अवैध नसला तरी पूर्णपणे वैध देखील नाही असे नमूद केले आहे. त्यामुळे अशा विवाहात जी व्यक्ती 'बालक' असेल तिला एका वैध विवाहातील सर्व हक्क प्राप्त होतील मात्र जी व्यक्ती 'बालक' नाही तिला सदर विवाह संबंधातून मर्यादित हक्कच निर्माण होऊ शकतील. अशा 'बालक' नसलेल्या व्यक्तीवर विवाह संबंधातून निर्माण होणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या मात्र तशाच राहणार आहेत. त्यामुळे जर विवाह समयी स्त्रीचे वय १८ वर्षापेक्षा कमी असेल आणि पुरुषाचे वय २१ पेक्षा जास्त असेल, तर स्त्री 'बालक' असल्यामुळे तिला सर्व वैवाहिक हक्क प्राप्त होतील, मात्र पुरुषाला मर्यादित हक्कच मिळतील. त्याच्यावर पत्नीला सांभाळण्याची, पोटगी देण्याची, तिच्या राहण्याची सोय करण्याची, इत्यादी जबाबदाऱ्या राहतील. जर पत्नी पती बरोबर राहत नसेल तर तिने त्याच्या बरोबर राहावे यासाठी कोर्टाचा हुकूम तो मिळवू शकणार नाही.

**कलम १२** नुसार जर विवाह होताना बालक अज्ञान (१८ वर्षांपेक्षा खालील मुलगा / मुलगी) असेल आणि खालील पैकी कोणत्याही परिस्थितीत विवाह झाला असेल तर सदरील विवाह मूलतः अवैध (void) मानला जातो:

- अपहरण करून किंवा भुरळ पाडून कायदेशीर पालकांच्या ताब्यातून बालकाला काढून घेऊन विवाह करण्यात आला असेल,
- जबरदस्तीने अथवा कपटाने बालकाला एखाद्या ठिकाणाहून जायला लावून विवाह करण्यात आला असेल तर,
- विवाहाकरिता बालकाची विक्री करून विवाह करण्यात आला असेल तर,
- विवाह करण्यास भाग पडून नंतर अशा अज्ञान बालकाची विक्री केली असेल, अपव्यापार केला असेल, किंवा अनैतिक कारणांकरिता वापर केला असेल तर.

अनेक बालविवाह हे खरंतर जबरदस्तीने केलेले विवाह असतात आणि त्यामुळे कलम १२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे असे विवाह मूलतः अवैधच असतात. विवाह झाल्यानंतर जर अज्ञान असलेल्या बालकाने विवाह जबरदस्तीने झाला असल्याचे कबूल केले तर विवाह अवैध मानला जाईल आणि दोन्ही पक्षांना वैवाहिक संबंधातून निर्माण होणारे कोणतेही हक्क मिळणार नाहीत.

**कलम १३** अंतर्गत बालविवाह करण्यास कोर्टाने मनाईचा हुकूम दिलेला असेल, तर असा मनाईचा हुकूम डावलून झालेला बालविवाह मूलतः अवैध असतो. अशा विवाहाने कोणतेही कायदेशीर नाते विवाह करणाऱ्या दोन्ही पक्षांमध्ये निर्माण होत नाही.

**२) बालविवाहातून जन्माला आलेले मूल औरस मानले जाते का?**

बालविवाह प्रतिबंध कायद्यातील **कलम ६** नुसार बालविवाह जर कलम ३ अंतर्गत रद्दबातल करण्यात आला तरी अशा विवाहातून कोर्टाचा हुकुम देण्यापूर्वी जन्मलेले किंवा गर्भावस्थेत असलेले (हुकुमनामानंतर जन्माला आले तरीही) कोणतेही अपत्य सर्व हेतूंसाठी औरस मानले जाते.

मीना १५ वर्षांची आहे. तिच्या वडिलांनी तिचा विवाह २३ वर्षीय सुनील बरोबर ठरवला आहे. मीना खूप हुशार आहे आणि तिला शिक्षणाची ओढ आहे. परंतु घराची हलाखीची परिस्थिती बघता तिच्या वडिलांना तिला शिक्षण देणे परवडणारे नाही. त्या पेक्षा विवाह करून सासरी गेली की ते त्यांच्या जबाबदारीतून मुक्त होतील, या विचारातून त्यांनी तिचा विवाह ठरवला. मीनाचा या विवाहाला विरोध होता. त्यामुळे तिला विवाह होण्यापूर्वी घरातून बाहेर निघण्याची पूर्ण बंदी घालण्यात आली होती. तसेच तिला तिच्या मैत्रिणी, शाळेतील बाई, असे कोणाशीही बोलू दिले नाही. अखेर एके दिवशी जबरदस्तीने तिचा विवाह करण्यात आला. सदरील विवाह **'जबरदस्तीने' झाला असल्याने आणि मीनाचे वय १८ पेक्षा कमी असल्याने अवैध होईल.**

मीनाला सिनेमाची भारी आवड. तिचे मामा शहरात कामाला होते. तिच्या मामाने तिला शहरात नेऊन हिरोईन बनवतो असे सांगितले. मीनाला चांगलीच भुरळ पडली. केवळ १६ वर्षांची मीना आपल्या मामाच्या बोलण्यात येवून त्यांच्या बरोबर शहरात आली. शहरात आल्यावर, मामाने शहरातील एका व्यापाऱ्याशी मीनाचे एक लाख रुपये घेऊन लग्न लावून दिले. सदरील विवाह अवैध आहे. मीना कधी पण या विवाहातून स्वतःला मुक्त करून घेऊ शकते. तिला कोर्टाकडून हुकुम घेण्याची देखील गरज नाही.

**३) बालविवाहातून बाहेर कसे पडता येईल?**

**बालविवाह कलम १२ किंवा १४ प्रमाणे मूलतः अवैध असेल तर:**

वर बघितल्या प्रमाणे जोर – जबरदस्तीने किंवा धोक्याने / लग्नाकरिता विकून / अपहरण करून अथवा कोर्टाचा मनाईचा हुकूम अंमलात असताना जर बालविवाह झाला तर असा विवाह हा मूलतःच अवैध आणि बेकायदेशीर मानला जातो. अशा विवाहातून बाहेर पडण्यासाठी कोणतीही कारवाई करणे खरेतर गरजेचे नाही. दोघांपैकी कोणीही कधीही विभक्त होऊ शकते कारण कायद्याला मान्य होईल असे नातेच दोघांमध्ये निर्माण झालेले नाही.

अशा परिस्थितीत महिलेची जास्त कुचंबणा होण्याची शक्यता असते. कारण भारतातील सामाजिक परिस्थिती आणि कायद्याविषयी एकंदरीत जागरूकता बघता, एखादा पुरुष या गोष्टीचा फायदा घेऊन बालविवाहातील आपल्या पत्नीला सहज सोडून दुसरा विवाह करू शकतो. **त्यामुळे जे आई – वडील आपल्या मुलीचे भले व्हावे या करिता तिचा विवाह लवकर करत आहेत त्यांनी विचार करण्याची गरज आहे की अशा विवाहाने खरंच तिचे भले होईल का? तिला तिच्या नवऱ्याने मध्येच सोडून दिले तर त्या मुलीचे पुढे काय होईल हा विचार करणे गरजेचे आहे.** आपली एक चूक आपल्या मुलीचे आयुष्य पूर्णपणे उध्वस्त करू शकते.

**बालविवाह कलम १२ किंवा १४ अंतर्गत झालेला नसेल परंतु बालविवाह असेल तर:**

खरंतर प्रत्येक बालविवाह हा जोर जबरदस्तीने झालेला बालविवाह आहे हे मानले तर प्रत्येक बालविवाह अवैधच असतो. परंतु, जर मुला – मुलीने पळून जाऊन लग्न केले असेल, जिथे कोणतीही जोर – जबरदस्ती नाही, अशा वेळेस या विवाहातून बाहेर पडायचे असल्यास काय करता येईल? असा विवाह दोघांपैकी जी व्यक्ती विवाहाच्या वेळेस 'बालक' म्हणजेच १८ वर्षांपेक्षा कमी वयाची होती, अशी व्यक्ती कोर्टात याचिका दाखल करून विवाह रद्दबातल करून घेऊ शकते.

| | |
|---|---|
| **याचिका कुठे दाखल करावी लागते?** | जिल्हा न्यायालय / कौटुंबिक न्यायालय |
| **याचिका दाखल करण्याची काल मर्यादा काय?** | विवाहाच्या वेळेस जी व्यक्ती 'बालक' होती ती व्यक्ती वयाची २० वर्षे पूर्ण करे पर्यंत अशी याचिका दाखल करू शकते. |
| **याचिका कोण दाखल करू शकते?** | • विवाहाच्या वेळी 'बालक' असलेली व्यक्ती वयाचे १८ वर्षे पूर्ण केल्यानंतर २ वर्षाच्या आत याचिका दाखल करू शकते.<br>• विवाहाच्या वेळी 'बालक' असलेली व्यक्ती आणि बालविवाह प्रतिबंध अधिकारी एकत्रपणे याचिका दाखल करू शकतात.<br>• विवाहाच्या वेळी 'बालक' असलेली व्यक्तीचे वय १८ पेक्षा कमी असेल तर बालविवाह प्रतिबंध अधिकारी आणि अशा 'बालकाचे' पालक किंवा हितचिंतक एकत्र याचिका दाखल करू शकतात. |
| **कोर्टाकडून कोण-कोणते हुकूम मागता येतील?** | • विवाह रद्द करणे<br>• विवाहाच्या वेळेस दिलेला पैसा, मूल्यवान वस्तू, दागदागिने, आहेराच्या वस्तू परत मिळणे किंवा वस्तूंच्या किमती इतकी रक्कम मिळणे<br>• पुनर्विवाह होईपर्यंत विवाहातील स्त्रीसाठी पोटगी मिळणे<br>• पुनर्विवाह होईपर्यंत विवाहातील स्त्रीसाठी निवासाची सोय करणे<br>• बालविवाहातून जन्माला आलेल्या अपत्याचा ताबा मिळणे<br>• बालविवाहातून जन्माला आलेल्या अपत्याला भेटण्याचा अधिकार मिळणे<br>• बालविवाहातून जन्माला आलेल्या अपत्यासाठी पोटगी मिळणे |
| **बालविवाहातील स्त्रियांच्या सुरक्षिततेकरिता काय विशेष तरतूद कायद्यात केलेली आहे?** | बालविवाहातील स्त्रीला पुनर्विवाह होईपर्यंत पोटगी मिळण्याचा अधिकार आहे. तसेच पुनर्विवाह होईपर्यंत तिच्या निवासाची सोय करण्याची जबाबदारी पतीवर आहे. |

**कृपया लक्षात ठेवा:**

**जो बालविवाह मूलतः अवैध नाही पण रद्दबातल करता येतो अशा विवाहाला फक्त स्टॅम्प पेपर वर विवाह रद्द करत असल्याचे नमूद करून विवाह रद्द होणार नाही. कोर्टाचा हुकूम घेणे आवश्यक आहे.**

**४) बालविवाहातून जन्माला आलेल्या अपत्याची काळजी घेणे ही कोणाची जबाबदारी आहे?**

अपत्याची जबाबदारी कायद्याने विवाहातील दोन्ही पक्षांवर टाकलेली आहे. तसेच दोघांच्या पालकांवर देखील अशा बालविवाहातून जन्माला आलेल्या अपत्याची जबाबदारी आहे. बालविवाहातून जन्माला आलेल्या अपत्यासाठी खालील आदेश कोर्टाकडून घेता येतात:

- o अपत्याचा ताबा कोणाकडे असेल?
- o अपत्याला भेटण्याचे अधिकार कोणाला असतील?
- o अपत्याच्या संगोपनासाठी आर्थिक तरतूद कोणी करायची?

वरील कोणताही आदेश करताना कोर्ट 'अपत्याच्या हिताला' प्राधान्य देते. (बालविवाह प्रतिबंध अधिनियम कलम ५ आणि ६)

**५) बालविवाहातील पत्नीच्या संरक्षणाकरिता काय तरतुदी केल्या आहेत? (कलम – ४)**

बालविवाह झाला असल्यास अशा विवाहातील महिला विवाहातून बाहेर पडण्याचा निर्णय सहसा घेऊ शकत नाही. तिच्या मर्जी शिवाय जरी विवाह झाला असला तरी कोर्टात जाऊन सदर विवाह रद्दबातल करून घेण्यासाठी अशा मुली सहसा तयार होत नाहीत कारण त्यांची जबाबदारी स्वीकारायला त्यांचे पालक तयार नसतात आणि तयार असले तरी परिस्थिती इतकी हलाखीची असते की तिचा उदरनिर्वाह होणे देखील कठीण असते. त्यामुळे, खऱ्या अर्थाने जर अशा मुलींना त्यांचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य द्यायचे असेल तर विवाह रद्दबातल करण्याचा निर्णय घेतला तरी त्यांच्या उदरनिर्वाहाची आणि राहण्याची सोय करणे गरजेचे आहे. म्हणूनच कायद्याने हे दोन्ही अधिकार तिला दिले आहेत. तिने जर १८ वर्षे पूर्ण केल्यानंतर या विवाहातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला, तर तिचा पुनर्विवाह होई पर्यंत, ती, तिच्या पती कडून, अथवा तो अज्ञान असल्यास त्याचे आई वडील किंवा पालक यांचेकडून पोटगी व निवासाची सोय करण्याची विनंती कोर्टाला करू शकते. तिचे राहणीमान आणि पोटगी देणाऱ्याचे उत्पन्न लक्षात घेऊन कोर्ट पोटगीची रक्कम ठरवून त्याप्रमाणे आदेश करू शकते. सदर पोटगी व निवासाची सोय तिला विवाह रद्द करून घेण्यासाठीची याचिका दाखल केल्यापासून ते पुनर्विवाह होई पर्यंत मिळू शकते.

# १० बालविवाह प्रतिबंध अधिकारी

बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ मधील कलम १६ (१) नुसार बालविवाह प्रतिबंध अधिकारी हा राज्य शासनामार्फत राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियुक्त करण्यात आलेला जबाबदार अधिकारी आहे. बालविवाह प्रतिबंध अधिकारी हे बालविवाहाच्या समस्येला आळा घालणारी प्राथमिक यंत्रणा आहे.

महाराष्ट्रात शासनातर्फे दिनांक **०३ जून २०१३** रोजी काढण्यात आलेल्या अधिसूचने नुसार ग्रामीण भागासाठी **ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी** यांची ग्रामीण भागासाठी बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. **सबंधित ग्रामपंचायत क्षेत्रात नियुक्त केलेल्या अंगणवाडी सेविका** यांनी बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांस सहाय्य करायचे आहे.

शहरी भागासाठी दिनांक १८ ऑगस्ट २०१६ रोजी काढण्यात आलेल्या अधिसूचने प्रमाणे बालविवाह प्रतिबंध २००६ च्या कलम १६ च्या पोटकलम (१) व (३) अन्वये बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना त्यांच्या प्रकल्प क्षेत्रात बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. तसेच कलम १६ च्या पोटकलम (२) नुसार सबंधित प्रकल्प क्षेत्रात नियुक्त केलेल्या अंगणवाडी पर्यवेक्षिका या बालविवाह रोखण्यासाठी सहाय्य करतील असे आदेश दिलेले आहेत.

महाराष्ट्र शासनाने बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ च्या कलम १९ मधील अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र बालविवाह प्रतिबंध नियम २०२२ पारित केलेले आहेत. तेव्हा पासून खरंतर दिनांक ३ जून २०१३ आणि १६ ऑगस्ट २०१६ च्या अधिसूचना आपोआप रद्दबातल झालेल्या आहेत. आणि बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांची नेमणूक करणाऱ्या नवीन अधिसूचना पारित करणे गरजेचे आहे. त्याबाबत कोणतीही कार्यवाही अद्याप शासनाने केलेली नाही.

# ११ बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांची कर्तव्ये, जबाबदारी आणि भूमिका

"प्रतिबंध आणि "प्रतिसाद" या दोन्ही पातळ्यांवर बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांनी काम करणे अपेक्षित आहे. शहरात किंवा ग्रामीण भागात अशा दोन्ही ठिकाणी बालविवाह थांबविणे किंवा बालविवाह होणार नाहीत या साठी जनजागृती करणे आणि आवश्यक ती सर्व पावले उचलण्याची जबाबदारी प्रामुख्याने यांचेवर आहे.

बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्यांच्या प्रमुख जबाबदाऱ्या सहा भागांमध्ये विभागता येतील:

### १. जनजागृती करणे

बालविवाह प्रतिबंध अधिकारी याचे वर त्याच्या कार्यक्षेत्रात बालविवाह होऊ नये याकरिता जनमाणसांत जनजागृती करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. वेग वेगळ्या माध्यमांचा वापर करून समाजामध्ये बालविवाह आणि त्याची कारणे, परिणाम, बालविवाह गुन्हा असल्याचे माहिती या सर्वांबाबत योग्य ती जागरूकता निर्माण करणे हे त्याचे कर्तव्य आहे. त्याकरिता त्याला वृत्तपत्रे, प्रसार माध्यमे आणि आधुनिक साधनांचा वापर करता येईल. जनजागृती करण्यासाठीचे दीर्घ कालीन मोहिमा आणि नजीकच्या काळात करण्यात येणारी अभियाने याचे त्याने योग्य आखणी आणि नियोजन केले पाहिजे. सदरील मोहिमा आणि अभियाने यात खालील गोष्टींचा समावेश असू शकतो:

- व्याख्याने आयोजित करणे,
- विवाह इच्छुक जोडपे तसेच त्यांचे नातेवाईक यांना बालविवाह प्रतिबंध अधिनियमाची माहिती मिळेल याची व्यवस्था स्थानिक पातळीवर करणे.
- शैक्षणिक संस्थांना जसे की शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांना भेटी देणे,
- समाजातील संबंधित विविध घटकांशी संवाद साधून त्यांना बालविवाह न करणे, न होऊ देणे किंवा बाल विवाहात सहभागी न होणे बाबत समुपदेशन करणे;
- विवाहाची अनिवार्यपणे नोंदणी करण्याबाबत जनजागृती करणे.

अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित करून बालविवाह प्रतिबंध अधिकारी बाल विवाहाच्या प्रश्नाबाबत समाजामध्ये संवेदनशीलता निर्माण करू शकतो.


### २. बालविवाह रोखण्याकरिताच्या जबाबदाऱ्या

बालविवाह प्रतिबंध अधिकारी याने त्याच्या कार्यक्षेत्रात बालविवाह होऊ नये याकरिता शक्य ती पावले उचलणे गरजेचे आहे. बालविवाह होऊ नये याकरिता बालविवाह प्रतिबंध अधिकारी याने खालील प्रकारे भूमिका बजावणे अपेक्षित आहे:

- बालविवाह होण्यापासून रोखणे;
- बालविवाह रोखण्यासाठी काम करत असलेल्यांना मदत करणे;
- अक्षय्य तृतीया सारख्या सणांना जेव्हा मोठ्या प्रमाणावर बालविवाह होण्याची शक्यता असते तेव्हा प्रतिबंधात्मक योजना आखणे आणि सदर योजना जिल्हाधिकारी आणि जिल्हा बाल संरक्षण कक्षास कळवणे;
- बाल कल्याण समितीस योग्य ती माहिती पुरवणे आणि बालविवाह थांबवण्यासाठी उपाययोजना करण्यात मदत करणे;
- शाळा सोडणाऱ्या मुलींची आकडेवारी गोळा करणे आणि त्याचा पाठपुरावा करणे;
- गावामध्ये बालविवाह करण्याविरुद्ध ठराव मंजूर करण्यासाठी ग्रामसभेला प्रोत्साहित करणे;
- बालकांच्या आणि महिलांच्या प्रश्नावर काम करत असणाऱ्या अशासकीय संस्था, समुपदेशक, आरोग्य सेवा देणाऱ्या संस्था, वकील, विधी सेवा प्राधिकरण आणि इतर हितसंबंधी व्यक्तींची अद्ययावत सूची ठेवणे;

## ३. बालविवाह थांबवण्याची जबाबदारी

बालविवाहाची माहिती बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांना विविध स्तरावरून प्राप्त होऊ शकते.




बालविवाह होण्याची शक्यता असल्याची विश्वसनीय माहिती मिळाल्यास बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्याने असा होऊ घातलेला विवाह थांबवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे अपेक्षित आहे. त्याकरिता त्याने खाली नमूद केल्याप्रमाणे कारवाई करणे आवश्यक आहे:

**बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यावर बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्याने काय करावे:**

- सदर माहितीची खातरजमा करावी.
- पिडीत मुलांच्या कुटुंबाला भेट देऊन समज द्यावी. (या ठिकाणी बालविवाह करणे कायद्याने गुन्हा आहे या बाबत सविस्तर माहिती दोन्ही कुटुंबियांना आणि नातेवाईकांना द्यावी आणि त्याचा अहवाल तयार करावा).मुलीच्या कुटुंबियांना समजावून सांगण्यासाठी गावातील बाल संरक्षण समिती आणि शाळा व्यवस्थापन समिती, गावातील प्रतिष्ठीत नागरिक यांचा सहभाग घ्यावा.
- पोलीस / बाल कल्याण समिती / जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांना कळवावे
- बालकांच्या वयाची पडताळणी करण्यासाठी कारवाई करावी. मुला - मुलीचे वय आणि त्या बाबतचे पुरावे उपलब्ध करून घ्यावेत.
- महाराष्ट्र बालविवाह प्रतिबंध नियम २०२२ च्या नियम ७ प्रमाणे वयाची पडताळणी करण्यासाठी शाळेचा दाखला, मॅट्रिक च्या प्रमाणपत्रावरून किंवा स्थानिक प्राधिकरणाने दिलेला जन्माचा दाखला या नुसार वयाची निश्चिती करणे आणि या पैकी कोणताही दस्तऐवज उपलब्ध नसेल तर जिल्ह्यातील बाल कल्याण समितीच्या आदेशाने वय पडताळणी करून बालकाच्या सर्वोत्तम हिताची काळजी घ्यावी.
- बालविवाह प्रतिबंध नियम २०२२ मध्ये नमूद नमुना एक मध्ये घटनेचा अहवाल नोंदवून सदर अहवाल प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी व जिथे बालविवाह पार पडत आहे अशा परिसरातील पोलिसांना पाठवावा.
- बालविवाह प्रतिबंध अधिनियमान्वये घडलेल्या अपराधांविषयी पोलिसांकडे किंवा न्यायदंडाधिकारी यांचेकडे अर्ज दाखल करण्यात पिडीत व्यक्तीला मदत करावी.
- गरज असल्यास, बाल कल्याण समितीच्या आदेशांप्रमाणे, बालकाला शासकीय निवासी शाळेत, आधारगृहात किंवा अन्य सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी कार्यवाही करावी.

**कुटुंबाने लग्न थांबविण्याची तयारी दाखविल्यास....**

- काही वेळा कुटुंबाकडून एक काबुलीनामा लिहून घेतला जातो. परंतु असा काबुलीनामा लिहून घेण्याबाबतची कोणतीही तरतूद कायद्यात नाही. अशा काबुलीनामाचे अस्तित्व कायद्याच्या दृष्टीने नगण्य आहे.
- बालविवाह होण्याची शंका असल्यास कोर्टात मनाईचा हुकूम मिळण्याकरिता अर्ज करावा.

**कुटुंबाने लग्न थांबविण्यास नकार दिल्यास......**

बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांनी जवळच्या पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करावी. (तक्रार कशी करावी याचा नमुना सोबत देण्यात येत आहे– परिशिष्ठ १). सदर तक्रार दाखल करण्यासाठी गावातील गाव बाल संरक्षण समिती आणि शाळा व्यवस्थापन समिती यांची मदत घेता येईल. तसेच सदरील विवाह होऊ नये याकरिता कोर्टात मनाईचा हुकुम मिळणे करिता अर्ज करणे आवश्यक आहे.

## ४. बालविवाह संपन्न झाल्यानंतरच्या जबाबदाऱ्या

बालविवाह संपन्न झाला असल्यास बालविवाह प्रतिबंध अधिकारी याने खालील कार्यवाही करणे आवश्यक आहे:

- बालविवाह प्रतिबंध नियम २०२२ मध्ये नमूद नमुना एक मध्ये बालविवाहाचा घटना अहवाल नोंदवणे आणि सदर अहवाल प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी व जिथे बालविवाह पार पडला आहे अशा परिसरातील पोलिसांना पाठवणे. तसेच, माहिती देणाऱ्यास या अहवालाची सहीनिशी प्रत देणे.
- बालविवाह झाला असल्याबाबतचे पुरावे गोळा करणे जसे की लग्न पत्रिका, विवाहाची छायाचित्रे, वयाचा पुरावा, इत्यादी
- महाराष्ट्र बालविवाह प्रतिबंध नियम २०२२ च्या नियम ७ प्रमाणे वयाची पडताळणी करण्यासाठी शाळेचा दाखला, मॅट्रिक च्या प्रमाणपत्रावरून किंवा स्थानिक प्राधिकरणाने दिलेला जन्माचा दाखला या नुसार वयाची निश्चिती करणे आणि या पैकी कोणताही दस्ताऐवज उपलब्ध नसेल तर जिल्ह्यातील बाल कल्याण समितीच्या आदेशाने वय पडताळणी करून बालकाच्या सर्वोत्तम हिताची काळजी घेणे.
- बालविवाह प्रतिबंध अधिनियमान्वये घडलेल्या अपराधांविषयी पोलिसांकडे किंवा न्यायदंडाधिकार्यांकडे तक्रार दाखल करणे.
- बालकाची सुटका करून घेण्याची गरज असल्यास बाल कल्याण समितीचे सहाय्य घेणे व बाल कल्याण समितीच्या आदेशाप्रमाणे बालकाची काळजी घेणे आणि संरक्षण करणे.
- बालक, त्यांचे आई-वडील व पालक यांना समुपदेशन, कायदेशीर सहाय्य, वैद्यकीय सहाय्य, आधार गृह इत्यादीं सारख्या विविध सेवा सुविधा मिळवण्याकरिता सहाय्य करणे.
- बालविवाह झाला असल्यास तो रद्दबातल करून घेण्यासाठी बालकाला माहिती देणे, मदत करणे व बालकाची इच्छा असल्यास त्याच्या बरोबर कोर्टात याचिका दाखल करणे.
- बालविवाहातील मुलीच्या निवासाच्या सोयीसाठी आणि पोटगीसाठी कोर्टात याचिका दाखल करणे किंवा याचिका दाखल करण्याकरिता मदत करणे.
- बालविवाहातून जन्मलेल्या अपत्याचा ताबा व अपत्यासाठी पोटगी मिळण्याकरिता कोर्टात याचिका दाखल करणे किंवा याचिका दाखल करण्याकरिता मदत करणे.
- १८ वर्षांखालील बालकाला बालविवाहाकरिता पालकांच्या ताब्यातून काढून किंवा फूस लावून नेण्यात आले असेल, किंवा जबरदस्तीने / कपटाने विवाह करण्यास भाग पाडले असेल, किंवा  बालकाची विवाहाकरिताविक्री करण्यात आली असेल किंवा विवाहानंतर विक्री करण्यात आली असेल तर अशा बालविवाहाची माहिती अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ अन्वये नियुक्त केलेल्या विशेष पोलीस अधिकाऱ्यांना देणे
- फौजदारी कायदा जसे की भारतीय दंड संहिता, १८६० आणि १ जून २०२४ पासून भारतीय न्याय संहिता, २०२३ किंवा अन्य कोणत्याही कायद्यांतर्गत अपराध झाला असल्याचे लक्षात आल्यास, त्या संदर्भात कारवाई करण्यास संबंधित पोलिसांना कळवणे.
- बालविवाहाची योग्य चौकशी तीन महिन्याच्या आत पूर्ण करणे आणि त्याची पूर्ण नोंद ठेवणे. नोंद करताना माहिती मिळाल्याची वेळ, चौकशी सुरु केल्याचा दिनांक आणि वेळ, भेट दिलेली ठिकाणे, चौकशीतून समोर आलेली परिस्थिती असे सर्व तपशील नोंदवणे गरजेचे आहे.


**५. बालविवाह झालेल्या बालकांच्या पुनर्वसनाची जबाबदारी:**

बालविवाह झाला असल्यास अशा बालकांच्या पुनर्वसनासाठी बालविवाह प्रतिबंध अधिकारी याने योग्य भूमिका बजावणे गरजेचे आहे.बालविवाह प्रतिबंध करतांना बालविवाहाचे बळी ठरलेले बालक बाल न्याय कायदा, २०१५ नुसार 'काळजी आणि संरक्षणाची गरज असणारे बालक' म्हणून गणले जावे ही कायद्याची भूमिका आहे. ज्यावेळी बाल कल्याण समिती समोर बालकाला हजर केले जाते त्यावेळी त्या बालकाला 'अधिक काळजी आणि संरक्षणाची गरज असलेले बालक' म्हणून घोषित करून घेणे गरजेचे आहे. अशा बालकांना बाल विवाहापासून पृथक करून त्याच्या पुनर्वसनासाठी पुढील प्रमाणे कार्यवाही केली जाऊ शकते,याचा बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांनी विचार करायला हवा.

- बालकाला समिती समक्ष हजर करतांना महिला कर्मचारी, पोलीस कर्मचारी किंवा पालक सोबत असतील याची खात्री करणे.
- बालिकेला समिती समक्ष हजर करतांना आवश्यकतेनुसार वैद्यकीय चाचणी करण्यास पालकांना व बालकाला माहिती पुरविणे.
- बालकासाठी सुरक्षित निवास उपलब्ध करून देणे.
- बालकाच्या पुनर्वसन प्रक्रियेत शिक्षण, कला कौशल्य, व्यवसाय शिक्षण यांना महत्व देणे व अशा पद्धतीचा सामाजिक चौकशी अहवाल किंवा काळजी आराखडा केला जाईल याची खात्री करणे.
- बाल विवाहाच्या घटनेमुळे बालकाच्या मानसिकतेवर नकारात्मक प्रभाव पडू शकतो त्यामुळे बालकाला मानसोपचारतज्ज्ञ, समुपदेशक, आहारतज्ञ, आरोग्यसेवा देणारे यांची सेवा मिळवून देणे.
- जिल्हा न्यायालये किंवा कुटुंब न्यायालये यांचे मार्फत विवाह रद्द करण्यासाठी प्राधान्य देणे आणि त्याचा अर्ज करण्यासाठी पूर्ण सहकार्य करणे.
- शिक्षक आणि शाळा व्यवस्थापन समिती यांचे मार्फत बालकाच्या शाळेतील उपस्थितीवर नियंत्रण ठेवणे.
- ग्रामपंचायत अंतर्गत विकास आराखड्यात महिला व बालकांच्या बजेट मधून पिडीत बालकांना वैयक्तिक लाभाच्या योजना मिळवून देणे. उदा. शाळेसाठी प्रवास, पुस्तके, आहार, समुपदेशन सत्र इत्यादी.
- बालविवाह पिडीत बालकांची माहिती किंवा ओळख सार्वजनिक होणार नाही याची दक्षता घेणे संदर्भात सबंधित सर्वांना सूचना देणे.
- पालकांकडून जर बालकाचा विवाह पुन्हा होण्याची शक्यता असेल तर पोलिसांना व बाल कल्याण समितीला याची आगाऊ सूचना देणे.

**६. इतर जबाबदाऱ्या**

- वेळोवेळी सरकारला विवरण पत्र व आकडेवारी सदर करणे;
- स्वतःच्या अधिकार क्षेत्राच्या बाहेर होणार / होत असलेल्या अथवा झालेल्या बाल विवाहाची माहिती नोंदवणे आणि अशी माहिती तत्काळ ई-मेल / दूरध्वनी, मेसेज किंवा इतर मार्गाने संबंधित बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्याकडे पाठवणे.
- कौटुंबिक हिंसाचाराबाबत माहिती मिळाल्यास सदर माहिती कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण



अधिनियम अंतर्गत नियुक्त केलेल्या संरक्षण अधिकाऱ्यांकडे पाठवणे.

- बालविवाह झालेल्या किंवा होण्याचा संभव असलेल्या बालकांच्या लैंगिक अत्याचारा संदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास, लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम अंतर्गत तरतूद केलेल्या पोलिसांना तत्काळ माहिती कळवणे.
- बालविवाहातील बालकाची ओळख गोपनीय ठेवणे.
- बालविवाहाची माहिती देणाऱ्या व्यक्ती किंवा संस्था / संघटना यांचेबाबत गोपनीयता राखणे. परंतु, बालविवाहाची माहिती देणाऱ्यांच्या जीवितास किंवा मालमत्तेस धोका असल्यास, अशा व्यक्ति, संस्था किंवा संघटना यांची ओळख पोलिसांकडे उघड करून त्यांना संरक्षण मिळेल याची काळजी घेणे.
- बालविवाह प्रतिबंध अधिनियमाच्या अंतर्गत केलेल्या कारवायांचा मासिक अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याकडे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सदर करणे.

लक्षात ठेवा

- बाल विवाह प्रतिबंध अधिकारी त्याच्या अधिकार क्षेत्राच्या बाहेर घडत / घडणार असलेल्या किंवा घडलेल्या बाल विवाहाची माहिती घेण्यास नकार देऊ शकत नाही.
- बाल विवाह प्रतिबंध अधिकारी बाल विवाहातील बालकाची ओळख उघड करू शकत नाही
- बाल विवाह प्रतिबंध अधिकारी हे कर्तव्यांचे पालन करण्यात असफल ठरले तर त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते.

बालविवाहांना प्रतिबंध करण्यासाठी बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांची भूमिका फार महत्त्वाची आहे. बालविवाह होण्याचा संभव असल्याचे किंवा होत असल्याचे लक्षात आल्यावर बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्याने खाली नमूद कार्यपद्धती अवलंबवणे अपेक्षितआहे:

**बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्यांचे अधिकार**

बालविवाह रोखण्याची प्रमुख जबाबदारी बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांचेवर देण्यात आली आहे. त्यामुळे बालविवाह रोखण्याचे काम करत असताना या अधिकाऱ्यांना विशेष अधिकार देखील देण्यात आले आहेत. या अधिकारांचा योग्य वापर करून त्यांची कर्तव्ये ते अधिक सक्षमरीत्या पार पडू शकतात.बालविवाह रोखण्याकरिता किंवा त्याची चौकशी करण्याकरिता बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांचेकडे खालील अधिकार आहेत:

- बालविवाह झाला आहे किंवा होत आहे त्या ठिकाणी प्रवेश करणे;
- बालविवाह संदर्भात आवश्यक ती चौकशी करणे.
- बालविवाहातील बालकाच्या वयाची पडताळणी करणे.
- वधू आणि वराचे वय सिद्ध करणारे दस्तावेज व इतर पुरावे मागवणे, जसे की, जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, किंवा वधू - वराचे वय सिद्ध करणारे परीक्षा मंडळाने दिलेले प्रमाणपत्र.
- साक्षीदारांची साक्ष नोंदवून घेणे.
- अपराधी व्यक्तींविरोधात खटला दाखल करण्यासाठी पुरावे गोळा करणे.

# १२ बालविवाह रोखण्यात इतर शासकीय यंत्रणांची भूमिका

बालविवाह ही स्थानिक पातळींवर होणारी घटना असल्यामुळे यामध्ये प्रत्येक स्तरावर बालविवाह प्रतिबंध करणाऱ्या यंत्रणेत शासकीय आणि लोक सहभागाची आवश्यकता आहे.

**1. गाव / वॉर्ड/ प्रभाग येथे बाल संरक्षण समितीची भूमिका –**

बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) नियम २००७ मधील नियम ८१(फ) अन्वये बाल संरक्षण समितीची स्थापना करण्याची तरतूद करण्यात आली होती. सदरील तरतुदींचा आधार घेऊन दिनांक १० जून २०१४ च्या महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार ग्राम, तालुका आणि नगर / प्रभाग स्तरावर बाल संरक्षण समितीची स्थापना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बालकांवर परिणाम करणाऱ्या बालविवाहांसारख्या समस्या संदर्भात प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक उपाय योजना करण्याचे काम या समित्यांनी करणे अपेक्षित आहे असे या शासन निर्णयात नमूद करण्यात आले. (सदरील शासन निर्णय परिशिष्ठ – ६ मध्ये जोडले आहे). बालकांना अत्यावश्यक स्वरुपात काळजी आणि संरक्षण देणे ही महत्वाची भूमिका ग्राम बाल संरक्षण समितीची आहे.

- अधिकारक्षेत्रात बालविवाह प्रतिबंध अधिनियम व बाल हक्कांची जनजागृती करणे.
- बालविवाह प्रतिबंधासाठी उपाय योजनात्मक कार्य म्हणून बालविवाहाचा धोका ज्यांच्या बाबतीत संभावतो अशा बालकांची यादी तयार करणे.
- शाळाबाह्य व शाळा सोडून जाणाऱ्या मुलींची आकडेवारी गोळा करणे.
- बालविवाहात गुंतू पाहणाऱ्या कुटुंबाना भेटी देऊन पालकांना समुपदेशन करणे.
- बालविवाहाचा संभाव्य धोका असणाऱ्या बालकाला बालविवाह प्रतिबंध अधिकारी, पोलीस व स्थानिक नागरिकांच्या मदतीने बाल कल्याण समिती समोर हजर करण्यास मदत करणे.
- बालविवाह प्रकरणाची माहिती होताच बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांना अवगत करणे.
- बालविवाहाची माहिती १०९८ या बाल मदत संपर्क क्रमांकाला (चाईल्ड हेल्पलाईनला) पुरविणे.
- बालविवाहाला बळी पडणाऱ्या बालकांचा किंवा ज्या बालकांचा बालविवाह थांबविण्यात आला आहे अशा बालकांचा पाठपुरावा घेऊन त्यांना शिक्षण, आरोग्य आणि आणि इतर सोयी सुविधा मिळणेसाठी सहकार्य करणे.
- अक्षयतृतिया आणि इतर प्रासंगिक वेळेला मोठ्या प्रमाणात होणाऱ्या बालविवाहास प्रतिबंध करण्यासाठी गट विकास अधिकारी यांचे मार्फत बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांना नियोजन आणि उपाय योजना करणेसाठी आदेशित करणे.

| ग्राम बाल संरक्षण समिती | तालुका बाल संरक्षण समिती | नगर / प्रभाग बाल संरक्षण समिती |
|---|---|---|
| १) अध्यक्ष - सरपंच किंवा ग्रामस्तरावर निवडून आलेला प्रतिनिधी (ग्रामपंचायतीद्वारा नियुक्त केलेला / केलेली)<br>२) पोलीस पाटील<br>३) आशा सेविका<br>४) प्राथमिक / माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक | १) अध्यक्ष -<br>तहसिलदार<br>२) गट विकास अधिकारी<br>३) पोलीस अधिकारी<br>४) जिल्हा बाल संरक्षण कक्ष प्रतिनिधी<br>५) प्रतिनिधी आरोग्य विभाग तालुका स्तर<br>६) प्रतिनिधी शिक्षण विभाग तालुका स्तर | १) अध्यक्ष -<br>नगर सेवक / नगर सेविका<br>२) वय वर्षे १२ ते १८ या वयोगटातील मुलगा प्रतिनिधी<br>३) वय वर्षे १२ ते १८ या वयोगटातील मुलगी प्रतिनिधी<br>४) प्राथमिक / माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक अथवा शिक्षक (शिक्षणाधिकारी द्वारा नियुक्त) |

| ग्राम बाल संरक्षण समिती | तालुका बाल संरक्षण समिती | नगर / प्रभाग बाल संरक्षण समिती |
|---|---|---|
| ५) शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष<br>६) स्थानिक सामाजिक प्रतिनिधी (स्वयंसेवी संस्था, बचतगट, महिला मंडळ)<br>७) वयवर्षे १२ ते १८ वयोगटातील मुलगा प्रतिनिधी (१)<br>८) वयवर्षे १२ ते १८ वयोगटातील मुलगी प्रतिनिधी<br>९) सदस्य सचिव - अंगणवाडी सेविका | ७) प्रतिनिधी, ग्राम बाल संरक्षण समिती (प्रत्येकी ५)<br>८) सदस्य -<br>वय वर्षे १२ ते १८ या वयोगटातील मुलगा प्रतिनिधी (प्रत्येकी २)<br>९) सदस्य -<br>वय वर्षे १२ ते १८ या वयोगटातील मुलगी प्रतिनिधी (प्रत्येकी २)<br>१०) स्थानिक सामाजिक प्रतिनिधी (स्वयंसेवी संस्था, बचतगट, महिला मंडळ)<br>११) ) सदस्य सचिव -<br>तालुक्याचे सर्वात वरिष्ठ बाल विकास प्रकल्प अधिकारी (एकात्मिक बाल सेवा योजना) | ५) पोलीस स्टेशन मधील नियुक्त बाल संरक्षण अधिकारी<br>६) स्थानिक सामाजिक प्रतिनिधी (स्वयंसेवी संस्था, बचतगट, महिला मंडळ) (प्रत्येकी २)<br>७) अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती (महानगरपालिका शाळा) (शिक्षणाधिकारी द्वारा नियुक्त)<br>८) महानगरपालिकेच्या प्राथमिक/माध्यमिक (अनुदानित) शाळेचे मुख्याद्यापक अथवा सदस्य (शिक्षणाधिकारी द्वारा नियुक्त)<br>९) वैद्यकीय अधिकारी (शासकीय/खाजगी) (समितीद्वारे निवड केलेला/केलेली)<br>१०) सदस्य सचिव - अंगणवाडी पर्यवेक्षिका/मुख्यसेविका |

## २. पोलीसांची भूमिका:

बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ मधील कलम १५ नुसार बालविवाह करणे, त्याला प्रोस्ताहन देणे, कोणत्याही प्रकारे बाल विवाह होण्यास मदत करणे हे सर्व गुन्हे अजामीनपात्र आणि दखलपात्र गुन्हे आहेत. त्यामुळे बालविवाह होत असेल किंवा झाला असेल तर लगेचच त्या गुन्ह्याची नोंद घेऊन आवश्यक ती कारवाई करणे पोलीसांचे कर्तव्य आहे.

महाराष्ट्र राज्याचे बालविवाह प्रतिबंध नियम २०२२ मधील नियम ४ अन्वये बालविवाह संदर्भातील पोलीसांची कर्तव्ये नमूद करण्यात आली आहेत. सदरील नियमानुसार पोलीसांवर बालविवाह थांबवणे तसेच बालविवाह घडला असल्यास बालविवाह प्रतिबंध अधिनियमांतर्गत सर्व कारवाई करणे ही जबाबदारी आहे. ही जबाबदारी सर्वसाधारण कोणत्याही पोलीसांनी बजावायची आहे. पण त्याच बरोबर ही जबाबदारी बाल न्याय अधिनियमाच्या कलम १०७ अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या विशेष बाल पोलीस पथक यांनी देखील बजावायची आहे.

तसेच, प्रत्येक जिल्ह्यात आणि शहरात बालकांच्या सुरक्षा आणि संरक्षणासाठी शासनामार्फत विशेष बाल पोलिस पथकाचे गठन करण्यात आले आहे.

**विशेष बाल पोलिस पथकामध्ये कोणाचा समावेश आहे?**

- पोलिस अधिकारी
- बाल कल्याण पोलिस अधिकारी
- बाल कल्याणाच्या कामाचा अनुभव असलेले दोन सामाजिक कार्यकर्ते. यातील एक तरी व्यक्ती महिला असावी.

या पथकात असलेले बाल कल्याण पोलिस अधिकारी यांनी देखील बालविवाह रोखण्यासाठी आवश्यक ती सर्व पाऊले उचलणे गरजेचे आहे.

**बालविवाह प्रतिबंधासाठी पोलीसांनी खालील प्रमाणे भूमिका पार पाडायची आहे: (संदर्भ – नियम ४ – महाराष्ट्र राज्याचे बालविवाह प्रतिबंध नियम २०२२)**

**बालविवाह होणार असल्याची / होत असल्याची लेखी / अन्य प्रकारे माहिती मिळाल्यास**

- पोलीसांनी कोणत्याही प्रकारे बालविवाह होत असल्याची माहिती मिळाली तरी लगेचच त्यावर कारवाई करणे आणि पाऊले उचलणे गरजेचे आहे. माहिती लेखी स्वरुपात मिळाली अथवा तोंडी स्वरुपात/ चाईल्ड लाईन कडून मिळाली / बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांनी दिली तरी कारवाई करणे अपेक्षित आहे.

- सदर बाल विवाहाबाबतची खातरजमा शासकीय कर्मचारी, शासकीय समित्या किंवा आपल्या यंत्रणेमार्फत करणे अपेक्षित आहे.
- बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांना बालविवाह थांबविण्यासाठी तसेच कर्तव्याची पूर्तता करण्यास आवश्यक ती सर्व मदत करणे गरजेचे आहे, उदाहरणार्थ त्याचे सोबत घटनास्थळी जाणे, त्याच्या सुरक्षिततेला धोखा असल्यास त्याला संरक्षण देणे, पुरावे गोळा करण्यास मदत करणे, जबाब घेणे, इत्यादी
- जेथे बालविवाह विधीपूर्वक पार पडण्याची शक्यता असेल तेथे, बालविवाह प्रतिबंधक अधिकार्यांच्या विनंतीवरून त्यांना सहाय्य करावे आणि अशा विवाह होण्याच्या ठिकाणी भेटी द्यावी.
- बालविवाहाबद्दल माहिती मिळाल्या नंतर त्याची नोंद ठाण्याच्या दैनंदिनीत करावी साक्षीपुरावा गोळा करावेत.
- सदर कुटुंबियांना पोलिस ठाण्यात बोलावून त्यांना बालविवाह करणे कायदेशीर दखल पात्र गुन्हा असून ते दोन वर्षाच्या शिक्षेस आणि एक लाख रुपयापर्यंत दंडास पात्र राहतील हे सांगावे.
- बालविवाह होण्याची शक्यता असल्यास मनाईचा हुकुम मिळवण्यासाठी मदत करणे.
- सदर माहिती बालविवाह प्रतिबंध अधिकारी / बाल संरक्षण समिती / बाल कल्याण समिती यांना देखील कळवणे आवश्यक आहे.

**बालविवाह झाल्याची लेखी/किंवा अन्य प्रकारे माहिती मिळाल्यास**

- सदर माहितीचा पाठपुरावा करून गावातील शासकीय कर्मचारी / प्रतिष्ठित नागरिक यांचे मार्फत खातरजमा करावी.
- बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांना कर्तव्याची पूर्तता करण्यास आवश्यक ती सर्व मदत करावी, उदाहरणार्थ त्याचे सोबत घटनास्थळी जाणे, त्याच्या सुरक्षिततेला धोखा असल्यास त्याला संरक्षण देणे, पुरावे गोळा करण्यास मदत करणे, जबाब घेणे, इत्यादी
- बालविवाह विधीपूर्वक पार पडलेला असल्यास बालविवाह प्रतिबंध कायद्यानुसार तात्काळ कारवाई करावी
- संबधित आरोपीवर बालविवाह प्रतिबंध कायद्यानुसार प्रथम खबरीचा अहवाल (FIR) घेऊन गुन्ह्याची नोंद करावी. तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३, हुंडा प्रतिबंध अधिनियम, लैंगिक शोषणापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२, आणि इतर फौजदारी कायद्यातील कलमांतर्गत गुन्ह्याची नोंद करावी.
- कार्यवाहीस लागणारे सर्व पुरावे गोळा करावेत व सक्षम अधिकारी यांच्या समोर सादर करावे. विशेषतः मुला - मुलीच्या वयाबाबतचा आणि लग्न झाल्याचा पुरावा असणारी कागदपत्रे गोळा करावीत.
- बालकास बाल कल्याण समिती समोर सादर करावे व बाल कल्याण समितीच्या सुचना प्रमाणे कार्यवाही करावी.
- जिथे गरज असेल तिथे पोलीसांनी **Suo-Moto Action** घ्यावी (स्वतःहून पुढाकार घेऊन कारवाई करावी.)
- न्यायालयाच्या आदेशांनुसार कारवाई करणे.

### ३. बाल कल्याण समिती

बाल न्याय अधिनियमाच्या कलम २७ अंतर्गत प्रत्येक जिल्ह्याकरिता बाल कल्याण समितीचे गठन करण्यात आले आहे.

बाल न्याय अधिनियम २०१५ मधील कलम (२) उपकलम (१४) मधील उप-उप कलम (xii) नुसार विवाहाचे वय पूर्ण होण्यापूर्वी ज्याचा विवाह केला जाण्याचा धोका आहे आणि असा विवाह लावण्यासाठी बालकाचे आई - वडील, कुटुंबातील सदस्य, पालक किंवा इतर व्यक्ती जबाबदार असतील तर अशा बालकाला "काळजी आणि संरक्षणाची गरज असणारे बालक" म्हणून मानले जाते. बालकांचा विवाह थांबविण्यात जेवढा सहभाग बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांचा आहे, तेवढीच महत्वाची भूमिका आणि जबाबदारी ही बाल कल्याण समितीची आहे.

बाल कल्याण समिती समोर सादर करण्यात आलेली व्यक्ती प्राथमिक दृष्ट्या बालक वाटत असेल तर समिती आपली कारवाई करू शकते. परंतु बालकाच्या वयाच्या बाबतीत

संदिग्धता असल्यास खालील पुराव्यांच्या आधारे बालकाचे वय निश्चित करता येते :-

१. शाळेतर्फे दिलेला जन्माचा दाखला किंवा दहावीचे सर्टिफिकेट

२. महानगरपालिका किंवा पंचायत यांचे तर्फे देण्यात आलेला जन्माचा दाखला

वरील दोन्ही पुरावे नसल्यास, वैद्यकीय चाचणीच्या आधारे वयाची निश्चिती करता येते. समितीने ठरवलेले वय त्या व्यक्तीचे योग्य वय मानले जाते.

बाल कल्याण समितीने अशा बालकाचे बाबत खालील उपाय योजना करणे अपेक्षित आहे:

- अशा बालकाची सुरक्षा आणि संरक्षण यांची सुनिश्चिती करणे
- अशा बालकाचे शिक्षण त्याच शाळेत निरंतरपणे सुरु राहील याची सुनिश्चिती करणे
- जेव्हा जेव्हा गरज असेल तेव्हा तेव्हा अशा बालकास बिगर संस्थात्मक सेवा देण्याचा प्रयत्न करणे आणि सर्वात शेवटचा पर्याय म्हणून संस्थात्मिकीकरण करणे

**बाल कल्याण समितीने बालकाविषयी कोणताही निर्णय घेत असताना "बालकाचे हित" याला सर्वात अधिक प्राध्यान्य देणे आवश्यक आहे.**

| **बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांनी बालविवाह थांबविण्या संदर्भात बाल कल्याण समिती सोबत करण्याची कृती:** | **बालविवाह थांबविण्या संदर्भात बाल कल्याण समितीने करावयाची कृती:** |
|---|---|
| बालविवाह होणार आहे/ बालविवाह होत आहे किंवा बालविवाह झालेला आहे अशा बालकांना बाल कल्याण समिती समक्ष विनाविलंब हजर करणे.<br>प्रवासाचा वेळ वगळता बालविवाह पिडीत बालकाला २४ तासाच्या आत समिती समोर हजर करणे बंधनकारक आहे. | बालविवाह संदर्भात आलेल्या सर्व (लेखी/तोंडी/निनावी आणि इतर मार्गाने) येणार्या सर्व तक्रारींची त्वरीत दखल घेणे. |
| बालकांना समिती समक्ष हजर करण्यास अडचणी निर्माण होत असल्यास बालकांची सुरक्षा आणि संरक्षण यासाठी पोलिसांना आदेश व्हावे याकरिता समितीला विनंती करणे. | तक्रारदार समोर न आल्यास Suo-Moto कार्यवाही करणे |
| बालविवाह पिडीत बालकाला काळजी आणि संरक्षणाचे मुल म्हणून घोषित करून घेणेसाठी योग्य ती कार्यवाही करणे. | बालविवाह थांबविण्यासंदर्भात बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांना सूचित / आदेशित करणे. |
| बालकांच्या सामजिक चौकशी होणे करिताचे आदेश मिळविणे. | बालविवाह सबंधी माहिती मिळाल्या नंतर बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांना आवश्यकतेनुसार बालकाला बाल कल्याण समिती समक्ष हजर करण्याचे आदेश करणे. प्रवासाचा वेळ वगळता पोलीस आणि बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांचे मार्फत बालविवाह पिडीत बालकाला २४ तासाचे आत समिती समोर हजर करून घेणे.<br>गरज भासल्यास पोलिस यंत्रणेला summons बजावून त्यांच्या सहकार्याने बालकाच्या कुटुंबियांना समिती समोर हजार राहण्याचे आदेश देणे. |

P.T.O.

| बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांनी बालविवाह थांबविण्या संदर्भात बाल कल्याण समिती सोबत करण्याची कृती: | बालविवाह थांबविण्या संदर्भात बाल कल्याण समितीने करावयाची कृती: |
|---|---|
| बाल विवाहाच्या घटनेत बालकांना योग्य व्यक्ती (Fit Person) किंवा संस्था यांच्या ताब्यात देण्यापूर्वी त्यांची चौकशी करण्यासाठी आदेश देण्याची विनंती करणे. | विवाह झाला असल्यास त्याबाबत तक्रार दाखल करणे, न्यायालयामार्फत मनाई हुकुम घेणे, घडलेल्या गुन्ह्यासंदर्भात तक्रार दाखल करणे, इत्यादी बाबत योग्य ते आदेश पोलिस व बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांना देणे. |
| बालकांचे शिक्षण सुरु राहील (शक्यतो त्याच शाळेत) यासाठी योग्य तो आदेश मिळविणे | बाल न्याय मुलांची काळजी आणि संरक्षण अधिनियम २०१५ कलम २ (१४) नुसार बालविवाह पिडीत बालक हे काळजी आणि संरक्षणाचे मुल म्हणून घोषित करणे व तसे बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांना अवगत करणे |
| बालकांचे शिक्षण आणी इतर पाठपुरावा योग्य व्यक्ती (Fit Person) गाव बाल संरक्षण समिती, शाळा व्यवस्थापन समिती यांचे माध्यमातून प्राप्त करून अहवाल देणे. | समिती समक्ष हजर होणाऱ्या बालकाच्या सामाजिक चौकशीचे आदेश सबंधित यंत्रणेस देणे. |
| | बालकाचे शिक्षण आणि इतर पुनर्वसन सेवा देण्यासाठी सबंधित विभागाला आदेशित करणे. या आदेशाची प्रत बालविवाह प्रतिबंध अधिकारी आणि अध्यक्ष/ सदस्य बाल संरक्षण समितीस देणे. |
| | बालविवाह प्रतिबंध करणारे आणि बालक यांना यांच्या संरक्षणाकरिता आणि बालकाला सुरक्षितरित्या समिती समोर येण्यास अडचणी येऊ नये याकरिता पोलिसांना आदेशित करणे. |
| | बाल विवाहाच्या घटनेत बालकांना योग्य व्यक्ती (Fit Person) किंवा संस्था यांच्या ताब्यात देण्यापूर्वी त्यांची चौकशी करणे. |
| | पोलिस यंत्रणा, बाल संरक्षण कक्ष, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग यांच्या सहकार्याने बालकांच्या पुनर्वसनाचे आदेश देणे. |
| | बालविवाहाच्या प्रकरणांचा पाठपुरावा करण्याबाबत जिल्हा बाल संरक्षण कक्षास आदेश देणे आणि लेखी अहवाल मागवणे. |

बाल कल्याण समिती खालील निर्णय देऊ शकते:-

१. बालकाला काळजी आणि संरक्षणाची गरज' असणारे बालक म्हणून घोषीत करणे.

२. बाल कल्याण अधिकारी याच्या निगराणी खाली बालकाला पालकांकडे सुपूर्त करणे.

३. बालकाची सोय बालगृहात करणे.

४. तात्पुरत्या काळासाठी बालकाला सक्षम व्यक्तिच्या ताब्यात देणे.

५. बालकाला विविध सुविधा उपलब्ध करून देणे जसे की, शिक्षण, वैद्यकीय सुविधा, मानसिक सहाय्य, कायदेशीर सल्ला व इतर सुविधा.

आई-वडील अथवा पालकांची चौकशी केल्यावर बालकाला त्याच्या आई-वडिलांकडे, पालकांकडे दिल्यास बालकाचे व्यवस्थित संरक्षण होऊ शकत असेल तरच पालकांना बालकाचा ताबा मिळू शकतो.

### ४. चाईल्ड हेल्पलाईन :-

**१०९८ हा चाईल्ड हेल्पलाईनचा नंबर आहे.** ही एक ३६५ दिवस २४ तास चालणारी तातडीची सेवा पुरवणारी यंत्रणा आहे. भारत सरकारच्या महिला आणि बाल विकास विभागातर्फे चालवण्यात येणारी ही देशभर उभारण्यात आलेली यंत्रणा आहे. इथे मुलांना लागणारी फक्त तातडीची मदत मिळत शकते. तसेच इतर यंत्रणांशी जसे की पोलिस, जिल्हा महिला व बाल विकास, बाल संरक्षण समिती, इत्यादी यांचेशी आपल्याला जोडून त्यांचे मार्फत मिळणारी मदत देखील मिळवून दिली जाऊ शकते. कोणतेही बालक अथवा बालकाच्या वतीने कोणताही प्रौढ व्यक्ती देखील मदत मागू शकतात. मदत मागीतल्यापासून १ तासाच्या आत मदत या हेल्पलाईन द्वारे पुरवली जाते.

### ५. जिल्हा बाल संरक्षण कक्षाची भूमिका :-

चाईल्ड हेल्पलाईन, ग्राम बाल संरक्षण समिती, पोलिस, पत्रकार, विधिज्ञ, सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून बालविवाह सबंधित माहिती किंवा तक्रारी जिल्हा बाल संरक्षण कक्षाला प्राप्त होतात. अशा वेळी बालकांच्या काळजी आणि संरक्षणासाठी आवश्यक तो समन्वय करणे ही जिल्हा बाल संरक्षण कक्षाची भूमिका आहे. बाल न्याय अधिनियमाच्या कलम १०६ अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा बाल संरक्षण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. बालकांची काळजी, सुरक्षा आणि पुनर्वसन याकरिता योग्य ती पाऊले उचलणे आणि शासकीय तथा अशासकीय यंत्रणांमध्ये समन्वय साधणे हे या कक्षाचे मुख्य काम आहे. बालविवाहाबाबत या कक्षाने खालील पद्धतीने सहकार्य करणे अपेक्षित आहे:

- o जिल्हा बाल संरक्षण कक्षाकडे आलेल्या सर्व माहितीची खातरजमा करून पोलिस यंत्रणा आणि बाल कल्याण समिती यांच्यासोबत समन्वयाने काम करून पुढील कार्यवाही सुरु करणे.
- o स्थानिक पातळीवर बाल संरक्षण समित्यांची स्थापना करून या सर्व समित्यांची बालविवाह रोखण्यात मदत घेणे.
- o बालकाला बाल कल्याण समिती समक्ष हजार करण्यास बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांना आवश्यक ती मदत करणे.
- o बाल कल्याण समितीच्या आदेशाने देखरेख करण्यासाठी देण्यात आलेल्या केसेस ची माहिती संबंधित व्यवस्थेला आणि यंत्रणांना देणे आणि त्या बाबतचा लेखी अहवाल आपल्या दफ्तरी ठेवणे.
- o बाल कल्याण समितीला बालकांचा सामजिक तपासणी अहवाल उपलब्ध करून देणे.
- o पोलिस विभाग, बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांना बालविवाह प्रतिबंध करण्यासाठी माहिती पुरविणे.
- o आवश्यकतेनुसार पोलीसांना गुन्हा नोंदविण्यास सहकार्य करणे.
- o बालकांना सेवा देण्यासाठी गरजेनुसार विविध शासकीय कार्यालये, संस्था आणि सहाय्यक व्यक्ती यांचेमध्ये समन्वय साधणे.

### ६. जिल्हाधिकारी यांची भूमिका

बालविवाह थांबवणे किंवा त्यास प्रतिबंध करण्याचे अतिरिक्त अधिकार बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ मधील कलम १३(४) आणि १३(५) अन्वये जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. बालविवाह रोखण्यासाठी योग्य अशा सर्व उपाय योजना करण्याचे अधिकार, तसेच गरज पडल्यास किमान बळाचा वापर करण्याचा देखील अधिकार त्यांचे कडे आहेत. अक्षय्य तृतीया सारख्या दिवशी जेव्हा सामूहिक स्थरावर बालविवाह होण्याचे प्रमाण जास्त असते, अशा वेळेस बालविवाह रोखण्याकरिता जिल्हाधिकारी यांना बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांचे सगळे अधिकार देण्यात आले आहेत. बालविवाहाबाबत जिल्हा प्रशासन गंभीर आणि संवेदनशील असणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी बालविवाह घडला आहे तिथे विशेष सभा घेऊन बालविवाहा बाबत चर्चा घडवून आणली पाहिजे. बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांच्या मदतीने त्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांच्यासोबत चर्चा करून त्यांना बालविवाह करणे किंवा करण्यास मदत करणे हा दखलपात्र गुन्हा आहे या बाबत मांडणी करून त्याचे गांभीर्य त्यांच्या निदर्शनास आणून दिले पाहिजे. जिल्हा प्रशासन आणि जिल्हा पातळीवरील बाल संरक्षणाची यंत्रणा (बाल कल्याण समिती, विशेष बाल संरक्षण कक्ष, पोलिस आणि महिला बाल विकास विभाग यांच्या सोबत समन्वय करून कार्यवाही केली पाहिजे.

### ७. शाळेची भूमिका:

शाळेत येणाऱ्या मुलांबरोबर शाळेचे, शाळेतील शिक्षकांचे एक अतूट नाते निर्माण होत असते. मुले अनेक गोष्टी त्यांच्या शाळेतील मित्र - मैत्रिणींना सांगत असतात. तसेच, शाळेतील शिक्षकांनी देखील मुलांसोबत सलोख्याचे नाते ठेवले तर मुले अनेक गोष्टी त्यांना देखील सांगतात. त्यामुळे कोणत्या मुला-मुलीचा बालविवाह होत असेल तर ही माहिती शाळेतील मित्र-मैत्रिणींना किंवा शाळेतील शिक्षकांना समजणे शक्य असते. तसेच मूल जर अनेक दिवस काहीही कारण न देता शाळेतून गैरहजर असेल तरी शाळेला व शिक्षकांना समजू शकते. त्यामुळे शाळा आणि त्यातील शिक्षक, मुख्याध्यापक व शालेय स्तरावरील समिती बालविवाह रोखण्यासाठी प्रमुख भूमिका पार पडू शकतात.

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम २१ अंतर्गत शाळा व्यवस्थापन समिती गठन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. बालकांना १४ वर्षाच्या वयापर्यंत मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याचा अधिकार सुरक्षित ठेवणे हे शाळा व्यवस्थापन समितीची जबाबदारी आहे. या कायद्यान्वये शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित अशा सर्व शाळांसाठी शाळा व्यस्थापन समिती अनिवार्य करण्यात आली आहे.

शाळेत न जाणाऱ्या बालकांचा बालविवाह होण्याची जास्त शक्यता असते. अशा बालकाने शाळेत एकतर प्रवेशच घेतलेला नसतो, किंवा प्रवेश घेऊन सुद्धा दीर्घ कालावधी साठी (१ महिन्यापेक्षा अधिक काळ) शाळेतून ते गैरहजर असते. (संदर्भ – नियम २(ल) महाराष्ट्र राज्याचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम २०११).

स्थानिक प्रशासनावर शाळेत न जाणाऱ्या बालकांची माहिती घेण्याची आणि त्याकरिता योग्य ती प्रणाली तयार करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. [संदर्भ – कलम ९(ड) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ आणि नियम ५(अ) महाराष्ट्र राज्याचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम २०११]. शाळा व्यवस्थापन समिती वर आसपासच्या परिसरातील बालके शाळेत नियमितपणे जात आहेत की नाही हे बघण्याची जबाबदारी देण्यात आली आहे [संदर्भ - नियम १३(११)(ड) महाराष्ट्र राज्याचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम २०११]. तसेच शिक्षकांवर देखील शाळेत न जाणारे बालके शोधून त्यांना शाळेत परत आणण्याची जबाबदारी दिली जाऊ शकते. [संदर्भ – कलम २४(१)(फ) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ आणि नियम १९(२)(क) महाराष्ट्र राज्याचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम २०११]

त्यामुळे शाळा खालील भूमिका बजावणे महत्त्वाचे आहे:

- सलग १ महिन्यापेक्षा अधिक दिवस शाळेत गैरहजर राहणाऱ्या बालकांची माहिती ठेवणे, त्या बालकांशी आणि त्यांच्या कुटुंबियांशी संपर्क साधून शाळेत न येण्याचे कारण जाणून घेणे, तसेच त्यांना शाळेत येण्यासाठी / पाठवण्यासाठी प्रोत्साहित करणे, समुपदेशन करणे.
- शाळेतील विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना बालविवाहाच्या अनिष्ट परिणामांची माहिती देणे आणि त्यांना बालविवाह न करण्याबाबत जागरूक करावे. तसेच बालविवाहातून सुटका करून घेण्यसाठी उपलब्ध शासकीय यंत्रणा यांची माहिती करून देणे.
- बाल विवाहात अडकलेल्या बालकांची चौकशी करण्यात मदत करणे, बालकांच्या वयाचे पुरावे बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांना उपलब्ध करून देणे.
- शाळा परिसरात बालविवाह झाल्याची/ होणार असल्याची शंका येताच त्याबाबतची माहिती १०९८ या चाईल्ड हेल्पलाईन वर तसेच सबंधित बालविवाह प्रतिबंध अधिकारी तथा ग्रामसेवक यांना देणे.

### ८. अंगणवाडी सेविकेची भूमिका:

अंगणवाडी ताई यांना बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांना सहाय्य करण्याची जबाबदारी देण्यात आलेली आहे. तसेच त्या बाल संरक्षण समितीच्या सचिव देखील आहेत. त्या दृष्टीकोनातून अंगणवाडी ताई बालविवाह रोखण्यासाठी खालील प्रमाणे भूमिका पार पडू शकतात:

- o बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्याला त्याची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडण्यात सहकार्य करणे.
- o बालविवाहाची घटना घडत किंवा ठरत असल्याची माहितीसमोर आल्यास/ एखाद्या कुटुंबात बालविवाहाची बोलणी सुरु असल्यास बालविवाह प्रतिबंध अधिकारी, पोलिस, चाइल्ड लाईन यांना माहिती देणे आणि गरज भासल्यास बालकाच्या वयाचा पुरावा संबधित यंत्रणांना देणे.
- o बालकांशी वेळोवेळी चर्चा करून त्यांची बालविवाह विरोधी मानसिकता तयार करणे.
- o विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रौढ महिलांसोबत चर्चा करत असताना बालविवाह आणि त्याचे गंभीर दुष्परिणाम या बद्दल चर्चा घडवून आणणे.
- o दुर्बल कुटुंबातील खास करून नापास झालेल्या, गतिमंद, मतीमंद, शाळाबाह्य, अनाथ व निराधार बालकांवर विशेष लक्ष केंद्रित करणे. अशा कुटुंबांना नियमित भेटी देऊन, विचारपूस/ संवाद करून, त्या घरातील मुलींना किशोरवयीन गटात सामील होण्यास प्रवृत्त करणे.

**९. सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संस्था आणि प्रतिनिधी यांची भूमिका :-**

वर नमूद शासकीय यंत्रणांबरोबर इतर अशासकीय यंत्रणा, सामाजिक संस्था आणि सामाजिक कार्यकर्ते देखील बालविवाह रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, जसे की,

- o स्थानिक पातळीवर बालविवाह रोखण्यासाठी जनजगृती कार्क्रमात सहभागी होणे.
- o बालविवाह पिडीत बालकांच्या वतीने माहिती देण्यास पुढाकार घेणे.
- o बालविवाहात संभाव्यता सहभागी होऊ पाहणाऱ्या बालकांची माहिती यंत्रणेला देणे.
- o बालविवाहात सेवा देणाऱ्या अस्थापना, दुकाने, धंदेवाईक यांना बालविवाह प्रतिबंधात्मक कार्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे.
- o बालविवाह पिडीत बालकांना समिती किंवा न्यायलयात हजर करण्यास मदत कारणे.
- o विवाह रद्दबातल करून घेण्यासाठी हितचिंतक म्हणून अर्ज करणे.
- o बालकांना सक्षम व्यक्ती किंवा संस्था म्हणून मदत करण्यास पुढाकार घेणे.

**बालविवाह रोखण्याकरिता नागरिक म्हणून मला काय करता येईल?**

परंपरेने चालत आलेल्या प्रथा आणि परंपरा काळानुसार बदलत जातात. पूर्वी असणारी परिस्थिती विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे निश्चितच बदलते. बालविवाह ही समस्या देखील काळ सागरात वर्षानुवर्षे वाहत आलेली एक कुप्रथा आहे. संविधानाने ज्या मूलभूत हक्कांचे आणि कर्तव्याचे पालन करण्याची जबाबदारी प्रत्येक भारतीयाला दिली आहे, त्याला अनुसरून एक कर्तव्य म्हणून बालविवाह रोखण्यात नागरिकांनी सहभाग घ्यायला हवा.

या अनुषंगाने बालविवाह थांबविण्यासाठी आपण काय करू शकतो हे नागरिकांनी समजून घ्यायला हवे.

- बालविवाह होणार आहे, होत आहे किंवा झाला आहे अशी माहिती कुठल्याही स्तरावर मिळताच नागरिकांनी चाईल्ड लाईन, पोलीस, बालविवाह प्रतिबंध अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, बाल कल्याण समिती, महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय यांपैकी कोणालाही सूचित करावे.
- बालविवाहात प्रभावित बालकांच्या सुरक्षिततेसाठी बालविवाह विषयी गोपनीयता पाळावी, बालकांची ओळख सार्वजनिक करू नये.
- बालकांना बालविवाह प्रतिबंध अधिकारी, बाल कल्याण समिती, पोलीस किंवा इतर यंत्रणांपर्यंत पोहोचविण्यास मदत करावी.
- बालविवाह लावून देणाऱ्या व्यक्ती आणि सेवा पुरवठादारांची माहिती पोलीस व बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांना द्यावी.

- बालविवाहातील बालकांचे शिक्षण सुरु राहील याकरिता पालक / नागरिक म्हणून शाळा व्यवस्थापनात सहभाग द्यावा.
- बाल न्याय अधिनिमाच्या कलम ३१ (१) (V) नुसार सामान्य नागरिक देखील बालकांना बाल कल्याण समिती समक्ष हजर करण्यास सक्षम आहेत. त्यामुळे, पिडीत बालकांना समिती समोर हजर करण्यास पुढाकार घ्यावा.
- काळजी आणि संरक्षणातील बालकांना मदत करण्यासाठी बाल संरक्षण समिती मध्ये सहभाग घ्यावा.
- काळजी आणि संरक्षणातील बालकांना मदत करण्यासाठी सक्षम व्यक्ती म्हणून कार्य करण्यास पुढे यावे.
- विवाह नोंदणीसाठी समाज प्रबोधनाचा भाग म्हणून वैयक्तिक स्तरावर विवाह नोंदणीस प्रोत्साहन द्यावे.
- विवाह नियोजन करतांना किंवा इतरांच्या विवाहात सहभागी होतांना वधू -वरांच्या वयाची निश्चिती करूनच विवाहात सहभागी व्हावे.

**ग्रामसभेमध्ये बालविवाह विरोधात ठराव पास करून घेणे**

आपल्या गावात कोणत्याही मुलीचा विवाह हा वयाच्या १८ वर्षा खाली अथवा मुलाचा वयाची २१ वर्षा खाली बालविवाह होणार नाही तसेच गावातील मुलांची लग्ने कोणत्याही परिस्थीतीत १८ वर्षे पूर्ण न झालेल्या मुलीशी होणार नाही असा ठराव ग्रामसभेत बहुमताने मंजूर करून घेण्यात यावा. या ठरावाचे पालन केले जात आहे का यासाठी गावस्तरावर कार्य करीत असलेल्या सर्व घटकांनी सातत्याने काम करणे गरजेचे आहे.

**विवाह नोंदणी करण्यासाठी गावातील रहिवाशांना प्रोत्साहित करणे**

ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील तरतुदी नुसार जन्म, मृत्यू व विवाह याची नोंदणी ग्रामपंचायत येथे करणे गरजेचे आहे. यापैकी जन्म, मृत्यू नोंद होत असते परंतु गावातील सर्वच विवाहांची नोंद होत नाही. त्यासाठी ग्रामपंचायतीने निर्णय घेऊन गावातील रहिवाश्यांना विवाह नोंदणी करण्यास प्रोत्साहित करणे, त्यासाठी विविध सेवा मिळण्यासाठी प्राधान्य अथवा करात सूट देणे इत्यादि निर्णय घेता येतील.

# १३ बालविवाहातील बालक लैंगिक शोषणाचे बळी ठरले असेल तर काय करावे

बालविवाह घडून गेल्यानंतर किंवा काही अंशी तो होण्यापूर्वी देखील बालके विशेषतः मुलीं, लैंगिक शोषणाची शिकार झालेल्या असतात. बालविवाह रोखतांना बालविवाह पीडीत बालकावर लैंगिक अत्याचार झाल्याचे निदर्शनात आले तर, काय करावे हा प्रश्न बालविवाह प्रतिबंध करणाऱ्यांना पडलेला असतो. त्यामुळे बालकांवर झालेला लैंगिक अत्याचार म्हणजे काय आणि अशा अपराधा सबंधी काय कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी लागते हे समजून घेणे गरजेचे आहे.

बालकांवर झालेल्या लैंगिक अत्याचारासाठी विशेष कायदा पूर्वी उपलब्ध नव्हता. त्यामुळे अशा अत्याचारांसाठी भारतीय दंड संहिता, १८६० चा वापर करावा लागत होता. बालकांवरील अत्याचारात दिवसेंदिवस वाढ होतांना दिसून येत आहे. राष्ट्रीय क्राईम रिपोर्ट ब्युरो च्या अहवालानुसार २०२२ मध्ये एकूण १,६२,४४९ इतकी प्रकरणे ही बाल लैंगिक शोषणा संबंधी नोंदविण्यात आली आहेत. २०१९ मध्ये एकूण १,४८,१८५, तर २०२० मध्ये १,२८,५३१ तसेच २०२१ मध्ये १,४९,४०४ बाल लैंगिक अत्याचारांची प्रकरणे दाखल आहेत.[९३] कोवळे वय आणि मन, निरागसपणा, मोठ्यांवर असलेले अवलंबित्व, शारीरिक शक्तीचा अभाव आणि इतर कारणांमुळे बालके लैंगिक अत्याचारांचे बळी ठरतात. असे अत्याचार करणारे या मुलांच्या ओळखीतले किंवा जवळचे लोक असण्याची शक्यता जास्त असते. अशा अत्याचाराचा अतिशय गंभीर शारीरिक आणि मानसिक परिणाम या मुलांवर होतो. याचा परिणाम त्यांच्या शिक्षणामध्ये आणि सर्वांगीण प्रगतीमध्ये होतो. कोवळ्या मनाची ही मुले पोलीसांसमोर, न्यायाधीशांसमोर बोलण्यास कचरतात. त्यामुळे त्यांच्यावर होणाऱ्या लैंगिक अत्याचारांसाठी विशेष तरतूद असण्याची आणि असे अपराध सिद्ध करणे आणि दोषींना शिक्षा करण्याची स्वतंत्र यंत्रणा असावी असे प्रकर्षाने जाणवू लागले होते. त्यामुळे बालकांच्यावर होणाऱ्या लैंगिक अत्याचारापासून संरक्षण करण्याकरिता २०१२ साली एक विशेष कायदा पारित करण्यात आला. हा कायदा 'लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२' (पोक्सो कायदा) म्हणून ओळखला जातो.

कायदेशीर प्रक्रियेच्या दरम्यान प्रत्येक टप्प्यावर मुलांच्या हिताचे संरक्षण करून लैंगिक हल्ले, लैंगिक छळ आणि पोर्नोग्राफी अशा प्रकारच्या गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी एक मजबूत कायदेशीर चौकट पुरवण्याकरता लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ तयार करण्यात आला. हा कायदा तयार करताना 'बालकाचे हित आणि कल्याण' याला सर्वात अधिक महत्त्व देण्यात आलेले आहे. मुलांना त्रास होणार नाही अशा पद्धतीने अहवाल देणे, पुराव्याची नोंद करणे आणि विशेष न्यायालयांच्या मार्फत जलद गतीने खटले चालवणे अशा तरतुदींचा यात समावेश करण्यात आला आहे.

**लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ (POCSO) च्या ठळक तरतुदी / वैशिष्टे -**

**१) १८ वर्षांखालील सर्व बालकांना लागू**

या कायद्यामध्ये बालक म्हणजे १८ वर्षाखालील व्यक्ती.

**२) लैंगिक अत्याचाराची लिंगभाव निरपेक्ष व्याख्या**

या कायद्यामध्ये १८ वर्षांखालील मुलांशी लैंगिक दुर्वर्तन किंवा अत्याचाराची व्याख्या लिंगभाव (जेंडर) निरपेक्ष करण्यात आलेली आहे. म्हणजे मुलींच्या आणि मुलांच्या वर कोणत्याही प्रकारचा लैंगिक अत्याचार / शोषण झाले तरी या कायद्याप्रमाणे त्याला गुन्हा मानले आहे.

---

[९३] Data: Between 2014 to 2022, Number of Crimes Against Children Increased by Over 80%, Increase Observed in Most States. FACTLY. https://factly.in/data-between-2014-2022-number-of-crimes-against-children-increased-by-over-80-increase-observed-in-most-states/#:~:text=Year%2Dwise%20Number%20of%20Crimes%20against%20Children%20in%20India&text=The%20number%20of%20crimes%20against%20children%20shows%20a%20steep%20increase,of%2081%25%20in%20nine%20years.

### ३) गुन्हेगार कोणीही असू शकते

बालकासोबत लैंगिक कृती करणारी व्यक्ती, प्रौढ किंवा बालक, स्त्री किंवा पुरुष अथवा तृतीयपंथी, कोणीही असू शकते. बलाकांविरोधात देखील या कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवला जाऊ शकतो, फक्त त्यांचे वर कारवाई करताना अल्पवयीन न्याय कायदा, २०१५ लक्षात ठेवूनच कारवाई करता येते.

### ४) संमती होती किंवा नाही यावर गुन्हा झाला आहे किंवा नाही हे अवलंबून नाही

वर नमूद कोणतीही कृत्ये सहमतीने / संमतीने झालेली असली तरी हा कायदा त्यास मान्यता देत नाही आणि कायद्याच्या दृष्टीने ती कृत्ये गुन्हाच ठरतात. वैवाहिक जोड्प्यामधील संबंधाना देखील या कायद्यात कोणत्याही प्रकारची सूट दिलेली नाही. त्यामुळे विवाह झाल्यानंतर जर बालकासोबत वरील कोणतेही कृत्य घडले तरी देखील त्याला गुन्हाच मानले जाते. त्यामुळे बालविवाह झाल्यानंतर जर विवाहित बालकासोबत कोणत्याही प्रकारचे लैंगिक शोषणाचे कृत्य घडले तर तिच्या / त्याच्या जोडीदाराला शिक्षा होऊ शकते. विशेषतः, जेव्हा बाल वधू गरोदर असल्याचे समजते तेव्हा तिच्या पतीवर या कायद्यांतर्गत लैंगिक शोषण केल्याबद्दल कारवाई केली जाऊ शकते.

### ५) सर्वसमावेशक तरतुदी

विस्तृत लैंगिक अत्याचारांची दखल पोक्सो कायद्याने घेतले आहे. यात शारीरिक स्पर्शाद्वारे तसेच अशारीरिक संपर्काद्वारे करण्यात येणाऱ्या सर्वच अत्याचारांचा समावेश आहे, जसे की-

- संभोग
- बालकांच्या गुप्तांगांशी खेळणे किंवा बालकाला गुन्हेगाराच्या गुप्तांगाला स्पर्श करायला लावणे
- लैंगिक हेतूने बालकाच्या कोणत्याही अवयवाला स्पर्श करणे
- लैंगिक हेतूने चुंबन घेणे
- बालकाला अश्लील चित्रफित किंवा छायाचित्र दाखवणे (पोर्नोग्राफी)
- बालकाचा उपयोग अश्लील साहित्यात करणे
- बालकाला उद्देशून अश्लील हावभाव करणे
- लैंगिक खेळ खेळणे
- लैंगिक हेतूने बालकाशी इंटरनेट च्या माध्यमातून संपर्क ठेवणे

विश्वास, अधिकार किंवा सत्तापदावर असलेल्या व्यक्ती जसे की शिक्षक, पोलीस, डॉक्टर, संरक्षण दलातील कर्मचारी जर वरील लैंगिक गुन्हा करण्यास जबाबदार असतील तर अशांविरोधात अधिक कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

### ६) बालकांचे संरक्षण ही सगळ्यांची जबाबदारी

या कायद्यात बाल लैंगिक गुन्ह्यांची तक्रार पोलिसांकडे करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकावर टाकलेली आहे. ज्या व्यक्तीला असा गुन्हा घडल्याची माहिती मिळालेली आहे त्या व्यक्तीने ती माहिती विनाविलंब पोलिसांना कळवायची आहे. बाल लैंगिक गुन्हा घडला असल्याची माहिती असून सुद्धा ती माहिती पोलिसांना न देणे देखील या कायद्याप्रमाणे गुन्हा आहे.

### ७) बाल स्नेही पद्धतीचे अवलंबन करणे

पोक्सो कायद्यांतर्गत काम करणाऱ्या यंत्रणा आणि पद्धती संवेदनशील आणि बालकांच्या गरजांना लक्षात ठेवून निर्माण करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे बालकाचे हित आणि कल्याण याला सर्वात जास्त प्राधान्य दिलेले आहे.

### ७) बालकांची आणि कुटुंबाची गोपनीयता

बालकाचे नाव, कुटुंब, शाळा, किंवा इतर तपशील गोपनीय ठेवणे बंधनकारक आहे. कोणत्याही मार्गाने बालकाची ओळख जाहीर करणे किंवा प्रसिद्ध करणे गुन्हा आहे.

### बालविवाह आणि पोक्सो कायदा

विवाह झाल्यानंतर पती-पत्नीच्या दरम्यान शारीरिक संबंध निर्माण होणे समाजमान्य आहे. खरेतर विवाहबाह्य शारीरिक संबंध समाज मान्य करत नाही, तसेच विवाहानंतर शारीरिक दुरी देखील समाजाच्या टीकेला पात्र होऊ शकते.

त्यामुळे विवाहाचा एक सहज आणि अगदी सहाजिक परिणाम म्हणजे पती-पत्नीच्या दरम्यानचे शारीरिक संबंध. मग तो विवाह 'बालविवाह' असला तरी.

परंतु जेव्हा १८ वर्षांखालील मुलांसोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केले जातात, तेव्हा पोक्सो कायद्यांतर्गत त्यांना गुन्हा

मानले जाते. अशा संबंधांमध्ये प्रस्थापितांची संमती होती की नाही, ते विवाहित होते की कसे, अशा कोणत्याही मुद्द्यांचा विचार केला जात नाही.

बालविवाह झाल्यामुळे जरी दोघांमध्ये पती-पत्नीचे नाते निर्माण झाले असले तरी दोघांपैकी एक व्यक्ती जरी १८ वर्षांखाली असली, तर दोघांमधील शारीरिक संबंधांवर पोक्सो कायद्यामुळे बंदी आहे, आणि असे कोणतेही कृत्य गुन्हा मानले जाते. ही गुंतागुंत समजून घेणे आणि याबाबत पालकांना, बालकांना शिक्षित करणे गरजेचे आहे.

अशा प्रकारे शारीरिक संबंध प्रस्थापित झाल्यास भारतीय दंड विधान, १८६० मधील ३७६ कलमातील तरतुदीनुसार ते गुन्हा ठरत असे. परंतु त्याकरिता पत्नीचे वय १५ पेक्षा कमी असणे गरजेचे होते. एकीकडे बालविवाहसाठी मुलींची वयोमर्यादा १८ असताना, भारतीय दंड विधान, १८६० मध्ये मात्र १५ ही वयोमर्यादा दिली होती. परंतु सर्वोच्च न्यायालयाने इंडिपेंडंट थॉट विरुद्ध भारत सरकार या निकालात भारतीय दंड विधान मध्ये दिलेली वयोमर्यादा १६ च्या जागी १८ अशी वाचण्यात यावी असे सांगितले. त्यामुळे पतीने १८ वर्षांखालील पत्नी सोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केल्यास त्याला बलात्कार मानले जाते. असे संबंध प्रस्थापित करत असताना त्या पत्नीची संमती होती की नाही याने कोणताही फरक पडत नाही आणि सर्व परिस्थितीत त्याला बलात्कार मानले जाते.

जरी दोघांमध्ये शारीरिक संबंध प्रस्थापित झाले की नाही हे पोलिसांना कळणे अवघड असले, तरी जर अशा संबंधातून पत्नी गरोदर राहिली तर मात्र ही बाब रुग्णालयात गेल्यास / डॉक्टर कडे गेल्यास सहज उघड होऊ शकते. याचा दुसरा परिणाम असा होतो की अनेकवेळा अशा मुलीचे खरे वय डॉक्टरांपासून लपवले जाते आणि मुलीची तसेच तिच्या पोटात वाढणाऱ्या जीवाची काळजी नीट घेतली जात नाही. तसेच, घराच्याघरी प्रसूती देखील केल्या जातात, ज्यात अनेक माता आणि बाळे आपले जीव गमावू शकतात.

पॉक्सो कायद्याखाली गुन्हा घडल्याचा संशय असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने त्याबाबतची माहिती पोलिसांना देणे कलम (१९) अंतर्गत आवश्यक आहे. त्यामुळे डॉक्टर, वैद्यकीय चाचणी करणारे तज्ञ यांना मुलीचे वय कमी असल्याचे लक्षात आल्यावर पोलिसांना कळविणे बंधनकारक आहे. तसे न केल्यास ६ महिन्यांचा तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होऊ शकते. पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवल्यानंतर सदर प्रकरणाचा अहवाल २४ तासांच्या आत बाल कल्याण समिती आणि न्यायालयाला सादर करावा लागतो. सदर बालकाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ती पावले पोलिसांनी उचलणे आणि गरज असल्यास बालकाला आधारगृहात ठेवणे गरजेचे असते.

बालविवाह रोखताना लैंगिक अत्याचाराने पिडीत असणाऱ्या बालकांना न्यायालयीन प्रकरणात सहाय्य व्हावे यासाठी बालकांचे लैंगिक शोषणापासून प्रतिबंध अधिनियम २०१२ कलम ३९ नुसार स्वयंसेवी संस्था, बाल तज्ञ, बालमानस तज्ञ, बाल कल्याण क्षेत्रात कार्यरत समाजकार्यकर्ते यांची मदत घेता येते ही बाब बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांनी लक्षात घेतली पाहिजे. या अधिनियमानुसार बाल लैंगिक अपराधाची माहिती न दिल्यास शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. कलम २१ हे लैंगिक शोषणाचे बळी ठरलेल्या बालकांची माहिती पोलिसांना व इतर सबंधित यंत्रणांना देणे बंधनकारक करते तसेच कलम २२ नुसार खोटी तक्रार दिल्यास शिक्षा करते. म्हणून बालविवाह प्रतिबंध अधिकारी आणि बालविवाह रोखण्यात सहाय्य करणारे घटक यांनी बालविवाह थांबवताना बालक लैंगिक शोषणाचे बळी नसल्याची खात्री केली पाहिजे.


# १४ बाल न्याय अधिनियम, २०१५ आणि बालविवाह

१. बाल न्याय अधिनियमाच्या **कलम २ (१४) (xii)** नुसार ज्या बालकांचे विवाहयोग्य वय पूर्ण होण्याआधी लग्न होण्याचा धोका असतो आणि ज्यांचे पालक, नातेवाईक त्यांचे लग्न लावण्यासाठी जबाबदार असतात अशा बालकांना कायद्याच्या नजरेत 'सुरक्षा आणि काळजीची गरज असणारे बालक' मानले जाते.

२. बाल न्याय नियमांच्या **नियम ५५** नुसार बालविवाह लावून देणे याला बालकांवरील हिंसा मानले जाते आणि अशी हिंसा करणाऱ्यांवर **कलम ७५** अंतर्गत गुन्हा नोंदवला जाऊ शकतो. त्यांना 2 वर्षे तुरुंगवास किंवा १ लाखांचा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होऊ शकते.

३. त्यामुळे अशा बालकांना २४ तासांच्या आत बाल कल्याण समिती समोर हजर करणे बंधनकारक असते. बाल कल्याण समितीच्या कामकाजाच्या वेळेनंतर बालकाला सादर करायचे असल्यास बाल कल्याण समितीच्या एखाद्या सदस्यासमोर करता येते.

बालविवाह झालेल्या किंवा होण्याची शक्यता असणाऱ्या बालकांप्रती खालील पद्धतीने नियमावली पाळण्यात यावी-



# १५ ग्राम सेवकाने पोलिसांना तक्रार करावयाचा अर्जाचा नमुना (परिशिष्ट - १)

ग्रामपंचायती चे नाव (किंवा लेटरहेड )

दिनांक :-

प्रति

वरिष्ठ पोलिस निरीक्षक

............पोलिस ठाणे

**विषय :- बालविवाह होत असल्याबद्दल तक्रार / बालविवाह झाल्याबद्दल तक्रार**

**महोदय**

आज दिनांक ................. रोजी आमच्या निदर्शनास आले आहे की, या ............................................... ग्राम पंचायतीच्या हद्दीतील ................................ या गावात, श्री.............................................................. यांच्या मुलीचा / मुलाचा विवाह होत असल्याचे / झाला असल्याचे आम्हाला समजले आहे. विवाह होणा-या / झालेल्या मुलीचे / मुलाचे नाव ............................... हे असून आमच्या माहितीप्रमाणे तिचे / त्याचे आजचे वय......... हे आहे. (या बाबतचा पुरावा जोडीत आहोत). आणि ती / तो या ................................................................... शाळेत आणि या ............... इयत्तेत शिकत आहे / किंवा तिने / त्याने शाळा सोडली आहे. मुलीचे १८ वर्षापेक्षा / मुलाचे २१ वर्षांपेक्षा कमी वय लक्षात घेता, तिच्या / त्याच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून तिचे / त्याचे या वयात लग्न होणे हा बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत दखलपात्र गुन्हा आहे. सबब मी / आम्ही आपल्याला या बाबत संबंधितावर कायदेशीर कार्यवाही करावी या साठी विनंती करीत आहोत.

या बाबतच्या कार्यवाहीत आपल्याला आमच्याकडून सर्वोतोपरी सहकार्य मिळेल.

आपल्या सहकार्याच्या अपेक्षेत....

आपले नम्र

ग्रामसेवकाची नाव आणि सही

प्रतिलिपी:- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

मा. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, यांना देऊन उचित कार्यवाहीसाठी सादर

सदरचे पत्र जिल्हा बाल संरक्षण कक्षास सुद्धा देता येईल. असेच पत्र गाव बाल संरक्षण समिती सुद्धा पोलिस स्टेशन आणि जिल्हा बाल संरक्षण कक्षास देऊ शकेल.

# १६ जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांचे बाल कल्याण समिती यांच्यासाठीचे पत्राचा नमुना (परिशिष्ट - २)

जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे लेटरहेड

दिनांक :-

**प्रति**

**अध्यक्ष/सदस्य**

बाल कल्याण समिती

**विषय :- बालविवाह होत असल्याबद्दल तक्रार / बालविवाह झाल्याबद्दल तक्रार**

**महोदय / महोदया**

आज दिनांक ................ रोजी आमच्या निदर्शनास आले आहे की, या ............................................. ग्राम पंचायतीच्या हद्दीतील ............................... या गावात, श्री............................................................ यांच्या मुलीचा / मुलाचा विवाह होत असल्याचे / झाला असल्याचे आम्हाला समजले आहे. विवाह होणा-या / झालेल्या मुलीचे / मुलाचे नाव .............................. हे असून आमच्या माहितीप्रमाणे तिचे / त्याचे आजचे वय......... हे आहे. (या बाबतचा पुरावा जोडीत आहोत). आणि ती / तो या ................................................................... शाळेत आणि या .............. इयत्तेत शिकत आहे / किंवा तिने / त्याने शाळा सोडली आहे. मुलीचे १८ वर्षापेक्षा / मुलाचे २१ वर्षांपेक्षा कमी वय लक्षात घेता, तिच्या / त्याच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून तिचे / त्याचे या वयात लग्न होणे हा बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत दखलपात्र गुन्हा आहे. सबब मी / आम्ही आपल्याला या बाबत संबंधितावर कायदेशीर कार्यवाही करावी या साठी विनंती करीत आहोत.

या बाबतच्या कार्यवाहीत आपल्याला आमच्याकडून सर्वोतोपरी सहकार्य मिळेल.

आपल्या सहकार्याच्या अपेक्षेत....

आपले नम्र

जिल्हा बाल संरक्षण कक्ष प्रतिनिधी (नाव आणि सही )

प्रतिलिपी:-मा. जिल्हा महिला आणि बाल कल्याण अधिकारी

# १७ बाल कल्याण समितीचे पोलिसांसाठी समन्सचा नमुना (परिशिष्ट - ३)

जिल्हा बाल कल्याण समितीचे (लेटरहेड किंवा संगणकीय पत्र)

दिनांक :-

**प्रति**

**वरिष्ठ पोलिस निरीक्षक**

............पोलिस ठाणे

**विषय :- बालविवाह होत असल्याबद्दल तक्रार / बालविवाह झाल्याबद्दल तक्रार**

**संदर्भ :- ( तक्रारीची प्रत जोडीत आहोत )**

आज दिनांक ................. रोजी आमच्या निदर्शनास आले आहे की, या ............................................. ग्राम पंचायतीच्या हद्दीतील ............................... या गावात, श्री............................................................ यांच्या मुलीचा / मुलाचा विवाह होत असल्याचे / झाला असल्याचे आम्हाला समजले आहे. विवाह होणा-या / झालेल्या मुलीचे / मुलाचे नाव ............................... हे असून आमच्या माहितीप्रमाणे तिचे / त्याचे आजचे वय......... हे आहे. (या बाबतचा पुरावा जोडीत आहोत). आणि ती / तो या .................................................................... शाळेत आणि या .............. इयत्तेत शिकत आहे / किंवा तिने / त्याने शाळा सोडली आहे. मुलीचे १८ वर्षापेक्षा / मुलाचे २१ वर्षांपेक्षा कमी वय लक्षात घेता, तिच्या / त्याच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून तिचे / त्याचे या वयात लग्न होणे हा बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत दखलपात्र गुन्हा आहे. आम्ही आपल्याला या बाबत संबंधितावर कायदेशीर कार्यवाही करावी / संबंधितांवर गुन्हा दखल करावा / मुलीला / मुलाला आणि तिच्या / त्याच्या कुटुंबियांना समिती समक्ष दिनांक............................... या दिवशी या वेळेत ...................... हजर करावे या साठी आदेशित.

आपले नम्र

जिल्हा बाल कल्याण समिती (नाव आणि सही) (बाल कल्याण समितीचे सील)

प्रतिलिपी:-

**मा. पोलिस अधिक्षक,**

**मा. पोलिस उप-अधिक्षक (होम),**

# १८ विवाह होणाऱ्या ठिकाणी किंवा मंगल कार्यालयाने घ्यावयाची काळजी (परिशिष्ट - ४)

**मंगल कार्यालयात लग्न करण्यासाठी येणा-या व्यक्ती कडून पुढील माहिती मंगल कार्यालयाने घेणे आवश्यक आहे.**

लग्न पत्रिका

लग्न होत असलेल्या व्यक्तींची जन्म दाखले (जन्म तारखेची नोंद असल्याचा पुरावा)

लक्षात असू द्यात मुलीचे वय १८ आणि मुलाचे वय २१ वय वर्षे पूर्ण होणे आवश्यक.

मंगल कार्यालय त्यांच्या कडे नोंदी असलेल्या सर्व दाखल्यांचे दस्तावेज एक वर्ष जतन करतील

**मंगल कार्यालयाच्या दर्शनी भागात खालील माहिती मोठ्या फलकावर लावता येईल :-**

**आमच्या मंगल कार्यालयात मुलीचे वय १८ वर्षे पुर्ण आणि मुलाचे वय २१ वर्षे पुर्ण झाल्यावरच लग्न होतात.**

**आमच्या मंगल कार्यालयात बालविवाह होत नाहीत.**

**बालविवाह करणे कायद्याने गुन्हा आहे.**

**मंगल कार्यालय / वस्तू भांडार / फोटोग्राफर्स यांच्यासाठीचा माहिती अर्ज**

**नियोजित लग्नाची तारीख:**

**मुलीची माहिती**

मुलीचे नाव :

जन्म दिनांक :

वय: वर्षे पूर्ण

शिक्षण:

शाळा/महाविद्यालयाचे नाव:

वधुपित्याचे नाव:

व्यवसाय:

आईचे नाव:

व्यवसाय:

सध्याचा वास्तव्याचा पत्ता :

कायमचा पत्ता/मूळ गाव:

**मुलाची माहिती**

मुलीचे नाव :

जन्म दिनांक :

वय:        वर्ष पूर्ण

शिक्षण:

शाळा/महाविद्यालयाचे नाव:

मुलाच्या वडिलांचे नाव:

व्यवसाय:

आईचे नाव:

व्यवसाय:

सध्याचा वास्तव्याचा पत्ता :

कायमचा पत्ता/मूळ गाव:

आम्ही शपथ पूर्वक नमूद करतो की वरील माहिती खरी व बरोबर असून पुराव्या दाखल आम्ही खालील कागदपत्र जोडत आहोत

१. वयाचा पुरावा

२. आधार कार्ड

३. मतदान ओळख पत्र

४. रेशन कार्ड

५. लाईट बिल

मुलीच्या वडिलांचे नाव :

सही

मुलीच्या आईचे नाव

सही

मुलाच्या वडिलांचे नाव :

सही

मुलाच्या आईचे नाव :

सही

मंगल कार्यालयाचे नाव:

व्यवस्थापकाची सही व शिक्का:

# १९ बालविवाह न करण्याबाबत घ्यावयाची शपथ (परिशिष्ट - ५)

बालविवाहामुळे मुला-मुलींच्या शैक्षणिक, सामाजिक, मानसिक, आणि शारीरिक आयुष्यावर दुष्परिणाम होत असतात याची आम्हाला जाणीव आहे. बालविवाह हा कायदेशीर गुन्हा असून कायद्याचे उल्लंघन केल्यास तुरुंगवास आणि शिक्षा होऊ शकते याची मला जाणीव आहे.

मी अशी प्रतिज्ञा करतो / करते की मी बालविवाह करणार नाही. माझ्या मित्र परिवारात, नातेसंबंधात, माझ्या गावात आणि शहरात बालविवाह होऊ देणार नाही यासाठी मी कटिबद्ध आहे. तसेच, बालविवाहाच्या कोणत्याही कार्यात सहभागी होणार नाही आणि बालविवाहात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत करणार नाही.

बालविवाहाच्या विपरीत परिणामांबद्दलची माहिती मी सर्वांना सांगेन. तसेच बालविवाह रोखण्याकरिता मी जिल्हा प्रशासनाला संपूर्ण सहकार्य करीन.

माझा जिल्हा / माझं गाव / माझी शाळा बालविवाहमुक्त जिल्हा / गाव / शाळा करण्याचा पूर्ण प्रयत्न मी करेन!

जय हिंद!

# २० बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांचे नियुक्ती बाबत महाराष्ट्र शासनाची अधिसूचना (परिशिष्ट - ६)

RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013-15

सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन राजपत्र

### असाधारण भाग चार—अ

वर्ष ५, अंक ३४(२)] मंगळवार, जून २५, २०१३/आषाढ ४, शके १९३५ [पृष्ठे २, किंमत : रुपये २५.००

असाधारण क्रमांक ७६

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

महिला व बालविकास विभाग
नवीन प्रशासकीय इमारत, ३रा मजला, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ जून २०१३.

अधिसूचना

**बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६.**

क्रमांक संकीर्ण. २०१२/प्र.क्र. १६०/का. २.— बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ (२००७ चा ६) च्या कलम १६ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याद्वारे ,—

(१) उक्त कलम १६ च्या पोट-कलम (१) अन्वये ग्रामसेवक यांना त्यांच्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये उक्त अधिनियमातील शक्तींचा वापर करण्यासाठी आणि कर्तव्य पार पाडण्यासाठी बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

(२) आदेशित करण्यात येते की, उक्त कलम १६ च्या पोट-कलम (२) अन्वये संबंधित ग्राम पंचायत क्षेत्रात नियुक्त केलेल्या अंगणवाडी सेविका, बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यांस सहाय्य करतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

म. बा. हजारी,
शासनाचे उप सचिव.

भाग चार-अ-(७६)-१ (१)

RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष २, अंक ७८] शुक्रवार, ऑगस्ट १९, २०१६/श्रावण २८, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १२१**

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**महिला व बालविकास विभाग**

३ रा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ ऑगस्ट २०१६

**अधिसूचना**

**बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६.**

क्रमांक बालवि. २०१४/प्र.क्र. ६७/का-९.— बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ (२००७ चा ६) यांच्या कलम १६ ची पोट-कलमे (१) व (३) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, उक्त अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या भाग-एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकारांचा, उक्त अनुसूचीच्या भाग-दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती व मर्यादांच्या अधिनतेने वापर करण्यासाठी बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना आपापल्या संबंधित प्रकल्प क्षेत्रावर अधिकारिता असणारे बाल विवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून याद्वारे नियुक्त करीत आहे, आणि उक्त अधिनियमाच्या कलम १६ च्या पोट-कलम (२) च्या प्रयोजनासाठी बाल विवाह प्रतिबंध अधिकाऱ्याला सहाय्य करण्याकरिता संबंधित बालविकास प्रकल्प (नागरी) या अंतर्गत येणाऱ्या अंगणवाडी पर्यवेक्षिकांचीदेखील नियुक्ती करीत आहे.

**अनुसूची**

भाग एक

बाल विवाह प्रतिबंध अधिकारी पुढील अधिकारांचा वापर करील :—

(एक) बाल विवाह प्रतिबंध अधिकारी हा, केवळ बाल विवाह प्रकरणांमध्ये त्याच्याकडील पोलीस अधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करील. तथापि, अशा ठिकाणी भेट देतांना आवश्यक वाटल्यास ते पोलीस अधिकाऱ्यांची मदत घेऊ शकतात.

(दोन) बाल विवाह विधीपूर्वक लावण्यास प्रतिबंध करण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशी कारवाई करणे.

(तीन) अभिकथित आरोपी व्यक्तींवर प्रभावीपणे खटला चालविण्यासाठी साक्षी पुरावे गोळा करणे.

(चार) या अधिनियमान्वये व्यथित व्यक्ती व तिचे नातेवाईक किंवा तिच्यासोबत असणारी व्यक्ती किंवा अन्य व्यक्ती यांच्या हक्कांविषयी माहिती पुरविणे.

(पाच) राज्य विधी सहाय्य सेवा प्राधिकरणामार्फत व्यथित व्यक्तींना कायदेशीर सहाय्य पुरविणे.

(सहा) निवारा गृहांविषयी व्यथित व्यक्तीला माहिती देणे आणि आवश्यक असल्यास, न्यायालयाची कार्यवाही प्रलंबित असतांना अथवा व्यथित व्यक्तीच्या सुरक्षेच्या प्रयोजनासाठी निवारागृहामध्ये त्यांच्या निवाऱ्याची व्यवस्था करणे. तसेच,

(सात) त्याच्या अधिकारितेच्या क्षेत्रामध्ये बाल विवाह विधीपूर्वक लावण्याची शक्यता टाळण्यासाठी जागरुकता निर्माण करणे.

भाग दोन

बाल विवाह प्रतिबंध अधिकारी हा, पुढील शर्ती व मर्यादांच्या अधिनतेने, उपरोक्त भाग-एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकारांचा वापर रील :—

(एक) बाल विवाह प्रतिबंध अधिकाऱ्यास केवळ त्याच्या अधिकारितेच्या क्षेत्रामध्ये उपरोक्त अधिकारांचा वापर करता येईल.

(दोन) बाल विवाह प्रतिबंध अधिकारी सद्भावनापूर्वक अधिकाराचा वापर करील.

(तीन) बाल विवाह प्रतिबंध अधिकारी, बळी पडलेल्या व्यक्तीला (बालकाला) सहाय्य करण्यासाठी अधिकारांचा वापर करील.

(चार) बाल विवाह प्रतिबंध अधिकारी केवळ बाल विवाहाच्या प्रकरणांमध्ये पोलीस अधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**स्मिता निवतकर,**
शासनाच्या उप सचिव.

RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013-15

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ५, अंक ३४(२)] मंगळवार, जून २५, २०१३/आषाढ ४, शके १९३५ [पृष्ठे २, किंमत : रुपये २५.००

असाधारण क्रमांक ७६

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

महिला व बालविकास विभाग
नवीन प्रशासकीय इमारत, ३रा मजला, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ जून २०१३.

अधिसूचना

ल विवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६.

क्रमांक संकीर्ण. २०१२/प्र.क्र. १६०/का. २.— बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ (२००७ चा ६) च्या कलम १६ द्वारे प्रदान करण्यात लेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे ,—

(१) उक्त कलम १६ च्या पोट-कलम (१) अन्वये ग्रामसेवक यांना त्यांच्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये उक्त अधिनियमातील शक्तींचा वापर ण्यासाठी आणि कर्तव्य पार पाडण्यासाठी बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

(२) आदेशित करण्यात येते की, उक्त कलम १६ च्या पोट-कलम (२) अन्वये संबंधित ग्राम पंचायत क्षेत्रात नियुक्त केलेल्या अंगणवाडी का, बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यांस सहाय्य करतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

म. बा. हजारी,
शासनाचे उप सचिव.

# २१ बाल संरक्षण समिती बाबतीत महाराष्ट्र शासनाचा निर्णय (परिशिष्ठ - ७)

**एकात्मिक बाल संरक्षण योजनेंतर्गत ग्राम, तालुका व नगर बाल संरक्षण समित्या स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
महिला व बाल विकास विभाग,
शासन निर्णय क्र.ICPS-२०१४/प्र.क्र.२३/का.८
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १० जून, २०१४.

**शासन निर्णय :-** केंद्र पुरस्कृत एकात्मिक बाल संरक्षण योजना (Integrated Child Protection Scheme) राज्य शासनाने राज्यात राबविण्यासाठी केंद्र शासनाबरोबर दिनांक १३ ऑगस्ट, २०१० रोजी सामंजस्य करार (MOU) केलेला आहे. सदर केंद्रशासन पुरस्कृत योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. त्याअंतर्गत राज्यदत्तक स्त्रोत संस्था (SARA) व ३५ जिल्हयामध्ये जिल्हा बाल संरक्षण कक्षांची (DCPU) स्थापना देखील करण्यात आली आहे. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम-२००० (२००६) [JUVENILE JUSTICE [(Care & Protection of Children) Act, २००० (२००६)] च्या कलम ६२-अ व महाराष्ट्र बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) सुधारीत नियम, २०११ च्या कलम १४ नुसार वरील उल्लेखीत संस्थांची स्थापना करण्यात आली आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम-२००० (२००६) तसेच बालकांविषयी इतर सर्व कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे हे प्रामुख्याने वरील उल्लेखित संस्थांचे कार्य आहे. एकात्मिक बाल संरक्षण योजनेचे केंद्र शासनाने आखून दिलेले उद्दिष्ट खालील प्रमाणे आहे.

१) बालकांना अत्यावश्यक सेवा व सुविधा पुरविणा-या संस्थांचे बळकटीकरण करणे.
२) सर्व संबंधित संस्थामधील (शासकीय/अशासकीय) व्यक्तींची क्षमता वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने कार्यक्रम राबविणे.
३) बालकांच्या संरक्षणाच्या संदर्भातील सर्व प्रकारची (सर्व विभागांकडील) सांख्यिकीय व गुणात्मक माहिती संकलित करणे.
४) कौटुंबिक व सामाजिक स्तरावर बाल संरक्षणाला बळकटी देण्यासाठी त्या स्वरुपाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.
५) बालकांना आवश्यक सोई सुविधा पुरविणा-या सर्व शासकीय/निमशासकीय व सामाजिक संस्थाशी बालकांना सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने समन्वय साधणे.
६) बाल संरक्षण बाबी विषयी समाजामध्ये जनजागृती करणे.
७) बालकासंदर्भातील सर्व कायद्यांची अंमलबजावणी करणे.

मुलांची काळजी आणि संरक्षण करण्यासाठी कुटुंब आणि कुटुंबातील घटक परिस्थितीमुळे ज्यामध्ये अत्यंत हालाखीची गरीबी, असुरक्षित स्थलांतर, पालकांचे दीर्घकालीन आजारपण किंवा मृत्यू यास्थितीत आपल्या क्षमतेमध्ये कमी पडतात. प्रामुख्याने अलीकडे बालकांविरोधी हिंसा अनेक पटीने वाढल्या आहेत आणि तुलनेत मुलांसाठीच्या औपचारिक संरक्षणाच्या यंत्रणा कमी पडतात. ज्यामुळे मुलांची असुरक्षितता वाढत असते. मुलांची उपेक्षा, हिंसा आणि शोषण हया परिस्थितीला तोंड देण्यासाठी ग्रामपातळीवर / तालुका पातळीवर संरक्षित यंत्रणा (Community Based Structures) अस्तित्वात येईल अशा बाल संरक्षण समित्या (Child Protection Committees) मुलांच्या संरक्षणासाठी आणि संरक्षक वातावरण निर्मितीसाठी सहाय्यक ठरतील. तसेच अशा ग्राम / तालुका पातळीवरील यंत्रणा प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक पातळीवर मुलांसाठी संरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी कार्यरत राहतील.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम-२००० (२००६) [JUVENILE JUSTICE (Care & Protection of Children) Act, २००० (२००६)] च्या कलम ८१ (फ) व महाराष्ट्र बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) सुधारीत नियम, २०११ च्या कलम १४ च्या (११-२) च्या (ड) नुसार कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता जिल्हा, तालुका, नगर आणि ग्राम स्तरावर बाल संरक्षण समिती उभारण्याची तसेच तिची कार्ये पार पाडण्याची सुनिश्चती करणे इत्यादी बाबींचा अंतर्भाव जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या विनिर्दिष्ट कार्यामध्ये केला आहे. केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या नियामावलीच्या अनुषंगाने ग्राम बाल संरक्षण समिती, नगर बाल संरक्षण समिती, तालुका बाल संरक्षण समिती या समित्यांची स्थापना तसेच या समितीची रचना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

**१) ग्राम बाल संरक्षण समिती : (महसुली गाव)**

**रचना**

१) सरपंच किंवा ग्राम स्तरावर निवडून आलेला प्रतिनिधी (ग्राम पंचायतद्वारे नियुक्त केलेला/केलेली) — अध्यक्ष- १

२) पोलिस पाटील — सदस्य — १

३) आशा सेविका — सदस्य — १

४) प्राथमिक / माध्यमिक (अनुदानित) शाळेचे मुख्याध्यापक अथवा शिक्षक— सदस्य — १

५) अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती — सदस्य — १

६) स्थानिक सामाजिक प्रतिनिधी — सदस्य ३ (स्वयंसेवी संस्था, बचत गट, महिला मंडळ, इ.पैकी)

७) वय वर्षे १२ ते १८ या वयोगटातील मुलगा प्रतिनिधी — सदस्य — १

८)वय वर्षे १२ ते १८ या वयोगटातील मुलगी प्रतिनिधी — सदस्य — १

९)अंगणवाडी सेविका — सदस्य सचिव

वरील सर्व प्रतिनिधींची निवड ग्रामसभेमध्ये/विशेष ग्रामसभेमध्ये सदरचा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत करण्यात यावी. या सदस्यापैकी जास्तीत जास्त महिला प्रतिनिधी असतील.

G.R.2014.doc

**ग्राम बाल संरक्षण समितीची कार्ये :**

**अ. प्रतिबंधात्मक कार्ये :**

**समस्या शोध :**

१) गावातील तसेच वॉर्डामध्ये काळजी व संरक्षणाची गरज असणा-या बालकांची माहिती एकत्रित करणे. तसेच त्याला कारणीभुत असणा-या घटकांचा, समस्यांचा शोध घेणे, तसेच जिल्हा बाल संरक्षण मध्ये दिलेल्या नियोजन नमुना आराखाडयामध्ये बाल संरक्षण बाबींवर वार्षिक नियोजन करणे.

२) बाल संरक्षण, बाल हक्क व बालकांचा सहभाग, इ. विषयांबाबत ग्रामस्तरावर जाणीव जागृती करुन या विषयांना गावाच्या व वार्डाच्या अर्थसंकल्पामध्ये, नियोजनामध्ये व प्रशासनिक कामामध्ये प्राथमिकता देणे व त्याबाबत आर्थिक तरतूद करणे.

३) बालकांना तसेच त्यांच्या कुटुंबाला आधार मिळेल अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, जिल्हा नियोजन समितीच्या विविध योजनांचा, स्त्रोतांचा शोध घेणे तसेच सदरच्या योजनांचा लाभ बालक/कुटुंबापर्यंत मिळवून देणे.

**योजनांचे एकत्रिकरण व समन्वय :**

१) काळजी व संरक्षणाची गरज असणा-या तसेच विधीसंघर्षग्रस्त बालकांना तसेच त्यांच्या कुटुंबांना अन्न, वस्त्र, निवारा, सामाजिक सुरक्षा, वैद्यकीय सुविधा, निर्वाहाच्या सोयी, तसेच शिक्षण, इ. बाबतच्या शासकीय योजनांचा एकत्रित लाभ देणे व त्याबाबत समन्वय साधणे.

२) काळजी व संरक्षणाची गरज असणा-या तसेच विधीसंघर्षग्रस्त बालकांना त्यासंबंधित प्रकरणे हाताळणारी सक्षम प्राधिकरणे तसेच तक्रार निवारण समिती उदा. बाल कल्याण समिती / बाल न्याय मंडळ आणि जिल्हा बाल संरक्षण कक्ष, इत्यादीशी समन्वय साधणे.

**बालक, तरुण तसेच प्रौढ, इ. च्या सहभागासाठी प्रोत्साहन व सहाय्य :**

बालकांच्या दृष्टीकोनातून त्यांच्या राहणीमानावर परिणाम करणा-या बाबींबाबत त्यांना निर्णय घेण्याकरीता पाठिंबा तसेच प्रोत्साहन देणे तसेच त्यांच्या निर्णयांचा आदर करणे. बालकांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या सर्व बाबींवर निर्णय घेताना बालकांचा सहभाग आर्वजून घेणे तसेच त्यांच्या मतांचा आदर करणे. उदा. ग्रामसभा, ग्राम पंचायत, प्राथमिक आरोग्य केंद्र, शाळा, इत्यादी.

**ब. उपाय योजनात्मक कार्ये :**

**बालकासंबंधातील विविध प्रकरणे ओळखून त्यांच्यामध्ये मध्यस्थी तसेच सहाय्य करुन त्या प्रकरणांचे निवारण करणे :**

१) बाल संरक्षण संदर्भातील विविध समस्या उदा. शारीरिक किंवा लैंगिक अत्याचार, हिंसात्मक कृत्ये तसेच बालकांचे शोषण निवारणा संदर्भात महत्त्वाची भुमिका बजावणे.

G.R.2014.doc

२) बालकांवर परिणाम करणा-या विविध समस्यासंदर्भात उदा. बाल विवाह, बाल कामगार, अनैतिक व्यापार, बालकांचे लैंगिक शोषण इत्यादी प्रतिबंधात्मक तसेच उपचारात्मक उपाययोजना करणे.

३) बालकांसंदर्भात घडणा-या अत्याचाराच्या तसेच शोषणाच्या घटनांवर योग्य ती कायदेशीर भूमिका घेऊन संबंधितांना कार्यवाही करण्यास सहकार्य करणे / भाग पाडणे.

४) पीडित बालकाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास सहकार्य करणे.

५) ग्राम स्तरावर ग्राम बाल संरक्षण कृती दलाची स्थापना करणे. ज्यामध्ये पोलीस पाटील, आरोग्य विभागातील प्रतिनिधी तसेच दोन सामाजिक कार्यकर्ते, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, इत्यादीचा समावेश असेल.

सदरच्या ग्राम बाल संरक्षण कृती दलातील वरील उल्लेखीत सदस्यांची निवड समितीच्या पहिल्या सभेमध्ये करण्यात यावी.

**ग्राम बाल संरक्षण कृती दलाचे कार्ये :**

१) ग्राम बाल संरक्षण समिती ज्या गावामध्ये स्थापन झालेली आहे. त्या परिसरामध्ये बालकांसदर्भात कुठल्याही घटनेची माहिती मिळाल्याबरोबर तात्काळ कमीतकमी वेळेत घटनास्थळी पोहचून सदरच्या बालकाला मदत करण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही करणे.

२) आवश्यकतेनुसार सदरच्या गरजू/प्रभावित बालकांस अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय चिकित्सा, इत्यादी तसेच संरक्षण तातडीने मिळेल तसेच या संबंधी व्यवस्था करणे. या संबंधीत शासकीय / अशासकीय यंत्रणेच्या / नागरिकांच्या देखील मदतीने वरील उल्लेखित सेवा पुरविणे / आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाई करणे.

३) जिल्हा बाल संरक्षण कक्ष व महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था निर्मित सनियंत्रण यंत्रणेस केलेल्या कार्यवाही बाबत तातडीने माहिती पुरविणे तसेच कार्यवाहीचा अहवाल शक्य तितक्या लवकर ग्राम बाल संरक्षण समितीला विहीत नमुन्यामध्ये सादर करणे. **(नमुना क्रमांक - १)**

**२) तालुका बाल संरक्षण समिती**

शासन निर्णय दि.२९.०२.२०१४ अन्वये यापूर्वीच तालुकास्तरीय बालसंरक्षण समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीत खालील सदस्यांचा नव्याने अंतर्भाव करण्यात येत आहे.

१) वय वर्षे १२ ते १८ या वयोगटातील मुलगा प्रतिनिधी –सदस्य-२

२) वय वर्षे १२ ते १८ या वयोगटातील मुलगी प्रतिनिधी –सदस्य -२

३) स्थानिक सामाजिक प्रतिनिधी –सदस्य (स्वयंसेवी संस्था, बचत गट,महिला मंडळ, इ.पैकी)

४) वरिष्ठ बाल विकास प्रकल्प अधिकारी (एकात्मिक बाल सेवा योजना)- सदस्य सचिव

**३) नगर / प्रभाग बाल संरक्षण समिती (नगरपालिका तसेच महानगरपालिका क्षेत्र) :**

**रचना :**

१) नगर सेवक / नगर सेविका – अध्यक्ष १

G.R.2014.doc

२) वय वर्षे १२ ते १८ या वयोगटातील मुलगा प्रतिनिधी — सदस्य १

३) वय वर्षे १२ ते १८ या वयोगटातील मुलगी प्रतिनिधी — सदस्य १

४) प्राथमिक / माध्यमिक (अनुदानित) शाळेचे मुख्याध्यापक अथवा शिक्षक (शिक्षणाधिकारी द्वारा नियुक्त) — सदस्य १

५) पोलीस स्टेशनमधील नियुक्त बाल संरक्षण अधिकारी - सदस्य १

६) स्थानिक सामाजिक संस्था प्रतिनिधी — सदस्य २

७) अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती (महानगरपालिका शाळा) — सदस्य १ (शिक्षणाधिकारी द्वारा नियुक्त)

८) महानगर पालिकेच्या प्राथमिक / माध्यमिक (अनुदानित) शाळेचे मुख्याध्यापक अथवा शिक्षक — सदस्य १ (शिक्षणाधिकारी द्वारा नियुक्त)

९) वैद्यकीय अधिकारी (शासकीय / खाजगी) — सदस्य १ (समितीद्वारा निवड केलेला / केलेली)

१०) अंगणवाडी पर्यवेक्षिका / मुख्यसेविका — सदस्य सचिव

सदरच्या बाल संरक्षण समितीच्या आस्थापनेबाबतचा ठराव प्रभाग समितीच्या बैठकीत घ्यावा. तसेच सदर समितीत जास्तीत जास्त महिला सभासद असतील ज्याची खातरजमा करावी.

**नगर बाल संरक्षण समितीची कार्ये :**

**अ. प्रतिबंधात्मक कार्ये :**

**समस्या शोध**

१) वार्डामध्ये / प्रभागामध्ये काळजी व संरक्षण तसेच विधीसंघर्षग्रस्त असणा-या बालकांना तसेच त्याला कारणीभुत असणा-या घटकांचा, समस्यांचा शोध घेणे तसेच जिल्हा बाल संरक्षणामध्ये दिलेल्या नियोजन नमुना आराखडयामध्ये बाल संरक्षण बार्बीवर वार्षिक नियोजन करणे.

२) बाल संरक्षण, बाल हक्क व बालकांचा सहभाग इ. विषयांबाबत गाव तसेच प्रभाग स्तरावर जाणीव जागृती करुन या विषयांना गावाच्या व वार्डाच्या अर्थसंकल्पामध्ये, नियोजनामध्ये व प्रशासनिक कामामध्ये प्राथमिकता देणे व त्याबाबत आर्थिक तरतूद करणे.

३) बालकांना तसेच त्यांच्या कुटुंबाला आधार मिळेल अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, जिल्हा नियोजन समितीच्या विविध योजनांचा, स्त्रोतांचा शोध घेणे. तसेच सदरच्या योजनांचा लाभ बालक / कुटुंबापर्यंत मिळवून देणे.

**योजनांचे एकत्रिकरण व समन्वय :**

१) काळजी व संरक्षणाची गरज असणा-या तसेच विधीसंघर्षग्रस्त बालकांना तसेच त्यांच्या कुटुंबांना अन्न, वस्त्र, निवारा, सामाजिक सुरक्षा, वैद्यकीय सुविधा, निर्वाहाच्या सोयी, तसेच शिक्षण, इत्यादी बाबतच्या शासकीय योजनांचा एकत्रित लाभ देणे व त्याबाबत समन्वय साधणे.

G.R.2014.doc

२) काळजी व संरक्षणाची गरज असणा-या तसेच विधीसंघर्षग्रस्त बालकांना त्यासंबंधित प्रकरणे हाताळणारी सक्षम प्राधिकरणे, उदा. बाल कल्याण समिती / बाल न्याय मंडळ आणि जिल्हा बाल संरक्षण कक्ष, इत्यादीशी समन्वय साधणे.

**बालक, तरुण तसेच प्रौढ, इत्यादीच्या सहभागासाठी प्रोत्साहन व सहाय्य :**

बालकांच्या दृष्टीकोनातून त्यांच्या राहणीमानावर परिणाम करणा-या बाबींबाबत त्यांना निर्णय घेण्याकरीता पाठिंबा तसेच प्रोत्साहन देणे तसेच त्यांच्या निर्णयांचा आदर करणे. बालकांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या सर्व बाबींवर निर्णय घेताना बालकांचा सहभाग आर्वजून घेणे तसेच त्यांच्या मतांचा आदर करणे. उदा. ग्रामसभा, ग्राम पंचायत, प्राथमिक आरोग्य शाळा, इ.

**ब. उपाय योजनात्मक कार्ये :**

**बालकासंबंधातील विविध प्रकरणे ओळखून त्यांमध्ये मध्यस्थी तसेच सहाय्य करुन त्या प्रकरणांचे निवारण करणे :**

१) बाल संरक्षण संदर्भातील विविध समस्या उदा. शारीरिक किंवा लैंगिक अत्याचार, हिंसात्मक कृत्ये तसेच बालकांचे शोषण निवारणा संदर्भात महत्त्वाची भुमिका बजावणे.

२) बालकांवर परिणाम करणा-या विविध समस्या संदर्भात उदा. बाल विवाह, बाल कामगार, अनैतिक व्यापार, बालकांचे लैंगिक शोषण इ. प्रतिबंधात्मक तसेच उपचारात्मक उपाययोजना करणे.

३) बालकांसंदर्भात घडणा-या अत्याचाराच्या तसेच शोषणाच्या घटनांवर कायदेशीर कार्यवाही करणे.

४) पीडित बालकास समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे.

**बाल संरक्षण समितीचा कालावधी**

१) ग्राम / नगर / तालुका स्तरावरील समित्या गठित झाल्यापासून ५ वर्षासाठी कार्यरत राहतील.

२) एखाद्या सदस्याने राजीनामा दिल्यास त्या व्यक्तीच्या जागी दुस-या सदस्याची नेमणूक संबंधितांसोबत चर्चा करुन करण्यात येईल.

**बाल संरक्षण समितीच्या बैठका**

१) बाल संरक्षण समिती महिन्यातून किमान १ वेळा (आवश्यकता भासल्यास अधिक वेळा) बैठक आयोजित करतील.

२) सदर बैठका शाळेच्या जागेत किंवा ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित करण्यात येतील.

जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांनी जिल्हास्तरावर एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांशी समन्वय साधावा व वरील उल्लेखित कार्याच्या संदर्भामध्ये नस्ती संबंधित जिल्हयांच्या जिल्हाधिका-यांकडे सादर करुन संबंधितांना आदेश निर्गमित करावेत तसेच जिल्हयातील अंमलबजावणीचा अहवाल महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्थेस

दरमहा सादर करावा. ग्रामस्तरावरील बालसंरक्षण समितीने तालुकास्तरावरील समितीस अहवाल सादर करावा तर तालुकास्तर समितीने जिल्हा बाल संरक्षण एकक(DCPU)यांचे कडे अहवाल सादर करावा. जिल्हा बाल संरक्षण एकक सदर अहवाल जिल्हाधिकाऱ्यास सादर करेल. त्याचप्रमाणे नगर बाल संरक्षण समितीने जिल्हा बाल संरक्षण एकक(DCPU) यांचे कडे अहवाल सादर करावा.ग्राम/ तालुका / नगर बाल संरक्षण समित्यांनी अशा प्रकारे समन्वय साधणे आवश्यक राहील. वर्धा, जालना, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम या जिल्हयांमध्ये काही तालुक्यात सदर शासन निर्णयाच्या अगोदर बाल संरक्षण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत त्या समित्यामध्ये या शासन निर्णयानुसार स्थापित समित्यांमध्ये आवश्यक ती सुधारणा करुन सदर समित्या कार्यरत राहतील. जिल्हा बाल संरक्षण कक्ष अंमलबजावणी संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा घेऊन समितीच्या सदस्यांना मार्गदर्शन करतील. सदरच्या कार्यशाळांना उपस्थित राहणे सर्व संबंधित सदस्यांना बंधनकारक आहे शिवाय संबंधित समित्यांनी त्यांच्या कार्याचा अहवाल जिल्हा बाल संरक्षण कक्षास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुार व नावाने,

(विनोद बोंदरे)
कक्ष अधिकारी

**प्रति,**

मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
मा.मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव.
सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण आयोग, वरळी, मुंबई
सदस्य सचिव, राज्य महिला आयोग, बांद्रा, मुंबई.
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी
उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, का-८.

G.R.2014.doc

## संदर्भ सूची


1. बालविवाह प्रतिबंध कायदा 2006
2. लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा, 2012
3. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, 2015
4. महाराष्ट्र राज्य बालविवाह प्रतिबंध नियम, 2022
5. भारतातील बालविवाह: सामाजिक-कायदेशीर आणि मानवी हक्क आयाम, जया सागडे, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, 2012, दुसरी आवृत्ती.

**आय्एल्एस् विधी महाविद्यालयाचे मोफत कायदाविषयक सल्ला केंद्र**

या केंद्राची स्थापना १९७६ साली झाली असून तेव्हा पासून या केंद्रातर्फे समाजातील गरजू व पिडीत व्यक्तींना कायदेविषयक सल्ला आणि मदत देण्याचे काम केले जाते. त्याच बरोबर कायदेविषयक जनजागृतीचे कार्यक्रम देखील या केंद्राद्वारे घेतले जातात.

**संपर्क :**

सोमवार ते शुक्रवार – दुपारी १२ ते १ - आय्एल्एस् विधी महाविद्यालय, चिपळूणकर रस्ता (लॉ कॉलेज रस्ता), पुणे – ४११००४, फोन नं. ०२० २५६५६७७५, Email - ils.legalaid@ilslaw.in

आय्‌एल्‌एस्‌ विधी महाविद्यालय, पुणे

चिपळूणकर रोड, शिवाजीनगर, पुणे – ४११००४
संपर्क: ०२० २५६५७७५
इ मेल : projectvaw@ilslaw.in

मार्गदिपीका निर्मिती आणि छपाईसाठी अर्थ सहाय्य

SWISSAID

Co-funded by
the European Union

***Disclaimer -*** *This document has been printed with the financial assistance of the European Union. The contents of this document are the sole responsibility of ILS Law College and SWISSAID and can under no circumstances be regarded as reflecting the position of the European Union.*